• पुणे, मंगळवार, ०४ जून २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 178 • वर्ष ३ रे, अंक १७८ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



## एक्झिट पोलनंतर पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपला यशाचा विश्वास

# उत्कंठा '४००पार'ची



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होण्यासाठी काही तासांचा अवधी बाकी असताना, देशभरातील जनतेला भाजप ४०० पार करणार का, याचीच उत्सुकता आहे. शनिवारी झालेल्या एक्झिट पोलमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार सलग तिसऱ्यांदा सत्तेवर येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून, त्यात रालोआ ३६० पेक्षा जास्त जागांवर विजयी होईल, असा अंदाज आहे. विरोधकांची इंडिया आघाडीला बहुमत मिळणार नसल्याचेही एक्झिट पोलमधून समोर आले आहे.

दरम्यान, भाजपने सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यानंतर, हा ऐतिहासिक विजय साजरा करण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. २०१४, २०१९ आणि आता २०२४ अशा सलग तीन वेळा भाजप स्वबळावर प्रचंड बहुमताने सत्तेवर येण्यास सज्ज झाला आहे.

देशातील सर्वच एक्झिट पोलनी भाजप प्रचंड बहुमताने विजयी होईल असा अंदाज वर्तवला असून, २०१९ पेक्षा अधिक चांगली कामगिरी भाजप करेल, असे म्हटले आहे. भाजपने २०१९ मध्ये ३०३ जागा मिळवल्या होत्या. २०२४ मध्ये भाजपला त्यापेक्षाही जास्त जागा मिळतील, असा अंदाज एक्झिट पोलमधून वर्तवण्यात आला आहे. इंडिया टुडे आणि चाणक्या यांनी रालोआला ४०० पेक्षा जास्त जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त केला आहे. एबीपी-सीव्होटरने त्यांना ३५३ ते ३८३ जागा दिल्या आहेत. जन की बातने रालोआ ३६२ ते ३९२ जागा जिंकेल, असे म्हटले आहे.

२०१९ मध्ये एक्झिट पोलने रालोआला कमी जागा मिळतील, असे म्हटले होते, त्यावेळी ३५३ जागांवर रालोआ विजयी झाली होती. भाजपने एकट्याने ३०३ जागा जिंकत सलग दुसऱ्यांदा सत्तेवर येण्याचा पराक्रम केला होता. त्यावेळी विरोधकांच्या यूपीएला केवळ ९३, तर काँग्रेसला ५२ जागांवरच विजय मिळाला होता. भाजप तिसऱ्यांदा सरकार स्थापन करत, ऐतिहासिक असा विजय मिळवण्याच्या तयारीत आहे. त्याचवेळी विरोधकांच्या इंडिया आघाडीने एक्झिट पोल हे फसवे असल्याचे म्हटले आहे. सोनिया गांधी यांनी इंडिया आघाडीच बहुमत मिळवेल, असे म्हटले आहे. सर्वच प्रमुख विरोधी पक्षांनी एक्झिट पोलचे अंदाज चुकले असल्याचे म्हटले आहे.

### मोदी करतील नेहरूंच्या विक्रमाशी बरोबरी

● पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा निवडून आल्यास, सलग तीनदा निवडून येण्याच्या दिवंगत पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या विक्रमाशी ते बरोबरी करतील. सलग तीनदा निवडून आलेले ते एकमेव पंतप्रधान आहेत. पंडित नेहरूंनी १९४७ ते १९६४ या कालावधीत १७ वर्षे पंतप्रधान म्हणून काम केले. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, १९५१ च्या पहिल्या निवडणुकांनंतर नेहरू सत्तेवर परतले, तेव्हा १९५७ च्या लोकसभा निवडणुकीत एकट्या काँग्रेसने ३७१ जागा जिंकल्या होत्या.

### अठराव्या लोकसभेसाठी ६४.२ कोटी मतदारांनी केले मतदान

## भारतीय लोकशाहीचा विक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ६४.२ कोटी मतदारांनी सहभाग घेऊन जागतिक विक्रम केला. यात महिलांचा लक्षणीय सहभाग असून, त्यांची संख्या ३१.२ कोटी इतकी आहे, असे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सोमवारी सांगितले. ते पत्रकार परिषदेत संबोधित करत होते.

यंदा देशात ६४ कोटी २ लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून, जी-७ मधील एकूण देशांतील दीडपट अधिक तर, युरोपीय महासंघातील २७ देशांच्या तुलनेत अडीचपट अधिक हे मतदान ठरले. आयोगाच्या माहितीनुसार, देशात ९६.६ कोटी मतदार आहेत. यामध्ये ४९.७ कोटी पुरुष मतदार आणि ४७.१ कोटी महिला मतदार आहेत. यापैकी एकूण ६४ कोटी २ लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. म्हणजेच, यंदा देशात ६२.३६ टक्के मतदान झाले. या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याने निवडणूक आगोयाच्या आयुक्तांनी उभे राहून त्याला दाद दिली. जम्मू आणि काश्मीरमध्येही मोठ्या प्रमाणात मतदान झाले असून, गेल्या चार दशकांतील हे सर्वाधिक मतदान होते, असे राजीव कुमार यांनी स्पष्ट केले.

आदर्श » पान ९ वर

### १० हजार कोटींची रोकड जप्त

● मतदान प्रक्रियेच्या काळात तब्बल १० हजार कोटींची रोख रक्कम जप्त करण्यात आली. २०१९ च्या तुलनेत ही रक्कम तीनपट अधिक रक्कम आहे. यासाठी स्थानिक गटांना सक्रीय करण्यात आले होते, असे राजीव कुमार यांनी सांगितले.

## उद्धव ठाकरे रालोआत येणार:राणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** लोकसभेचे निकाल जाहीर झाल्यानंतर १५ दिवसांत उद्धव ठाकरे केंद्रातील रालोआत सहभागी होतील, असा दावा अमरावतीचे आमदार रवी राणा यांनी केला आहे. रवी राणा यांच्या पत्नी नवनीत राणा यांनी भाजपचे उमेदवार म्हणून अमरावती येथून निवडणूक लढवत आहेत.

राणा माध्यमांशी बोलताना म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि संजय राऊत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात ज्या प्रकारचे व्यक्तव्य करत आहेत, ते महाराष्ट्राने पाहिले आहे.

» पान ९ वर

# उद्धव ठाकरेंवर आयोगाची कारवाई

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील मतदानाच्या शेवटच्या टप्प्यात मुंबईत संथ गतीने मतदान झाल्याबद्दल निवडणूक आयोगाला जबाबदार धरणाऱ्या उद्धव ठाकरे यांना आयोगाने नोटीस पाठवली होती. आता आयोगाने ठाकरे यांच्या विधानाची गंभीर दखल घेत, राज्य निवडणूक आयोगाला त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.


उद्धव ठाकरे यांनी आचारसंहितादरम्यान मतदान सुरू असताना संध्याकाळी पाच वाजता घेतलेल्या पत्रकार परिषदेवर केंद्रीय निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आहे. उद्धव ठाकरे यांनी २० मे रोजी पत्रकार परिषद घेतली होती.



या दिवशी मुंबईतील सर्व सहा लोकसभा जागांसह राज्यातील एकूण १३ जागांसाठी मतदान झाले होते. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सोमवारी सांगितले की, निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष करण्यासाठी निवडणूक आयोगाने प्रमुख नेत्यांना नोटिसा बजावल्या, अनेकांवर गुन्हे नोंदवले तसेच अधिकाऱ्यांच्या बदल्याही केल्या.

निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीदरम्यान प्राप्त झालेल्या आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या

» पान ९ वर



## सेन्सेक्स ७६००० पार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोकसभेसाठीच्या एक्झिट पोलच्या निकालाने पंतप्रधान नरेंद्र मोदी हॅटट्रिक नोंदवतील, असा अंदाज वर्तवल्यानंतर, सोमवारी देशांतर्गत बाजाराने विक्रमी उसळी घेतली. एक्झिट पोलचे अंदाज, सकल देशांतर्गत उत्पादनाची ८.२ टक्के अशी कामगिरी आणि एस अँड पीने भारताच्या पतमानांकनात केलेली सुधारणा यामुळे ही तेजी आल्याचे विश्लेषकांनी म्हटले आहे. निर्देशांकाने पहिल्यांदाच ७६,५०० अंकांचा टप्पा ओलांडला.

» सविस्तर वृत्त ११ वर

## पश्चिम बंगालकडे देशाचे लक्ष

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यातील चुरशीच्या लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, सीएए येथे मोठी भूमिका बजावेल का, याकडे विश्लेषकांचे लक्ष आहे. सीएए कायद्याचा बांगलादेशमधून आलेल्या विस्थापितांना न्याय मिळण्यासाठी मदत होणार आहे. हा समाज भाजपकडे जाईल, म्हणूनच पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी त्याला विरोध केला आहे. बंगालकडे भाजपने म्हणूनच विशेषत्वाने लक्ष दिले असून, २०२१ च्या विधानसभा निवडणुकांपासून

» पान ९ वर

### पुणे तापमान

| ३५.०° | २५.०° | ६०% |
| --- | --- | --- |
| कमाल | किमान | आर्द्रता |

# कोल्हापुरात कारने उडविले; तिघांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** कोल्हापुरातील सायबर चौकात काल दुपारी भरधाव कारने चार दुचाकींना धडक दिली. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कारचालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

या अपघातानंतर परिसरात एकच खळबळ माजली. एका हुंडाई सॅन्ट्रो कारने सायबर चौकात चार दुचाकींना धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, कार चालकासह तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, इतर तीन जण गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने सीटी हॉस्पिटल आणि सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. कोल्हापुरातील सायबर चौकात नेहमीच वाहनांची वर्दळ असते. राजारामपुरी आणि शिवाजी विद्यापीठ, राजाराम कॉलेजला जोडणाऱ्या या चौकात दिवसा मोठी गर्दी असते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसत आहे की, चौकात वाहने हळहळे पुढे जात आहेत. मात्र, काहीच क्षणात भरधाव वेगात आलेली कार समोरील वाहनांना जोरात धडकून पुढे जाऊन पलटी होते. त्यावेळी दुचाकीवरील दोन-तीन जण हवेत उडल्याचे दिसत होते.

### पुणे हिट अँड रन प्रकरण

# 'त्या' रात्री मी दारू प्यायलो होतो!

**पुणे :** पुण्यातील कल्याणी नगर भागातील पोर्शे कार अपघातात दररोज नवनवीन माहिती समोर येत आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघाताच्या रात्री मद्यधुंद होतो, अशी कबुली अल्पवयीन मुलाने पोलिसांच्या चौकशीत दिली आहे. 19 मे रोजी मध्यरात्री भरधाव पोर्शे कारने दिलेल्या धडकेत दोघांचा मृत्यू झाला होता. यावेळी आपण मद्यधुंद अवस्थेत असल्याची अल्पवयीन मुलाने कबुली दिली आहे. तसेच अपघाताबद्दल आपल्याला फारसे आठवत नसल्याचेही या मुलाने पोलीस तपासात सांगितल्याची माहिती सुत्रांनी दिली.



एक जून रोजी पोलिसांनी आरोपी अल्पवयीन मुलाची आईच्या उपस्थितीत चौकशी केली. या चौकशीत आरोपी अल्पवयीन मुलाने आपण मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत असल्याची कबुली दिली. बाल न्याय हक्क मंडळाने 31 मे रोजी पुणे पोलिसांना अल्पवयीन आरोपीची चौकशी करण्याची परवानगी दिली होती. त्यानुसार पोलिसांनी रविवारी अल्पवयीन मुलाची चौकशी केली.

### संपूर्ण कुटुंब आरोपीच्या पिंजऱ्यात

● पोर्शे कार अपघातात संपूर्ण अग्रवाल कुटुंब आरोपीच्या पिंजऱ्यात आहे. आरोपी अल्पवयीन मुलगा, त्याचे आई-वडिल, आजोबा अटकेत आहेत. तर अल्पवयीन मुलगा सध्या बालसुधारगृहात आहे. त्याला पाच जूनपर्यंत सुधारगृहात ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे. अपघातानंतर चालक अपहरणाचा केल्या प्रकरणी विशाल अग्रवाल आणि आजोबा सुरेंद्र कुमार यांना अटक केली आहे. सध्या दोघेही न्यायालयीन कोठडीत आहेत. तर शिवानी अग्रवाल यांना पाच जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## लिव्हइनमध्ये वाद, प्रेयसीला पेटवले

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** लिव्हइन रिलेशनशिपमध्ये राहत असताना झालेल्या वादातून प्रियकराने प्रेयसीला पेट्रोल टाकून पेटवून देत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी प्रियकरावर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करुन अटक केली आहे. हा प्रकार वाकड परिसरात घडला आहे.

या प्रकरणी मुळची कर्नाटक आणि सध्या रहाटणी येथे राहणाऱ्या 30 वर्षीय महिलेने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन आदम खान मलंग खान पठाण (वय-29 रा. डी मार्ट जवळ, काळेवाडी, मुळ रा. सिरसम पो. पालम जि. परभणी) याच्यावर आयपीसी 307, 323, 504, 506 नुसार गुन्हा दाखल करुन अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,

» पान ९ वर

### २ कोटी २० लाखांचा गांजा जप्त

# सीमाशुल्क विभागाची सोलापूरमध्ये मोठी कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गांजा विक्रीला बंदी असली तरी परराज्यातून मोठ्या प्रमाणात तस्करी केली जाते. पुणे सीमा शुल्क विभागाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने सोलापूर जिल्ह्यात मोठी कारवाई केली आहे. पथकाने तब्बल दोन कोटी 20 लाख रुपये किमतीचा 833 किलो गांजा जप्त केला आहे. ही कारवाई सोलापुर ग्रामीण भागातून जप्त केला आहे. याप्रकरणी ट्रक चालकाला अटक केली आहे. ट्रक चालक सुधीर चव्हाण (वय- 32 रा. नरसिंहपूर, सोलापूर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पुणे सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ओडीसा राज्यातून मोठ्या प्रमाणात गांजा महाराष्ट्रात येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ » पान ९ वर

### ओडीशातून ट्रकमध्ये सोलापूर येथे आणला जात होता गांजा



## शनिवारवाड्यात बॉम्बची अफवा; तरुणावर गुन्हा

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शनिवारी सकाळी शनिवार वाड्याच्या पुढच्या गेट येथे बॉम्ब ठेवल्याची माहिती पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला मिळाली. पोलिसांनी शनिवारवाडा परिसर रिकामा करुन बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाकडून तपासणी करण्यात आली. त्यावेळी ही अफवा असल्याचे समोर आले. याप्रकरणी पोलिसांनी बीडमधील एका तरुणाविरोधात विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. रामहरी अश्रू सातपुते (रा. चिंचपूर, ता. आष्टी, जि. बीड) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत » पान ९ वर

### काँग्रेसला बालेकिल्ला पुन्हा जिंकण्याच्या आशा

# पुण्यात जल्लोषाची तयारी पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे लोकसभेच्या बहुचर्चित निवडणुकीचा निकाल मंगळवारी जाहीर होणार असून, यावेळी भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी नवे चेहरे दिले होते. भाजपने मागील दोन लोकसभा निवडणुकांमध्ये जिंकलेली जागा राखण्यासाठी लढत दिली आहे, तर काँग्रेसने आपला गमावलेला बालेकिल्ला पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्न केले.

भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हेच विजयी होणार असा भाजपचा विश्वास असून, त्यांचा विजय साजरा करण्यासाठी पुणे शहरात भाजपने जोरदार तयारी केली आहे. त्याचवेळी काँग्रेसचे रविंद्र धंगेकर यांनीही आपणच विजयी होऊ, असा दावा केला आहे. या दोघांच्यातील चुरस कायम असताना, पुण्याची जागा कोणाला मिळणार, यासाठी काही घटक निर्णायक ठरणार आहेत.

पुणे लोकसभेसाठी १३ मे रोजी मतदान झाले आणि २०१९ च्या तुलनेत ६९,८५४ मतांनी वाढ झाली. २०१९ च्या १०,३३,८२४ च्या तुलनेत यावर्षी ११,०३,६७८ मते पडली. मतदार यादीत नावे गहाळ झाल्याच्या तक्रारी असूनही - २०१९ च्या निवडणुकीत ४९.८७ टक्क्यांच्या तुलनेत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ५३.५४ टक्के होती. वाढलेल्या मतदानाचा टक्का निकाल ठरवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.



पुणे लोकसभा मतदारसंघांतर्गत सहा विधानसभा क्षेत्रे असून, त्यात भाजपचे चार आणि राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या प्रत्येकी एकाचे प्रतिनिधीत्व आहे. भाजपच्या आमदारांनी प्रतिनिधित्व केलेल्या शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात मतदानात घट झाली असून, ज्या भागात काँग्रेसची चांगली उपस्थिती आहे, तेथे मतदानात वाढ झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जनमानसात चांगली प्रतिमा असून, त्याचा परिणाम पुणे लोकसभेच्या जागेवर होऊ शकतो.

» पान ९ वर

#रा

### अनधिकृत रुफटॉप हॉटेल, बारवर प्रशासनाची कडक कारवाई

# आतापर्यंत शहरातील ६३ हॉटेलचे परवाने सील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कल्याणीनगर अपघातानंतर जाग आलेल्या प्रशासनाकडून कारवाईचा धडाका लावला आहे. राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार या मोहिमेअंतर्गत नियमांचे पालन न करणाऱ्या मद्यालयांवर कारवाईचा प्रस्ताव जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांच्याकडे सादर करण्यात आला होता. त्याला डॉ. दिवसे यांनी मान्यता दिल्याने परवाना सील करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

याबाबत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. दिवसे म्हणाले, "गेल्या आर्थिक वर्षात नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १९ मद्यालयांवर कारवाईचा प्रस्ताव राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून प्राप्त झाला होता. त्यानुसार आदेश काढण्यात आले. तसेच चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत ६३ मद्यालयांनी नियमांचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर कारवाईचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यानुसार कारवाई करण्यात आली. अशाप्रकारे गेल्या आणि चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत ८२ मद्यालयांवर कारवाई करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून आणखी काही प्रस्ताव असल्यास त्याची पडताळणी करून कारवाईचे आदेश काढण्यात येतील."

कल्याणीनगर अपघातानंतर महापालिका आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुरुवातीला अनधिकृत पब, बारवर कारवाईचा धडाका लावला. मात्र गेल्या दोन-तीन दिवसांपासून हा धडाका थंडावल्याचे चित्र आहे. त्यामुळे 'कारवाई थंडावली का' अशी चर्चा सध्या नागरिकांत सुरू झाली आहे.

प्रशासनाच्या कारवाईच्या आकडेवारीवरूनही हे चित्र स्पष्ट होत आहे. महापालिकेच्या बांधकाम विभागाने गेल्या सहा दिवसांत ५५ अनधिकृत बार, पबवर कारवाई करून १ लाख ७ हजार हजार चौरस फुटाचे बांधकाम पाडण्यात आले. शहरात अद्यापही अनेक अनधिकृत रुफटॉप हॉटेल, बार असून, राजकीय पदाधिकाऱ्यांचा आश्रय असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ का केली जात आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

अनेक ठिकाणी रहिवासी भागात रेस्टॉरंट, बार, पब सुरू झाल्याने तेथील रहिवाशांना गोंधळ आणि पार्किंगच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पण तक्रारी करूनही महापालिकेकडून कारवाई केली जात नव्हती. कल्याणीनगर येथील पोर्शे कारच्या अपघातामध्ये दोघांचा बळी घेतला. यातील अल्पवयीन आरोपीने पबमध्ये दारू पिल्याचे उघडकीस आल्याने संपूर्ण शहरात पब, बारमध्ये होणारे नियमांचे उल्लंघन, अनधिकृत बांधकामे याकडे महापलिका, पोलिस, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे लक्ष गेल्याने आता कारवाई सुरू झाली आहे.

पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने शहरात २२ मे पासून अनधिकृत बार, पब, रेस्टॉरंटवर कारवाई सुरू केली आहे. सुरुवातीला कारवाईचा जोर चांगला होता, पण आता कारवाई संथ झाली आहे. कोथरूड, बाणेर, बालेवाडी, कोंढवा, महंमदवाडी, हडपसर या भागांत अनेक अनधिकृत बार, पब आहेत. यामध्ये आमदार, माजी आमदार, माजी नगरसेवकांसह अन्य पदाधिकाऱ्यांची भागीदारी आहे. हे बार अनधिकृत असल्याचे माहिती असूनही अजून कारवाई झालेली नसल्याचे समोर आले आहे.

> झोन १, २, ३ या भागांतील अनधिकृत बार, रेस्टॉरंटवर कारवाई करण्यात आलेली आहे. कारवाई केलेल्या ठिकाणांची यादी राज्य उत्पादन शुल्क विभागालाही दिली आहे. आणखी काही ठिकाणे राहिली असतील तर त्यावरही कारवाई केली जाणार आहे.
>
> **— श्रीधर येवलेकर,**
> अधिक्षक अभियंता

> बांधकाम विभागाने जुन्या हद्दीतील झोन ४, ५, ६मध्ये कारवाई केली आहे. जवळपास ७० ते ८० टक्के अनधिकृत बार, रेस्टॉरंटवर कारवाई केली आहे. कारवाईचा जोर कमी झालेला नाही. शेड काढल्यानंतर पुन्हा हॉटेल सुरू करण्याचा प्रयत्न केला तर कारवाई केली जात आहे.
>
> **— राजेश बनकर,**
> अधिक्षक अभियंता

---

राष्ट्रसंचार | लोकसभा निकाल | रा

## जिल्हाधिकाऱ्यांचे मतमोजणी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

### कोणताही ताण न घेण्याचा सल्ला

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पुणे लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी होत असलेल्या कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामध्ये आयोजित मतमोजणी प्रशिक्षणात जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी अधिकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर आदी उपस्थित होते. सर्व मतमोजणी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कोणताही ताण न घेता आपल्याला दिलेल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडून भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे कामकाज करावे. मतमोजणी प्रक्रिया निरंतर गतीने, सहजतेने मात्र संपूर्ण जबाबदारीने पार पाडावी, असेही ते म्हणाले. यावेळी डॉ. दिवसे यांनी मतमोजणीच्या तांत्रिक बाबींबाबतही मार्गदर्शन केले.



## शिक्षणासाठी क्रिएटिव्ह फाउंडेशन सर्वतोपरी मदत करणार : संदीप खर्डेकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मंगळवार पेठेतील वस्तीत राहणाऱ्या ऋतुजा संजय धुमाळ हिने विपरीत परिस्थितीत अभ्यास करत दहावीच्या परीक्षेत दैदीप्यमान यश मिळविले. आज तिच्या या यशाबद्दल 'क्रिएटिव्ह फाऊंडेशन' तर्फे ना. चंद्रकांत पाटील व मा. मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर, भाजपाच्या ओबीसी आघाडीचे उपाध्यक्ष सतीश गायकवाड, शहर सरचिटणीस पुनीत जोशी, अमोल बालवडकर व इतर मान्यवर उपस्थित होते.



यावेळी ऋतुजाला विविध भेटवस्तू देण्यात आला तर तिच्या शिक्षणासाठी लागणारी सर्व प्रकारची मदत करण्याचे वचन ना. चंद्रकांत पाटील व क्रिएटिव्ह फाऊंडेशनतर्फे संदीप खर्डेकर यांनी दिले. मंगळवार पेठेतील छोट्याश्या घरात राहणाऱ्या ऋतुजाचे वडील इलेक्ट्रिकची कामे करतात तर आई गृहिणी आहे.

हुजूरपागेत शिकणाऱ्या ऋतुजाला आपटे प्रशालेत प्रवेश घेऊन पुढे बारावी नंतर इंजिनियर व्हायचे आहे तसेच एम पी एस सी, यू पी एस सी ची परीक्षा देण्याचा विचार देखील तिने बोलून दाखवला. तिच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी सर्वतोपरी मदत करण्याचे वचन सर्वच मान्यवरांनी दिले.

## आ. धंगेकर यांनी केले आरोग्यमंत्र्यावर गंभीर आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉ. पवार यांना नुकतेच महापालिकेच्या आरोग्यप्रमुख पदावरून निलंबित करण्यात आले आहे. त्यावर धंगेकर यांनी आरोग्यमंत्र्यावर आरोप केल्याने आरोग्य क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या मुलाने पुणे महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांना कात्रज येथील ऑफिसवर बोलावून, प्रत्येक महिन्याला एक कोटी रुपये देण्याची, तसेच नुकत्याच होणाऱ्या टेंडरमधून ५ कोटी रुपये देण्याची मागणी केली.ही मागणी



मान्य न केल्याने तानाजी सावंत यांनी भगवान पवार यांचे निलंबन केले असा गंभीर आरोप आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला आहे.

धंगेकर म्हणाले, की डॉ. पवार यांनी शिफारस केली नसताना त्यांना आरोग्य प्रमुख पदावर आणले. त्यानंतर त्यांच्या मुलाने डॉ. पवार यांना कात्रज येथील ऑफिसवर बोलावून महिन्याला एक कोटी देण्याची मागणी केली.

तसेच, टेंडर त्यांच्या माणसाला देऊन त्याद्वारे महिन्याला पाच कोटींची मागणी केली, असे म्हटले आहे. हा कुठला न्याय आहे, कुठले प्रशासन आणि कुठली लोकशाही आहे, असाही सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच, या सरकारच्या सर्व खात्यांत भ्रष्टाचार सुरू असल्याचे सांगत तानाजी सावंत हे सज्जन माणूस, नसून प्रचंड भ्रष्टाचारी असल्याचेही वक्तव्य धंगेकर यांनी केले आहे.

### पुण्यात हेमंत रासने यांच्याकडून होणार ३७० किलो पेढे वाटप

## इतिहास घडणार; नरेंद्र मोदीजी तिसऱ्यांदा पंतप्रधान बनणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** संपूर्ण भारत देशाचे लक्ष लागून राहिलेल्या लोकसभा निवडणूकीचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. तत्पूर्वी एक्झिट पोलनुसार देशात तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार येणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. एनडीए सरकारच्या विजयात पुण्यातून एका जागेची भर पडणार असल्याचेही एक्झिट पोलमधून दिसून आले आहे. तसेच स्थानिक भाजप नेत्यांकडून देखील विजयाचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. कसबा विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रमुख हेमंत रासने यांच्याकडून विजयोत्सवाची जोरदार तयारी करण्यात आली असून ३७० किलो पेढ्यांचे वाटप केले जाणार आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हे आघाडीवर असल्याचं एक्झिट पोलमधून स्पष्ट झाल आहे. देशात देखील पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार ४०० हून अधिक जागा जिंकून पुन्हा सत्तेत येण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

निकालाच्या पार्श्वभूमीवर कसबा मतदारसंघ भाजपाकडून लक्ष्मी रोडवरील बेलबाग चौक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, दत्त मंदिर परिसर येथे नागरिकांसाठी एलईडी स्क्रीनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून ३७० किलो पेढे वाटले जाणार आहेत.

दरम्यान पुणेकरांना निकाल लाईव्ह पाहता येण्यासाठी भाजपाकडून एलईडी स्क्रीनची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

यावेळी कार्यकर्त्यांनी तसेच नागरिकांनी विजयोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन कसबा निवडणूक प्रमुख हेमंत रासने आणि कसबा मतदारसंघाचे अध्यक्ष राजेंद्र काकडे यांनी केले आहे.

## टीईटी परीक्षा होणार ऑगस्टमध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेतल्या जाणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेकडे अनेक उमेदवार डोळे लावून बसले आहेत. परंतु परीक्षा परिषदेतर्फे टीईटी घेण्याबाबत तयारी सुरू असून, येत्या ऑगस्ट महिन्यात ही परीक्षा घेण्याचे नियोजन आहे.

त्यामुळे उमेदवारांना आणखी काही दिवस परीक्षेची वाट पाहावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यात शिक्षक भरती प्रक्रिया राबवली जात आहे. काही जिल्ह्यांत पात्र उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या असून, काही ठिकाणी लोकसभा व विधानपरिषदेच्या आचारसंहितेमुळे नियुक्तीची प्रक्रिया रखडली आहे. मात्र, शिक्षण विभागाकडून त्यावर मार्ग काढण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

शिक्षक भरतीसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. परंतु, टीईटी घोटाळा समोर आल्यावर २०२१ नंतर एकही टीईटी परीक्षा घेतली गेली नाही. त्यातच टीईटी परीक्षा ऑनलाइन घ्यावी की ऑफलाइन यावर लवकर निर्णय झाला नाही. मात्र, आता टीईटी परीक्षा ऑफलाईन पद्धतीनेच होणार असून, त्यादृष्टीने परीक्षा परिषदे तर्फे तयारी केली जात आहे.

### शहरात लागले धगेंकर आणि मोहोळांच्या विजयाचे बॅनर

## निकालाआधीच रंगले बॅनर युध्द!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचाच विजय होणार, अशा आशयाचे बॅनर्स रविवारी शहरात झळकले होते. भाजप कार्यकर्त्यांनी लावलेल्या या बॅनर्सची जोरदार चर्चा रंगली होती. अशातच आज सोमवारी शहरात रविंद्र धंगेकर यांच्या विजयाचे बॅनर्स लागले आहेत. लोकसभा निवडणुकीचा निकाल अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे उमेदवारांसह कार्यकर्त्यांची चांगलीच धाकधूक वाढली आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडी की महायुती? कुणाला जास्त जागा मिळणार याची उत्सुकता अनेकांना लागून आहे. त्यातच निकालाआधीच काही ठिकाणी उमेदवारांच्या विजयाचे बॅनर्स झळकले आहेत.

शहरातील पर्वतीनगर भागात हे बॅनर्स लागले आहेत. "लोकांवर नाही, तर लोकांच्या मनात राज्य करणारे रविंद्र धंगेकर साहेब खबर पक्की विजय नक्की", अशा आशयाचा मजकूर या बॅनर्सवर छापण्यात आला आहे. सध्या या बॅनर्सची शहरात जोरदार चर्चा होत आहे

#रा




---

Selected

### डॉ. अनिश प्रधान, सुनील जायफळकर यांचे एकल तबलावादन



**पुणे :** गुरुवर्य स्व. पंडित भाई गायतोंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त एकल तबलावादनाची मैफल रंगली. पंडित गायातोंडे यांचे शिष्य सुनील जायफळकर यांचे कार्यक्रमाच्या पूर्वार्धात तर निमंत्रित कलाकार जगप्रसिद्ध तबलावादक डॉ. अनिश प्रधान यांचे उत्तरार्धात तबलावादन झाले. उत्तरोत्तर रंगत गेलेले वादन रसिकांच्या मनाचा ठाव घेणारे ठरले. गुरुवर्य स्व. पंडित भाई गायतोंडे यांच्या तबलावादक शिष्या संजीवनी हसबनीस आणि संवादिनी वादक श्रीराम हसबनीस यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रम एस. एम. जोशी सभागृहात झाला. सुरुवातीस दीप प्रज्वलन आणि पंडित भाई गायतोंडे यांच्या प्रतिमेचे पूजन पंडित गायतोंडे यांचे पुत्र, प्रसिद्ध हार्मोनियम वादक डॉ. दिलीप गायतोंडे, डॉ. अनिश प्रधान, सुनील जायफळकर, श्रीराम हसबनीस, संजीवनी हसबनीस यांच्या हस्ते झाले. मैफलीची सुरुवात सुनील जायफळकर यांच्या एकल तबला वादनाने झाली. त्यांना स्मिता मनोहर यांनी नगमा साथ केली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात डॉ. अनिश प्रधान यांचे एकल तबला वादन झाले. डॉ. प्रधान यांनी सुरुवातीला पेशकार त्यानंतर दिल्ली, अजराडा घराण्याचे पारंपरिक कायदे, रेले सादर केले. उस्ताद आमिर हुसैन खाँसाहेब रचित रेला आणि काही पारंपरिक रचनाही ऐकविल्या. यानंतर डॉ. प्रधान यांनी स्वरचित गत व तुकडे सादर करून रसिकांना मोहित केले. डॉ. अनिश प्रधान यांनी रचलेल्या कल्पकता आणि कलेवरील प्रेमाचा नमुना दर्शविणाऱ्या रचना सादर करून त्यांचे वादनामागील सखोल विचार प्रदर्शित केले. त्यानंतर 'नज्मनुमा' हा काव्यप्रकार सादर केला.

### ब्लॉकचेन तंत्रज्ञान तरुण पिढीसाठी करिअरचा योग्य पर्याय : डॉ. आदित्य अभ्यंकर

**पुणे :** ब्लॉकचेन तंत्रज्ञान हे फक्त आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादित राहिले नसून खासगी, सरकारी अशा सर्वच क्षेत्रात डेटा सिक्युरिटीसाठी ब्लॉकचेनचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. येणारे युग हे डेटा सिक्युरिटीच्या दृष्टीने महत्वाचे असणार आहे म्हणून ब्लॉकचेन तंत्रज्ञांची गरज दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. त्यामुळेच ब्लॉकचेन तंत्रज्ञान तरुण पिढीसाठी करिअरचा योग्य पर्याय आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले विद्यापीठातील तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकरांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागात 'सध्याच्या युगात नविन तंत्रज्ञानाच्या वाढत्या संधी' या विषयावर सेमिनार आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पॅलाडियम लॅब अँड रिवेरा मनीचे सहसंस्थापक श्री. अक्षय सिन्हा, पुणे डिएओ अँड कम्युनिटी बिल्डरच्या संस्थापिका अलमास सय्यद आणि बीडीए सोलिडस एआय टेक अॅन्ड क्रिप्टो डिजेचे संस्थापक श्री.ऋषी वहदाने उपस्थित होते. पुढे बोलताना, शिक्षण आणि कौशल्य याची योग्य सांगड घालून यशस्वी करिअर करता येते. विद्यार्थ्यांनी करिअर निवडताना पुढील २५ वर्षांचा विचार करावा. यापुढील काळात ब्लॉकचेन तंत्रज्ञान सर्वच क्षेत्राचा प्रमुख भाग झालेले असेल. भविष्यातील ही गरज ओळखूनच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बी.एस्सी इन ब्लॉकचेन टेक्नोलॉजी या पदवी अभ्यासक्रमाला या वर्षापासून सुरूवात करण्यात आल्याची माहिती डॉ. अभ्यंकर यांनी दिली. तसेच रोजगाराच्या नविन संधींचा विचार करून विद्यार्थी आणि पालकांनी या अभ्यासक्रमाचा प्राधान्याने विचार करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

### अखिलेश कुमार सिन्हा यांची मतमोजणी निरीक्षक म्हणून नियुक्ती

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत पुणे लोकसभा मतदार संघासाठी मतमोजणी निरीक्षक (काउंटिंग ऑब्झर्व्हर) म्हणून अखिलेश कुमार सिन्हा यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे. श्री. सिन्हा यांच्या निवासाचा पत्ता व्हीव्हीआयपी विश्रामगृह येथील कक्ष क्र. ए-२०४ असा असून संपर्क क्रमांक ९३३४१०८७७७ असा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी दिग्विजय आहेर हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९९२१२५२५९९ असा आहे, असेही जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

### मतमोजणी निरीक्षक म्हणून मोईनुद्दीन खान यांची नियुक्ती

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत शिरुर लोकसभा मतदार संघासाठी मतमोजणी निरीक्षक (काउंटिंग ऑब्झर्व्हर) म्हणून मोईनुद्दीन खान यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे यांनी दिली आहे. श्री. खान यांच्या निवासाचा पत्ता व्हीव्हीआयपी विश्रामगृह येथील कक्ष क्र. ए-३०५ असा असून संपर्क क्रमांक ९५०१८७२०५२ असा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी मनीष विठ्ठलराव जाधव हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९३०७८०८४८९ असा आहे, असेही अजय मोरे यांनी कळविले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान आजही लोकांसाठी प्रेरणादायी: आ. शेखर निकम

**पुणे :** पुणे येथे अहिल्यादेवी होळकर समाज सेवा संघ, येरवडा, पुणे यांच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती चिपळूण सगमेश्वर विधानसभा मतदार संघाचे आमदार शेखरजी निकम यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरी झाली. मधुर होती जिची वाणी, अशी जन्मली तत्वज्ञानी राणी गाजवल्या जिने दिशा-दाही,तिच्या उत्तुंग कार्याला खरच सीमा नाही. सुखात नांदली आमची जनता,कारण उत्तम शासन, तत्वज्ञानी राणी होती अहिल्या राजमाता. आमदार शेखर निकम यांनी अहिल्या राजमाता यांच्या विषयी बोलताना सांगितले की, अहिल्याबाई होळकर



महिला सक्षमीकरण आणि समाज कल्याणासाठी काम केले. त्यांनी महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि शिक्षणासाठी केंद्रे स्थापन केली, त्यांच्या विविध क्षेत्रातील सहभागाला प्रोत्साहन दिले, विधवांची स्थिती सुधारण्यात मदत केली, धार्मिक सहिष्णुता वाढवण्यात योगदान दिले आणि विविध समुदायांमध्ये एकोपा वाढवणे हा नेहमीच त्यांचा प्रयत्न होता. अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. अहिल्याबाई होळकर यांचे समाजातील योगदान आणि त्यांचे पुरोगामी शासन आजही लोकांना प्रेरणा देत आहे. अहिल्याबाईंच्या जन्मदिनी त्यांच्या स्मृतीला वंदन करून या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. त्याप्रमाणे मा. आमदार शेखरजी यांनी येथील उपस्थित लोकांशी संवाद साधला केलेल्या विकास कामाचा आढावा घेतला.

# होळकरवाडी परिसरातील वृक्षतोड चिंताजनक

**पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र संताप**

**पालिका प्रशासन कार्यवाही कधी करणार ?**

**कचरा समस्येचा प्रश्नही कायम**







झाडं लावा, झाडं जगवा, पर्यावरणाचे संवर्धन करा, असा नारा देत आबालवृद्ध मान्सून सुरू होताच सरसावते. बीजगोळे, बियांच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणी वा रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करीत असते. ही कौतुकास्पद आहे. मात्र, होळकरवाडी (ता. हवेली) गावठाण परिसर, चिमणी तलाव, कानिफनाथ रस्ता, शेवाळेवाडी रस्ता, औताडेवाडी रस्ता, उरुळीदेवाची रस्ता, हांडेवाडी रस्ता या परिसरातील आतापर्यंत हजारो झाडांची कत्तल केली जात आहे. पालिका प्रशासन वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई कधी करणार अशी विचारणा पर्यावरणप्रेमींसह रोहन सुरवसे पाटील, शासन नियुक्त पालिका सदस्य राजेंद्र भिंताडे केली आहे.

मागील पाच वर्षांपूर्वी समाविष्ट केलेल्या गावांमधील होळकरवाडी गाव आहे. होळकरवाडीमध्ये कचरा समस्या प्रकर्षाने जात असून, या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे. कचऱ्यामध्ये थर्माकोल, प्लास्टिक, काच अशा विघटन न होणाऱ्या वस्तूंचा समावेश असल्याने शेती नापिक बनते की काय, अशी शंका येथील शेतकऱ्यांना सतावू लागली आहे. प्लास्टिक पिशव्यामध्ये शिल्लक अन्नधान्य बांधून रस्त्याच्या बाजूला टाकले जाते, ते पशू-पक्षी, जनावरे खात असल्याने त्यांच्याही आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत आहेत. शेतामध्ये पसरलेल्या प्लास्टिक, थर्माकोलमुळे शेती नापीक बनत असून, कॅन्सरसारखा दुर्धर आजार होण्याची भीती नागरिकांमध्ये आहे.

> कानिफनाथ गडाच्या पायथ्याशी निसर्गरम्य परिसरात होळकरवाडी गाव वसले आहे. मात्र, अलिकडे शहरीकरणामुळे वृक्षराजचे जंगल नष्ट होऊन त्याठिकाणी काँक्रिटचे जंगल होऊ लागले आहे. वृक्षतोड बेमालूम केली जात असल्याने पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे.
>
> **— माऊली हांडे,** औताडेवाडी

> ओढे स्वच्छ पाण्याने वाहत होते. मात्र, मागिल काही वर्षांपासून पर्जन्यमान कमी होत असल्याने जानेवारी-फेब्रुवारीमध्ये ओढे कोरडे पडू लागले आहेत. ओढ्यात पाणी नाही, तर आता कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे.
>
> **— कल्पना हांडे** होळकरवाडी

## अवतीभवती
CITY UPDATE



### कविता बनसोडे यांचा स्वाभिमानी युवक संघात प्रवेश

**पुणे :** वंचित बहुजन आघाडीचे पुणे शहर उपाध्यक्ष निलेश भाऊ खंडाळे यांच्या उपस्थितीत कविता बनसोडे यांचा प्रवेश सोहळा पार पडला. वाढदिवसाचे औचित्य साधून कविता बनसोडे यांनी स्वाभिमानी युवक संघात प्रवेश केला. स्वाभिमानी युवक संघाचे अध्यक्ष प्रशांत गायकवाड व निलेश खंडाळे यांनी भारताचे संविधान कविता बनसोडे यांना देत त्यांची संघाच्या महिला उपाध्यक्षपदी नियुक्ती केल्याची घोषणा केली. यावेळी स्वाभिमानी युवक संघाचे सचिन खंडाळे, विशाल गायकवाड, महादेव कांबळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते व महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

### पुणे कस्टम विभागाची सोलापूरमध्ये मोठी कारवाई

**पुणे :** पुणे कस्टम विभागाने सोलापूर जिल्ह्यात मोठी कारवाई केली आहे. ओडीसा येथून आलेला तब्बल ८८३.१ किलो गांजा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत सुमारे दोन कोटी २० लाख एवढी आहे. ट्रक चालक सुधीर चव्हाण (वय ३२, रा. नरसिंहपूर, सोलापूर) याला कस्टमने ताब्यात घेतले आहे. पुणे कस्टमचे आयुक्त यशोधन वानगे यांनी याबाबत माहिती दिली की, पुणे कस्टम विभागाला माहिती मिळाली की, ओडीसा येथून एका ट्रकमध्ये गांजा आणला जात आहे. त्यानुसार कस्टम विभागाने सोलापूर येथे सापळा लाऊन एक आयशर ट्रक ताब्यात घेतला. ट्रकमध्ये वरच्या बाजूला इतर माल ठेवण्यात आला होता.

### मतमोजणीची माहिती मिळवा टोल फ्री क्रमांकावर

**पुणे :** केंद्रीय निवडणूक आयोगाच्या १९५० या टोल फ्री क्रमांकावर नागरिकांना मतमोजणी विषयक माहिती घेता येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे. दरम्यान सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. ईव्हीएमच्या मतमोजणीनंतर व्हीव्हीपॅट मशीनमधील चिठ्ठ्यांची मतमोजणी केली जाणार आहे. व्हीव्हीपॅटमधील मतमोजणी करण्यासाठी मतदान केंद्राची निवडही चिठ्ठी टाकून होणार आहे. नि

## महिलांचा सन्मान करणारी संस्कृतीच जगात सर्वश्रेष्ठ : डॉ. भटकर

### पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड जीवनगौरव पुरस्कार

**पुणे :** येणारा काळ मातृशक्तीचा आहे, ज्या देशात महिलांना देवीच्या, आईच्या रुपात पाहिले जाते, महिलांचा सन्मान होतो त्याच देशाची संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ ठरते. आईनेच अनेकांना घडवले, रामेश्वर गाव आदर्श होण्यामागे मातृशक्ती आहे तेव्हा मातृप्रधान संस्कृती टिकली पाहिजे. त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या पंचकन्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे असे प्रतिपादन संत वृत्तीचे थोर शास्त्रज्ञ जगप्रसिध्द संगणक तज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे यांच्या वतीने लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रुई) येथे त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड यांच्या आकराव्या पुण्यस्मरण स्मृतिदिनाचे औचित्य साधून पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळा, संत गोपाळबुवा



महाराज पुनर्निर्माण मंदिराचा शुभारंभ, शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठापणा, कलशारोहण सोहळा, त्यागमुर्ती प्रयागअक्का कराड समाधी मंदिराचे उद्घाटन आणि थोर स्वातंत्र्य सेनानी राष्ट्रधर्मपूजक दादाराव साधू कराड यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण सोमवार ३ जून रोजी मोठया उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. या सोहळयात प्रमुख पाहुणे म्हणून पद्मभूषण डॉ. विजय भटकर बोलत होते. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

मुर्तीप्रतिष्ठापणा व कलशारोहण पुरोहीत मिलींद राहूरकर पुणे यांनी व त्यांच्या सहकार्यांनी मंत्रोपचारांनी केला. या सर्व कार्यक्रमात विविध गावचे भजनी मंडळ सहभागी झाले होते. यात महिला भजनी मंडळांचा मोठा सहभाग होता.

ज्ञानविज्ञान आणि अध्यात्माचा समन्वय साधून आयुष्यभर समाजप्रबोधन व सांप्रदायिक सद्भावनेचे सेवाभावी कार्य, समर्पित व निरपेक्ष भावनेने अव्याहतपणे करून, समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या अयोध्या येथील श्री रामायणम धाम आश्रमाच्या माध्यमातून समाजप्रबोधन व ज्ञान विज्ञान अध्यात्माचा प्रसार करणाऱ्या विदूषी दीदी मॉ. मंदाकिनी श्रीराम किंकर, मुंबई येथील ज्येष्ठ प्रवचनकार व कीर्तनकार ह.भ.प.सौ. भगवतीताई सातारकर-दांडेकर, नेपाळ येथील थोर समाजसेविका श्रीमती मीरा महार्जन आणि थोर निष्ठावंत वारकरी व कवयित्री श्रीमती विजयाबाई गोविंद कदम आणि पुण्यातील थोर समाजसेविका श्रीमती मेधा सुरेश घैसास या पंचकन्यांना पूर्णब्रह्मायोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, सुवर्णपदक व रोख एकवीस हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरुप होते. या कार्यक्रमास झारखंड राज्यातील सरला-बिर्ला विद्यापीठाचे कुलगूरु डॉ. गोपाल पाठक, ह.भ.प. हरीहर महाराज दिवेगावकर, ह.भ.प. तुळशीराम कराड, प्रगतीशील शेतकरी काशीराम कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड, एटीडी विद्यापीठीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश कराड, राजेश कराड यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

## ४० टक्के संस्थांचे कन्व्हेयन्स बाकी



**पुणे :** पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरात ४० टक्क्यांपेक्षा जास्त म्हणजे सात हजार ५०० संस्थांच्या जमिनीची मालकी गृहनिर्माण संस्थेच्या नावे झालेली नाही. अशा संस्थांनी तातडीने प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी केले आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थेला मानीव अभिहस्तांतरणामुळे (डीम्ड कन्व्हेयन्स) जमिनीचा मालकी हक्क प्राप्त होत असून, या कामासाठी गतवर्ष २०२३-२४ मध्ये जिल्हा उपनिबंधक शहर कार्यालयाने आजवरचे सर्वाधिक ६०१ डीम्ड कन्व्हेयन्सचे आदेश देण्यात आल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक (पुणे शहर) संजय राऊत यांनी दिली.

मानीव अभिहस्तांतरणात जमीन अथवा विकसक अथवा बिल्डर यांच्या नावावर संस्था ज्या भूखंडावर उभी आहे, त्या भूखंडाची मालकी संस्थेच्या नावे करून देण्यासाठी पुणे शहर व पिंपरी-चिंचवडमध्ये उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. त्यातून गतवर्षी ४८५ संस्थांच्या नावे भूखंडाचे खरेदीदस्त करून देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे ५१ टक्क्यांपेक्षा अधिक सदनिकांची विक्री झाल्यानंतर विकसकाने तत्काळ सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी स्वतःहून करणे अभिप्रेत आहे.

काही ठिकाणी विकसक संस्था नोंदणी करण्यास इच्छुक नसतात. अशा प्रकरणांत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने गतवर्ष २०२३-२४ मध्ये १४६ संस्थांच्या विकसकाच्या सहकार्याशिवाय गृहनिर्माण संस्था नोंदणी करण्यात आलेली आहे. डीम्ड कन्व्हेयन्समुळे संस्थेचा पुनर्विकास होण्याकरिता व त्याचे सर्व फायदे सहकारी संस्था, त्यांच्या सभासदांना होण्याकरिताही ते महत्त्वाचे आहे. दरम्यान, पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड महानगरात २२ हजार ५०० गृहनिर्माण संस्था, १५ हजार अपार्टमेंट्स असून, त्यापैकी २५ हजार डीम्ड कन्व्हेयन्स पूर्ण झालेले आहेत.

## उमेदवारांची धाकधूक वाढली



**पुणे :** पुणे लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर, वंचित बहुजन आघाडीचे वसंत मोरे, 'एमआयएम'चे अनिस सुंडके यांच्यात मुख्य लढत झाली.

पुणे लोकसभा मतदारसंघासाठी १३ मे रोजी मतदान झाले. या निवडणुकीसाठी ५३.५४ टक्के मतदान झाले आहे. या निवडणुकीची मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे. या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

लोकसभा निवडणुकीचा निकाल मंगळवारी (दि. ४) जाहीर होणार आहे. या निकालाचे काऊंटडाउन सुरू झाले असून पुणे लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवारांमध्ये धाकधूक सुरू झाली आहे. पुणे लोकसभा मतदारात महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर या दोघांनीही विजयाचा दावा केला आहे.

महाविकास आघाडी उमेदवार रवींद्र धंगेकर म्हणाले, मला निवडणूक निकालाची धाकधूक अजिबात नाही. या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लाट नाही. गेल्या दहा वर्षात भाजपने विकासकामे केलेली नाही. जनतेला दिलेली आश्वासने पाळलेली नाहीत. त्यामुळे जनता भाजपवर नाराज आहेत. पुणेकर नागरिकांनी ही निवडणूक हातात घेतली होती. मी विजयी होणार आहे. जेजुरीला जाऊन मल्हार मार्तंड खंडोबारायाचे दर्शन घेऊन आलेलो आहे.

महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ म्हणाले, धाकधूक नाही, निकालाविषयी आत्मविश्वास आहे. पुणेकरांचा आशीर्वाद मला मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात पुणे शहरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहेत. पुणे महापालिकेत भाजपची सत्ता होती. या सत्तेच्या काळात भाजपने कोट्यवधी रुपयांची विविध विकास कामे केली आहेत. मेट्रो, नदीसुधार, समान पाणी पुरवठा योजना यांसह विविध योजना राबविला असून त्याची कामे प्रगतिपथावर आहेत. या विकास कामाच्या जोरावर मला विजयाची पूर्ण खात्री आहे.

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे म्हणाले, मनसेत येण्यापूर्वी मी शून्यातून उभा राहिलो आहे. मनसे सोडल्यानंतर मी वंचितकडून निवडणूक लढवत आहे. माझ्याकडे गमविण्यासारखे काही नाही. मला निवडणुकीच्या निकालाचे टेन्शन नाही. मी पुण्याचा खासदार होणार आहे. माझे काम सुरू आहे. जनता दरबार घेऊन नागरिकांचे प्रश्न सोडवित आहे. नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आहे. त्यामुळे मला जनतेचा आशीर्वाद मिळणार आहे.



# आली निकालघटिका...

तब्बल ४४ दिवसांची सर्वात मोठी सार्वत्रिक निवडणूक संपली आणि आता मतदानयंत्रात बंदिस्त झालेले ५४३ जागांवरील विजेत्यांसंदर्भातील गुपित समोर येण्याची घटिकाही आली. काल केंद्रीय निवडणूक आयुक्तांनी देशभरातील मतदारांचे आभार मानतानाच निवडणुकीची प्रक्रिया पार पाडणाऱ्या यंत्रणेसमोरील आव्हानांनाही उजाळा दिला. कडक ऊन आणि वादळ असूनही सात टप्प्यातील निवडणूक प्रचारात मतदारांचा उत्साह भारतीय लोकशाहीची ताकद जगाला दाखवतो. मोठमोठे रॅली, रोड शो आणि जनसंपर्क कार्यक्रमात मतदारांची उपस्थिती भारतीय लोकशाहीचे उज्ज्वल भविष्य दर्शवते. अत्यंत गुंतागुंतीच्या हवामानात हे निवडणुकीचे वेळापत्रक इतके लांबले नसते तर बरे झाले असते. पण हिंसाचाराच्या तुरळक घटना वगळता ही निवडणूक कमी–अधिक प्रमाणात शांततेत पार पडली. परंतु, संस्कृती, भूगोल आणि राजकीय प्रवृत्तीच्या विविधतेने नटलेल्या या देशात आजही निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह मानली जाते, याचे श्रेय निश्चितपणे निवडणूक आयोगातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना द्यायला हवे. शांततापूर्ण मतदान मतदारांचा निवडणूक प्रक्रियेवरचा विश्वास वाढतो. भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही देश आहे. आपल्या १८व्या लोकसभेसाठी झालेल्या निवडणुकीत जगातील सर्वात मोठा मतदार गट सक्रिय होता. देशभरात एकूण ९६ कोटींहून अधिक मतदारांसाठी सहज मतदानाची व्यवस्था करणे हे निश्चितच आव्हानात्मक काम होते. पण निवडणूक यंत्रणेने ते पेलले. आता लक्ष्य निकालाकडे आणि त्यापुढील घडामोडींकडे लागले आहे. दोन दिवसांपूर्वी विविध एक्झिट पोलही आले आहेत व त्यावर नेहमीप्रमाणे चर्वितचर्वणही सुरू आहे. मात्र मागचे काही अनुभव पाहता या एक्झिट पोलवर डोळे झाकून विश्वास ठेवायला कुणीच तयार नाहीये. प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसने तर या एक्झिट पोलवरील चर्चेतून अंग काढून घेतलेच होते. नंतर त्यात सहभाग नोंदविला. मात्र विद्यमान सत्ताधारी असो की, इतर विरोधी पक्ष कुणाच्याच दाव्यांमध्ये आत्मविश्वास दिसत नाही. चर्चेत सहभागी होताना उसने अवसान आणावेच लागते. मात्र त्याला थोडीफार तरी आत्मविश्वासाची जोड हवी असते. नेमकी त्याचीच कमतरता या निवडणुकीत पहिल्यापासून जाणवली ती निकालाची घडी येऊन ठेपली तरी कायमच आहे आणि त्याचे प्रमुख कारण म्हणजे या निवडणुकीत प्रथमच ना सत्ताधारी, ना विरोधक कुठले 'एक कथन' तयार करण्यात अपयशी ठरले. पंतप्रधान मोदी यांनी संसदेच्या अखेरच्या सत्रात 'चारसौ पार' चा नारा देऊन भाजपचा आत्मविश्वास वाढविण्याचा व विरोधकांना मानसिक दबावात आणण्याचा जोरदार प्रयत्न केला होता. सुरुवातीला मोदींच्या या गर्जनेने विरोधक गर्भगळित झाल्याचेही चित्र होते. मात्र भाजपला 'चारसौ पार' संविधान बदलासाठी पाहिजे असल्याचा जोरदार पलटवार काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला व सर्वच विरोधी पक्षांच्या नेत्यांनी तो मुद्दा उचलून धरला आणि मोदी पर्वात कधी नव्हे ते प्रथमच मोदी–शहा या 'अजेय जोडी'ला बॅकफूटवर जावे लागले. भाजप संविधान बदलणार नसल्याचे खुलासे करावे लागले. इथूनच या निवडणुकीत चुरस निर्माण झाली खरी पण भाजपला विरोधकांच्या पिचवर यावे लागल्याने त्यांचे निवडणुकीसाठी ठरवलेले कथन बिघडले. देशाला विकासाच्या नव्या उंचीवर नेऊन जागतिक महासत्ता बनविण्यासाठी भाजपलाच सत्ता द्यायला हवी, हे कथन मतदानाच्या पहिल्या टप्प्यातच विरून गेले. तसेच महागाई, बेरोजगारी, धार्मिक ध्रुवीकरण हे थांबविण्यासाठी विरोधी आघाडीला, 'इंडिया' ला सत्ता देण्याचे काँग्रेसच्या कथनालाही पहिल्या टप्प्याच्या मतदानापर्यंत हवा तसा जोर पकडता आलाच नाही. त्यामुळे देशात पहिल्यांदाच कुठल्याच बाजूची 'लाट' निर्माण न होताच मतदानाचा पहिला टप्पा पार पडल्याचे पहायला मिळाले. हे लक्षात येताच चाणाक्ष मोदी यांनी मंगळसूत्राचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेसच्या जाहीरनाम्यास लक्ष्य केले. काँग्रेसचा जाहीरनामा 'मुस्लिम लीग' ची छाप असणारा असल्याची जोरदार टीका मोदी यांनी केली. देशातील संपत्तीच्या विषम वाटपाची पाहणी करून योग्य पध्दतीने वितरण व्हावे यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन काँग्रेसच्या जाहीरनाम्यात होते. त्यामागे अर्थातच अदानी, अंबानी आणि इतर काही उद्योजकांच्या हाती एकवटलेली संपत्ती हा जुनाच मुद्दा चर्चेत आणण्याचा काँग्रेसचा हेतू होता. मोदींनी त्याला अनिष्ट वळण लावल्यावर भाजपच्या बोलभांड नेत्यांनी त्यावर जमेल तेवढे रान उठवले. काँग्रेसने त्याचा पूर्णशक्तीनिशी प्रतिवाद करण्याचा प्रयत्न केला खरा पण सॅम पित्रोदा यांनी वारसाहक्क कायद्याचा उल्लेख करून स्वत:च्याच पक्षासाठी 'सेल्फ गोल' केला आणि काँग्रेसला पित्रोदा यांचे मत वैयक्तिक असल्याचे सांगत 'बॅकफूट'वर जावे लागले. मात्र भाजपला जोरदार प्रयत्न करूनही या मुद्यावर निवडणुकीसाठीचे मजबूत 'नॅरेटिव्ह' तयार करण्यात यश आले नाहीच. त्यामुळेच पंतप्रधानांनी मग स्वत:च्याच 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या आपल्या घोषणेस तिलांजली देऊन धार्मिक ध्रुवीकरणाचा आपला हुकमी एक्का बाहेर काढला. आणि निवडणुकीच्या उर्वरित सर्व टप्प्यांचा प्रचार मग धर्म, जातपात, आरक्षण, नागरिकत्वाचा मुद्दा याभोवती फिरत राहिला. नेहमीप्रमाणे विरोधक हे मुद्दे उपस्थित होताच 'बॅकफूट'वर गेल्याचे चित्र पहायला मिळाले. त्यामुळे विरोधकांनाही महागाई, बेरोजगारी, शेतमालाचे भाव, शेतक–यांच्या आत्महत्या या नागरिकांच्या ज्वलंत समस्यांवर म्हणावी तशी सरकारविरोधी असंतोषाची तीव्र लाट निर्माण करता आली नाही. भारताची भौगोलिक, प्रादेशिक, सांस्कृतिक, जातीय, धार्मिक आणि विकासाची व्यामिश्रता एवढी भिन्न आहे की सर्वत्र एकस्तरीय प्रचार होऊ शकत नाही, हे मान्यच! मात्र, त्यात देशाची निवडणूक म्हणून किमान एकसूत्रता व प्रचाराचा एक दर्जा निश्चितच कायम ठेवता येऊ शकतो. तथापि सत्ताधारी व विरोधक या दोघांनीही याकडे लक्ष द्यायचेच नाही असा चंगच बांधल्याचे चित्र या निवडणुकीच्या प्रचारात सर्रास पहायला मिळाले. असो! महाराष्ट्रात तर ही निवडणूक अनेकांचे भवितव्य ठरवणारी व अस्तित्वाची लढाईच ठरणार आहे. मागच्या काही काळात राज्यात झालेल्या डोके भंजाळून टाकणा–या राजकीय नाट्यावर व प्रयोगावर मतदारांची नेमकी काय प्रतिक्रिया आहे, हे राज्यातील लोकसभा निवडणूक निकालातून स्पष्ट होणार आहे. त्यातून जसे एकनाथ शिंदे, अजित पवार यांचे भवितव्य काय? या प्रश्नाचे उत्तर मिळणार आहे तसेच उध्दव ठाकरे व शरद पवार यांच्या अस्तित्वाच्या प्रश्नालाही उत्तर मिळणार आहे. राज्यात शिंदे, अजितदादांना फारसे यश मिळाले नाही तर केंद्रात भाजप पुन्हा सत्तेवर आला तर त्यांना दिलासा मिळेल. मात्र, महायुतीला राज्यात ब–यापैकी यश मिळाले व केंद्रात इंडिया आघाडी सत्तेवर आली नाही तर उध्दव ठाकरे व शरद पवार यांना आपले उरलेसुरले आमदार, खासदार टिकवून ठेवण्यासाठी अक्षरश: तारेवरची कसरत करावी लागेल व त्यातून राज्यात नवे राजकीय वादळ निर्माण होईल हे स्पष्ट आहे. एकंदर कुठलेच ठोस कथन निर्माण होऊ न शकलेल्या या निवडणुकीत मतदारांचा कौल काय असेल याचे उत्तर देशाची पुढील वाटचाल ठरवणार आहे.

**अठराव्या लोकसभेसाठी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल आज जाहीर होणार आहे. एक्झिट पोल्समधून निकालाबाबतचे भाकित वर्तवण्यात आले आहे. पण या निकालातून कुठल्या आघाडीला बहुमत मिळेल यापेक्षाही लोकशाही जीवनाचा मार्ग कशी बनेल हा खरा प्रश्न आहे. यातच भारताचे श्रेष्ठत्व प्रकट होणार आहे. तोच लोकशाहीचा खरा सुवर्ण काळ असेल.संविधानाचे शिल्पकार डॉ. आंबेडकर म्हणतात, ध्येय मंदिराकडे जातांना वाटेत प्रचंड वादळ होईल, हातातील नंदादीप विझेल, तेव्हा हृदयातील नंदादीप तेवत ठेवून ध्येयमंदीर गाठण्याचा प्रयत्न करावा. हे वादळातील दिवे आपल्या लोकशाहीची नौका पैलतीरी नेण्यासाठी दीपस्तंभाप्रमाणे पथदर्शक ठरतील यात शंका नाही.**

# प्रश्न निकालाचा नाही...

भारतीय लोकशाही आज एका वळणावर पोहोचली आहे. अठराव्या लोकसभेसाठी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कुठल्या पक्षाला बहुमत मिळेल, कोणती आघाडी सत्तेवर येईल, याविषयीची चर्चा रंगत आहे. सामान्य माणूस या चर्चेमध्ये मग्न झाला आहे. तथापि निवडणूक काळातील प्रचाराची पातळी आणि मुद्द्यांचा परमार्श घेण्यात आलेले यश –अपयश हा अभ्यासाचा आणि संशोधनाचा विषय होय. सामाजिक राजकीय लोकशाहीचे सामाजिक व आर्थिक लोकशाहीत रूपांतर करण्यासाठी हा संक्रमण काळ आहे. डॉ. आंबेडकरांनी असे प्रतिपादन केले होते की, आपणास राजकीय लोकशाहीचे सामाजिक व आर्थिक लोकशाहीत रूपांतर करणे आवश्यक आहे. त्यांच्या या सूत्राविषयी विचार मंथन करत असतानाच आपल्यापुढे भारतीय लोकशाहीच्या भवितव्याचा विचार उद्भवतो आणि लोकशाही या देशातील सामान्य माणसांच्या जीवनाचा मार्ग कशी बनेल याविषयी चिंतन करणे उचित ठरते.

लोकशाही उत्सव :

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचा संग्राम म्हणजे लोकशाहीचा सांस्कृतिक उत्सव म्हटला पाहिजे. १९ एप्रिल ते १ जून या काळामध्ये ७ टप्प्यांमध्ये ही निवडणूक पार पडली. अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये सुद्धा मतदानाचे प्रमाण ५०% पेक्षा जास्त नसते. पण भारतात उन्हाळ्याच्या तीव्र झळा पसरत असताना सुद्धा मतदारांनी दाखविलेला उत्साह प्रशंसनीय होता. सातही टप्प्यातले सरासरी मतदानाचा सर्व राज्यांचा विचार करता ६०% पेक्षा पुढे पोहोचले. १.४ अब्ज लोकसंख्येपैकी ९७० दशलक्ष लोकांना मतदानाचा पवित्र हक्क बजावण्याची संधी प्राप्त झाली. म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ७०% समुदायाने मतदानाचा प्रक्रियेत भाग घेतला आहे आणि भारताच्या निवडणूक आयोगाने प्रशासकीय यंत्रणेत सर्वस्व पणास लावून या निवडणुका कुठलाही हिंसाचार न होता शांततेच्या वातावरणात पार पाडण्याचा विक्रम केला आहे. जगातील अनेक देशातून भारतात दाखल झालेल्या निरीक्षकांनी भारतीय लोकांची ही लोकशाहीवरील निष्ठा पाहून प्रशंसा केली आहे. आंध्र प्रदेश, अरुणाचल, ओडिसा, सिक्कीम या पाच घटक राज्यांमध्ये याच वेळी विधानसभेच्या ही निवडणुका पार पडल्या.

१९४७ ते १९७७ या काळात भारतामध्ये राजकीय ध्रुवीकरणाची प्रक्रिया गतीमान झाली. या कालखंडात केंद्रामध्ये एकसंघ काँग्रेस पक्षाचे मजबूत सरकार होते. आणीबाणीनंतर १९७७ मध्ये झालेल्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष पराभूत झाला आणि लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेला जनता पक्ष सत्तेत आला. पुढे जनता पक्षाअंतर्गत मतभेदामुळे कोसळला. त्यानंतर १९८० च्या सुमारास भारतीय जनता पक्ष स्थापन झाला व त्याने उजव्या राष्ट्रवादी विचारांची कास धरून वाटचाल सुरू केली. दरम्यानच्या काळात अनेक आघाडी सरकारे भारतात सत्तेवर आली. अनेक राजकीय प्रयोग झाले. पी.व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस आघाडी सरकारने आर्थिक उदारीकरणाला गती दिली. परंतु अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे पहिले बिगर काँग्रेस सरकार सत्तेवर आले. त्यानंतर १० वर्षे २०१४ पर्यंत दहा वर्षे डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्त्वखाली यू.पी.एस. सरकार कार्यरत होते. २०१४ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०१४ आणि २०१९ च्या निवडणुका जिंकल्या. २०१४ साली भाजपाला २८२ जागा मिळाला होत्या तर २०१९ मध्ये ३०३ जागा मिळाल्या होत्या. तर रालोआ आघोडीला ३३६ जागा मिळाल्या होत्या. यावेळी भाजपाला ३७ टक्के मते मिळाली होती.

लॉर्ड ब्राईस या राज्य शास्त्रज्ञाने 'द मॉडर्न डेमोक्रसीज' या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, काही कालावधी उलटला की राजकीय पक्ष हे जणू काही समान विकास कार्यक्रम असलेल्या दोन भिन्न पर्यायी संघटना बनतात. फक्त फरक असतो तो त्यांच्या उजव्या किंवा डाव्या कलाचा. यावेळी भाजपाचा विकास जाहीरनामा व काँग्रेसचे न्यायपत्र या दोन्हीमध्ये विकास हा समान मुद्दा प्रकट झालेला दिसतो. परंतु प्रसारमाध्यमामध्ये विकासाच्या पैलुबाबत गांभीर्याने चर्चा झाली नाही. काही तज्ज्ञ मुद्दा नसलेली ही निवडणूक होती असे म्हणतात. त्यांच्या मतामध्ये काही प्रमाणात तथ्य असले तरी देखील, भारतामध्ये घडून आलेली राजकीय ध्रुवीकरणाची प्रक्रिया मोठी उद्बोधक आहे.

भारतीय राज्यघटनेतील कलम ८३ नुसार दर ५ वर्षांनी लोकसभेच्या निवडणुका संपन्न होणे ही बाब अपरिहार्य असते. त्यामुळे दर ५ वर्षांनी येणारा हा लोकशाहीचा उत्सव भारतामध्ये अधिक निष्ठेने, संयमाने आणि तेवढाच विचारपूर्वक साजरा केला जातो. लोकसभेच्या ५४३ जागांपैकी आधीच १ जागा बिनविरोध निवडून आल्यामुळे ५४२ जागांसाठी निवडणूक पार पडली.

राजकीय संस्कृतीमध्ये बदल :

अयोध्येतील बाबरी मशिदीचा ढाचा कारसेवकांनी पाडला आणि भारतात वृथा धर्मनिरपेक्षता संपली, अशी प्रतिक्रिया त्यावेळी 'लंडन टाइम्स' या वृत्तपत्राने दिली होती. आता युरोप आणि जगामध्ये सुद्धा इमिग्रेशन किंवा स्थलांतराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. तेथील लोकांना आता भारतातील हिंदुत्व प्रमाणे ख्रिश्चनत्त्वाचा मुद्दा घेऊन निवडणुका लढवण्याची वेळ आली आहे. नेदरलँड्मध्ये घडले त्याचीच पुनरावृत्ती इतर युरोपीय देशांमध्ये घडू शकते. युरोपातील ७० देश निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यामध्ये भारतीय वंशाचे ऋषी सुनक हुजूर पक्षाचे नेते म्हणून निवडणूकीला सामोरे जात आहेत. निर्वासितांना रवांडा या बेटावर स्थलांतरित करण्याची मोठी योजना केली जात आहे आणि तेथील जनतेकडून त्यांना पाठिंबाही मिळत आहे. इमिग्रेशनचा मुद्दा जेवढा ऐरणीवर येईल तेवढा युरोपामध्ये उजव्या विचारांचा प्रभाव दिसू लागेल. भारतात अयोध्येत श्रीराम मंदिराच्या उभारणीनंतर घडून आलेल्या सांस्कृतिक बदलामुळे भारतीय मतदारावर त्याचा किती प्रभाव पडला आणि त्यामुळे कसे स्थित्यंतर घडत आहे याचे चित्र पुढे येणाऱ्या निवडणुकीच्या निकालावरून अधिक स्पष्ट होणार आहे. अमेरिकेच्या फिलाडेलफिया विद्यापीठातील प्रा. क्रेज बेकस्टर यांनी लिहिलेल्या 'द जनसंघ' या ग्रंथात असे म्हटले होते की, भारतामध्ये भक्कम अशी पर्यायी राजकीय संस्कृती देणारा पर्यायी पक्ष म्हणून या पक्षाचे वैशिष्ट्य त्याच्या सेवाभावी पक्षनेत्यामध्ये व अनुशासित कार्यकर्त्यामध्ये आहे. भविष्यकाळात भाजपाने जनसंघत्त्व टिकविण्याची आवश्यकता आहे.

विकास महत्वाचा मुद्दा :

२०२४ ही निवडणुक कुठल्याही मुद्यावर झाली नाही, असा शोध काही पत्रकारांनी लावला; पण तो काही फारसा पटण्यासारखा नाही. या निवडणुकीतील प्रमुख पक्षाच्या जाहीरनाम्यांचा तौलनिक अभ्यास केला असता असे दिसते की, विकास हाच सर्व पक्षाच्या जाहीरनाम्यातील समान सुवर्णधागा राहिला.

लोकशाही जीवनाचा मार्ग :

अठराव्या लोकसभेसाठी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कुठल्या आघाडीला बहुमत मिळेल यापेक्षाही लोकशाही जीवनाचा मार्ग कशी बनेल हा खरा प्रश्न आहे. त्यासाठी आगामी काळात पुढील तीन बाबीवर भर दिला पाहिजे. १) टी.एन. शेषन यांच्या काळातील आदर्श निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. २) प्रत्येक राज्यामध्ये १०० टक्के मतदानाचे लक्ष्य ठेवून किमान ७० ते ८० टक्के मतदान करण्यावर भर दिला पाहिजे. ३) राजकीय पक्षांच्या रचना व कार्यपद्धतीत सुधारणा होण्यासाठी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षण व प्रबोधनावर भर दिला पाहिजे.

समारोप :

स्वातंत्र्याची ७५ वर्षे प्रगल्भ लोकशाहीचा पर्व काळ आहे. सत्ताधारी व विरोधी आघाडीने उच्च संसदीय परंपराचे पालन करून देशाच्या सर्वांगिण विकासासाठी परस्पर समन्वय व सहकार्यातून विकसित भारताच्या दिशेने गरूडझेप घेण्याची वेळ आली आहे. २१ व्या शतकाच्या शेवटी सामाजिक, आर्थिक समतेचे रूपांतर सांस्कृतिक समतेमध्ये सुद्धा करावे लागणार आहे. वेद, गीता आणि बुद्धाच्या धम्मपदाचा व महावीराच्या प्रवचनाचा अर्थ सम्यक जीवनशैलीत आहे. असा मध्यम मार्ग भारतीय लोकशाहीला नवी संजीवनी देऊ शकेल. प्रश्न कोणाच्या विजयाचा किंवा पराभवाचा नसून प्रश्न आहे तो लोकशाही भारतीय जीवनाचा मार्ग कशी बनेल? यातच भारताचे श्रेष्ठत्व प्रकट होणार आहे. तोच लोकशाहीचा खरा सुवर्ण काळ असेल. संविधानाचे शिल्पकार डॉ. आंबेडकर म्हणतात, ध्येय मंदिराकडे जातांना वाटेत प्रचंड वादळ होईल, हातातील नंदादीप विझेल, तेव्हा हृदयातील नंदादीप तेवत ठेवून ध्येयमंदीर गाठण्याचा प्रयत्न करावा. हे वादळातील दिवे आपल्या लोकशाहीची नौका पैलतीरी नेण्यासाठी दीपस्तंभाप्रमाणे पथदर्शक ठरतील यात शंका नाही.

**– डॉ. विजय कुमार**




**पंचांग**

मंगळवार, दिनांक ४ जून २०२४ **वैशाख** कृ. १३, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, उत्तरायण. वसंत ऋतू. **नक्षत्र** : भरणी योग : शोभन अतिगंड, करण : गरज भौमप्रदोष, शिवरात्री, सूर्योदय : स.०६.०८ सूर्यास्त : सायं.०७.१८ वा., **राहू काळ :** दुपारी : ३:०० ते ४:३०

**दिनविशेष**

*१९३२ : रामकृष्ण परमहंस यांचे परमभक्त आणि श्रीरामकृष्ण कथामृत या सुप्रसिद्ध ग्रंथाचे लेखक महेंद्र गुप्ता यांचे निधन. (१९३२) ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, विश्वभारती विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. आशिन दासगुप्ता यांचे निधन. *१७३८ : ब्रिटनचा सम्राट तिसरा जॉर्ज यांचा जन्म. *१७८४ : पहिल्या स्त्रीचे हवाई उड्डाण. मादाम थिबल ही ऑपेरा गायिका गरम हवेने भरलेल्या फुग्याच्या साहाय्याने आकाशगामी बनली. *१८७७ : हेन्रिख ऑटो विल्मॉट यांचा जन्म. त्यांना अमायनो आम्लांवरील संशोधनाबद्दल १९२७ चे नोबेल पारितोषिक देण्यात आले. *१९१० : पाणी व जमीन या दोहोंवर संचार करणाऱ्या हॉवरक्राफ्टचा जनक हेन्री कॉकरेलचा जन्म. *१९९३ : आयएनएस म्हैसूर या विनाशिकेचे जलावतरण *१९९४ : हिंदी चित्रसृष्टीतील ज्येष्ठ गीतकार मजरूह सुलतानपुरी यांना चित्रपट क्षेत्राच्या विकासात ५० वर्षे मोलाची कामगिरी बजावल्याबद्दल दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर.

**राशीभविष्य**

***मेष** : वैवाहिक जीवनात ताणतणाव जाणवतील. ***वृषभ** : कामाचा व्याप वाढेल. ***मिथुन** : संततीचा सहवास लाभेल. ***कर्क** : गृहसौख्य बिघडल्यासारखे होईल. ***सिंह** : गाठीभेटी, प्रवास इ.साठी खूप धावपळ होईल. ***कन्या** : स्वतःची गुणवत्ता वाढविण्याची गरज भासेल. ***तुळ** : उत्साहाने कामे कराल. ***वृश्चिक** : अवास्तव खर्च होईल. ***धनु** : आर्थिक लाभाच्या घटना घडतील. ***मकर** : मुत्सद्दीपणाने कामे होतील. ***कुंभ** : कायदेशीर बाबी सांभाळा. ***मीन** : सर्दी–पडसे, थकवा जाणवेल.

**मेसेज आया**



प्रेम आहे नि:शब्द
शब्दांनाही न सापडणारं
प्रेम आहे गुपित
कोणालाही न उलगडणारं
प्रेम आहे भावनिक
स्पर्शालाही न कळणारं
प्रेम आहे जीवन
मरणानेही न संपनारं...

**व्यक्तीविशेष**

## रामकृष्ण परमहंस

हे एकोणिसाव्या शतकातील भारतात बंगालमध्ये होऊन गेलेले जगद्विख्यात गूढवादी सत्पुरुष होते. स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंसांचे प्रमुख शिष्य होते. आधुनिक भारतीय धर्मप्रबोधनात त्यांनी मोलाची कामगिरीबजावली. ते त्यांच्या शिष्यांमध्ये ईश्वराचे अवतार मानले जातात. रामकृष्ण परमहंस ग्रामीण बंगालमधील एका गरीब वैष्णव ब्राह्मण परिवारात जन्मले. कोलकात्याच्या दक्षिणेश्वर मंदिरात त्यांनी काही काळ पौरोहित्य केले, त्यानंतर शाक्तपंथीयांच्या प्रभावाने काली आराधना सुरू केली. रामकृष्णांच्या आरंभीच्या काही प्रसिद्ध आध्यात्मिक गुरुंमध्ये भैरवी ब्राह्मणी या साध्वीचा समावेश होतो. तंत्र व वैष्णव भक्तीमध्ये भैरवीला गती होती. नंतर रामकृष्णांच्या म्हणण्यानुसार एका अद्वैत वेदान्तीच्या मार्गदर्शनाखाली त्यांना निर्विकल्प समाधी अनुभवता आली. रामकृष्णांनी इतर धर्मांबाबतही, विशेषतः इस्लाम व ख्रिश्चन धर्माबाबत प्रयोग केले आणि हे सर्व धर्म एकाच ईश्वराकडे घेऊन जातात असे म्हटले. ग्रामीण बंगाली भाषेतील छोट्या छोट्या कथांचा तेथील जनतेवर बराच प्रभाव पडला. त्यामुळे रुढार्थाने अशिक्षित असतानाही रामकृष्ण बंगाली विद्वज्जन समाजाचे व शिक्षित मध्यमवर्गाचे लक्ष वेधण्यास यशस्वी ठरले. १८७० च्या दशकाच्या मध्यापासून पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या बुद्धिजीवींवर त्यांचा प्रभाव पडला व नंतर ते बंगालमधील हिंदू प्रबोधनाचे उद्गाते ठरले. सर्व धर्मीयांसाठी त्यांचा 'जतो मत, ततो पथ (जितकी मते, तितके पंथ) हा उपदेश सहिष्णुतेचे प्रतीक आहे. परमहंसांचे खालील उद्गार प्रसिद्ध आहेत.

**व्यक्तिमत्व**

## विकासाचा मूलमंत्र

मग एखादे काम राहून जात असे. ही सारी कामे करताना आपल्या हातातून एखादे काम राहून तर जाणार नाही ना ? या कल्पनेने त्यांच्या मनावर दडपणही येत असे. एवढे करून ते संध्याकाळी किंवा उशिरा रात्री घरी येत तेव्हा विलक्षण थकलेले असत. थकलेले असले तरीही त्यांना झोप येत नसे. कारण त्याचवेळी त्यांच्या मनात उद्या करायच्या कामांचा गोंधळ उडालेला असे. ही सारी कामे अंगावर न घेणे हा या गोंधळावरचा खासा उपाय होता खरा पण त्यांच्या रक्तातच सार्वजनिक कामाच्या पेशी होत्या. एखादे वेळी असली काहीच कामे नसली तर त्यांना करमतही नसे. ते संध्याकाळी लवकर घरी परत आले तर त्यांच्या पत्नीलाही चुकल्या चुकल्या सारखे वाटत असे. एवढी कामे करून नारायणरावांना समाधानही नव्हते. पण एकदा ते कार्यक्षमता वाढवण्याविषयीच्या एका वर्गात गेले असता त्यांना एक सोपा उपाय ऐकायला मिळाला. आपल्या मागे अनेक कामे असतील आणि त्यामुळे आपण गोंधळून जात असू तर रोज रात्री झोपताना उद्या करावयाच्या कामांची यादी करावी, असे या वर्गात सांगण्यात आले होते. नारायणरावांनी हा उपाय आपल्या जीवनात उतरवला आणि त्यांच्या जीवनात एक मोठे परिवर्तन आले. (क्रमश:)

**जिज्ञासा**

## शोध लेझर किरणांचा

लेझरच्या शोधानंतर लगेचच उद्योगपतींपासून सैन्यदलापर्यंत साऱ्यांचे लक्ष याकडे वेधले गेले. इतकेच नाही तर मुलांच्या कॉमिक्समधील खलनायकदेखील लेझर बंदुकांचा वापर करू लागले. शास्त्रज्ञ आणि इंजिनिअर्स यांच्यामध्ये या तंत्राच्या कक्षा किती रुंद आहेत, हे जाणून घेण्यासाठी जणू स्पर्धाच लागली. १९६९ मध्ये एनेट लीथ आणि ज्युरिस उपानिक्स या जोडीने लेझर तंत्राच्या साहाय्याने त्रिआयामी होलोग्राफिक चित्र बनवले. यासाठी त्यांनी दोन वेगवेगळ्या शक्तीच्या लेझर किरणांचा वापर केला होता. यामुळे तयार झालेले चित्र अधिक स्पष्ट होते आणि त्याची खोटी प्रतिकृती बनवणेदेखील जवळपास अशक्य होते.(उत्तरार्ध)

**नवं संशोधन**

## पारदर्शी माती

संशोधकांनी सर्वप्रथम या मातीचा प्रयोग काही प्राणघातक ईकोलाय किंवा बॅक्टेरिया ल्यॅट्स रूटशी कसा संपर्क साधतात हे जाणण्यासाठी प्रयोग केला. त्यांनी जेली फिशच्या हिरव्या फ्लोरोसन्ट प्रोटिन एक्स्ट्रेकपासून हा खास बॅक्टेरिया बनवला. हे फ्लोरोसन्ट स्वच्छ मातीसोबत मिसळून कशाप्रकारे बॅक्टेरिया मुळांच्या आसपास कॉलनीज बनवतात आणि कशा प्रकारे संपूर्ण झाडाला दूषित करतात हे बघण्यासाठी मदत करतात. एकदा ही संपूर्ण प्रक्रिया चांगल्या प्रकारे समजावून घेतल्यानंतर या धोकादायक बॅक्टेरियांना ल्याट्स आणि स्ट्रॉबेरीसारख्या ताज्या उत्पादनापर्यंत पोचता येऊ नये म्हणून शास्त्रज्ञांना इलाज करता येईल. याचबरोबर मुळे कशाप्रकारे न्यूट्रियन्स शोषतात हेदेखील बघता येऊ शकते. तसेच वैज्ञानिक उत्तम रूट सिस्टीमचाही विकास करू शकतील ज्यामुळे झाडांना अधिक खताची आवश्यकता पडणार नाही. यानंतरचे संशोधकांपुढचे आव्हान म्हणजे पारदर्शी माती बनविण्याचा खर्च कमी कसा करता येईल. जेणेकरून जगभरातील शास्त्रज्ञ स्वास्थ वृक्षांची आणि भाज्यांची शेती करण्यासाठी परिणामस्वरूप उपाय शोधू शकतील. (उत्तरार्ध)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ३**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | | | 2 |
| 2 | 1 | 4 | |
| | | | 4 |
| | 4 | 2 | 1 |

**क्रमांक २ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 4 | 2 | 3 |
| 3 | 2 | 1 | 4 |
| 4 | 1 | 3 | 2 |
| 2 | 3 | 4 | 1 |

**हसा चकटफू**


गंगूबाई बरेच दिवस कामावर आली नाही म्हणून ठमाकाकू तिच्या घरी तिची चौकशी करायला गेल्या. तिच्या घराचा दरवाजा बंद होता. ठमाकाकूंनी दार वाजवले.

**गंगूबाई (आतून)** : कोण आहे?
**ठमाकाकू** : मी.
**गंगूबाई** : मी कोण?
**ठमाकाकू** : तू तर गंगूबाई आहेस ना?

**महिलायन**

## सौंदर्योपचार करा 'नॅचरल'

चेहऱ्यावरील वयाच्या खुणा झाकण्यासाठी अलिकडे बरेच अँटी एजिंग क्रिम बाजारात आल्या आहेत. पण यापैकी बऱ्याच क्रिममुळे त्वचेचे मोठे नुकसान होऊ शकते. त्वचेवरील सुरकुत्या टाळायच्या असल्यास बटाट्याचा किस करून त्याचा रस पिळून घ्यावा. त्यामध्ये मुलतानी मातीची पावडर मिसळावी आणि थोडा मध घालावा. हे मिश्रण २० ते २५ मिनिटे चेहऱ्यावर लावावे. नंतर चेहरा धुवून टाकावा. हा उपाय आठवड्यातून दोन ते तीन वेळा केल्यास नक्कीच फायदा दिसून येईल. चेहऱ्यावरचे डाग घालवण्यासाठी किंवा झाकण्यासाठी तऱ्हेतऱ्हे प्रसाधने वापरले जाते. त्याऐवजी मेथीची पाने निवडून ती धुवून वाटावीत.



पाणांचा रस करून तो चेहऱ्याला लावावा, रोज असे केल्यास डाग काही दिवसांतच जातात. त्वचा सावळी असेल तर ती निरोगी आणि उजळ बनवण्यासाठी मध, हळद आणि लिंबू यांचे मिश्रण नियमितपणे चेहऱ्यावर लावावे. तर तेलकट आणि सुरकुतलेल्या त्वचेसाठी जवसच्या पिठात दूध एकत्र करून त्यात थोडा लिंबू मिसळावा. हे मिश्रण कालवून त्याचा लेप चेहऱ्यावर लावावा. १०–१५ मिनिटांनी चेहरा धुवावा, असे आठ ते दहा दिवसांतून एकदा करावे. त्वचा ताजी तवानी दिसू लागते. उन्हाळ्यात कडक उन्हाची उष्मा त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकते. घाम चिकट पणा यामुळे त्वचेवरील रंध्रे बंद होऊ शकतात. तसे होऊ नये म्हणून स्नानाच्या पाण्यात लिंबाचा रस घालावा आणि त्याने अंघोळ करावी. समप्रमाणात टोमॅटो गाजरे काकडी यांचा रस घेऊन तो त्वचेवर लावावा, यामुळे त्वचे तुकतुकीत आणि मुलायम बनते. अशा प्रकारे आपण छोट्या छोट्या घरगुती उपायांनी त्वचा तजेलदार ठेऊ शकतो. (उत्तरार्ध)

**गंमतग्यान**

## सौरडाग म्हणजे काय?

सूर्याच्या पृष्ठभागावर नेहमीच विद्युत चुंबकीय वादळे होत असतात. त्याचा परिणाम म्हणून सूर्यावर डाग दिसतात. लांबून हे डाग लहान दिसत असले तरी त्यांचा विस्तार साधारणपणे ८० हजार किमी ते अडीच लाख किलोमीटर एवढा असतो. या सौर डागांचा आपल्याला काही त्रास होतो का ? तर होतो. पण ज्यावेळी या डागांची संख्या वाढते तेव्हा. पृथ्वीच्या वातावरणात चुंबकीय कण येतात त्यामुळे रेडिओ तरंगांच्या दळणवळणात व्यत्यय येतो. सौर डाग हे कायम रहात नाहीत. ते काही काळानंतर नष्ट होतात. पण पुन्हा दुसरीकडे निर्माण होतात. सौरडागांवर अलीकडच्या काळात बरेच संशोधन झाले आहे आणि अजूनही सुरू आहे. (उत्तरार्ध)

# विश्ववेध

## साबणाने हलवली भव्य इमारत !

हल्ली एखादे जुने झाड किंवा इमारत विकासकामांच्या मार्गात आली तर त्यांना पाडण्याऐवजी अन्यत्र हलवण्याची सोय निर्माण झालेली आहे. जगभरात अनेक ऐतिहासिक इमारती, घरे अन्यत्र हलवलेली आहेत. अगदी भारतातही इमारतींचे स्थलांतर झाले आहे. आता कॅनडातील नोव्हा स्कॉशियामध्ये याबाबतचा एक अनोखा प्रकार घडला आहे. तिथे चक्क साबणाच्या मदतीने तब्बल २२० टन वजनाची इमारत दुसरीकडे हलवण्यात आली. या स्थलांतराचा एक व्हिडीओही समोर आला आहे. कॅनडातील हॅलिफॅक्समधील ही इमारत सन १८२६ मध्ये बांधण्यात आली होती. कालांतराने या इमारतीचे व्हिक्टोरियन एल्मवूड हॉटेलमध्ये रूपांतर झाले. आता ही जुनी इमारत पाडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र,



रिअल इस्टेट कंपनी गॅलेक्सी प्रॉपर्टीजने ही इमारत नवीन ठिकाणी हलवण्याची योजना आखली. कंपनीने ज्या पद्धतीने ही संपूर्ण इमारत हलवली, ते खरोखरच आश्चर्यजनक आहे. एस रश्टन कन्स्ट्रक्शन फर्मच्या टीमने सुमारे ७०० साबणांच्या मदतीने हे हॉटेल नवीन ठिकाणी हलवले. कंपनीचे मालक शेल्डन रश्टन यांनी सांगितले की, रोलर्स वापरण्याऐवजी त्यांनी रोलरच्या आकाराचे साबण वापरले. हे साबण अतिशय मऊ होते, ज्यामुळे इमारत सरकवण्यास मदत झाली. अशा साबणांच्या मदतीने ही इमारत ३० फूट दूर हलवण्यात आली.

## अंगठा असलेला दुर्मीळ डॉल्फिन

**ग्रीसच्या 'गल्फ ऑफ कोरिंथ' मध्ये एका अत्यंत दुर्मीळ आणि विचित्र अशा डॉल्फिनचा शोध लागला आहे. त्याने त्याच्या फ्लिपर्सवर म्हणजे दोन्ही बाजूंच्या परांवर हूकसारखे दिसणारे अंगठे विकसित केलेले आहेत. पेलागोस सेटाशियन रिसर्च इन्स्टिट्यूटच्या संशोधकांनी दोन वेळा हा डॉल्फिन पाहिला आहे.**

या डॉल्फिनची काही छायाचित्रेही प्रसिद्ध करण्यात आली आहेत. ग्रीसच्या नाऱ्याजवळ बोट सर्व्हे करीत असताना हा डॉल्फिन दोनवेळा दिसून आला होता. त्याच्या फ्लिपर्सवर असे 'अंगठे' असले तरी त्याचे पोहणे सर्वसामान्य डॉल्फिनसारखेच आहे. या अंगठ्यांमुळे त्याच्या पोहण्याची गती, उड्या मारणे, वळणे, खेळणे यावर परिणाम झालेला नाही. अलेक्झांड्रोस फ्रांटझिस यांनी याबाबतची माहिती दिली. त्यांनी सांगितले की गेली तीस वर्षे आम्ही खुल्या समुद्रात सर्व्हे करीत आहे;


पण प्रथमच अशा प्रकारचा डॉल्फिन आम्ही पाहिला. त्याची फ्लिपर मॉर्फोलॉजी अनोखीच आहे. फ्रांटझिस यांनीच या डॉल्फिनची छायाचित्रे टिपली आहेत. कोरिंथचे आखात हे ग्रीकची मुख्यभूमी आणि पेलोपोनीज पेनिन्सुलामधील लोनियन समुद्राचा अडकलेला भाग आहे. तिथे डॉल्फिनच्या अनेक प्रजाती आढळतात. त्यामध्ये कॉमन डॉल्फिन, रिस्सोज डॉल्फिन, स्ट्रीप्ड डॉल्फिन्स आदींचा समावेश आहे.



## प्राचीन मूर्तीत 'क्यूआर कोड?'

सध्या ऑनलाईन पेमेंटचा जमाना आहे आणि त्यासाठी क्यूआर कोड स्कॅन केला जात असतो. असा क्यूआर कोड तीन हजार वर्षांपूर्वीच्या एखाद्या मूर्तीमध्ये पाहायला मिळेल याची आपण कल्पनाही करणार नाही. मात्र, सध्या असा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे ज्यामध्ये डोक्याच्या जागी 'क्यूआर कोड' सारखी रचना असलेली एक मूर्ती पाहायला मिळते. ही मूर्ती तीन हजार वर्षांपूर्वीची आणि माया संस्कृतीमधील असल्याचे म्हटले जाते.

काही प्राचीन मूर्तीमध्ये मोबाईल आणि लॅपटॉपचाही भास होत असल्याचे यापूर्वी दिसून आले होते. त्यामुळे प्राचीन लोकांना भविष्याचा अंदाज घेता येत होता का, प्राचीन काळातही आधुनिक उपकरणांसारखी साधने होती का, याबाबत अनेकांनी चर्वितचर्वणही केले. आता त्यासाठी हा नवा विषय मिळाला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म फेसबुकवर या मूर्तीचा फोटो एका अकाऊंटवरून शेअर करण्यात आला आहे. ही पोस्ट आतापर्यंत १६ हजारांहून जास्त लोकांनी पाहिली आहे. तर यावर अनेक वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. ही मूर्ती माया सभ्यताच्या काळातील असल्याचा दावा केला जातो. माया संस्कृती १५०० इसवी सन पूर्व काळात मेक्सिको, होंडुरास, ग्वाटेमाला आणि युकाटन प्रायद्वीपमध्ये अस्तित्वात होती. यूजर्स सोशल मीडियावर हा फोटो आणि पोस्ट शेअर करत या दाव्याचे समर्थन करत आहेत. हजारो वर्षांपूर्वी सापडलेली ही एक प्राचीन मूर्ती संशोधनकर्त्यांना सापडली आहे.



## ऑस्ट्रेलियाला कामाला जायचंय?

पैसे मिळवण्यासाठी लोक कोणत्याही देशात जातात; पण एक देश असा आहे जिथे लोकांना कामावर जायचं नाहीये. इथे अगदी छोट्या कामासाठीही लाखो रुपये पगार दिले जातात, तरीही कित्येक जागा रिक्त राहतात. पण इथे अशी परिस्थिती का आहे?

आम्ही ज्या देशाबद्दल बोलत आहोत तो आहे ऑस्ट्रेलिया. गेल्या दोन वर्षांपासून हा देश चर्चेत आहे, कारण इथे कामासाठी कित्येक उत्कृष्ट ऑफर दिल्या जात आहेत. असे असूनही या पदांवर काम करण्यासाठी लोक उपलब्ध नाहीत. काही महिन्यांपूर्वी इथे डॉक्टरच्या नोकरीसाठी



कोट्यवधींचा पगार आणि मोफत घर दिलं जात होतं, तरीही कोणीही त्यासाठी तयार नव्हतं. केवळ सुशिक्षितांनाच नोकऱ्यांमध्येच करोडोंच्या ऑफर्स येतात असंही नाही. इथे खाणींमध्ये आणि तेल खाण उद्योगात काम करणाऱ्या कामगारांनाही चांगला पगार दिला जात आहे. यासाठी ६ महिने ते १२ महिन्यांचा करार असून पगारही ५०–६० लाख रुपये आरामात मिळतो. २०२२ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या सरकारी आयोगाच्या अहवालात, देशात कौशल्याची कमतरता खूप जास्त असल्याचे सांगण्यात आले होते. २०२१ पासून हे प्रमाण वाढत आहे आणि देशात नोकरीसाठी हजारो जागा रिकाम्या आहेत. सरकारचे मंत्री इतर देशांमध्ये जाऊन लोकांना इथे काम करण्याची ऑफर देत आहेत आणि त्याचे फायदे सांगत आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये आरोग्य सेवा क्षेत्रात

हजारो नोकऱ्या आहेत. विशेषतः परिचारिका, सहायक आणि डॉक्टरही येथे उपलब्ध नाहीत. इतकंच नव्हे तर सॉफ्टवेअर आणि ॲप्लिकेशन प्रोग्रामरसह बांधकाम व्यवस्थापक म्हणजेच कंत्राटदारांचीही येथे गरज आहे, परंतु तेही उपलब्ध नाहीत. अशा परिस्थितीत सरकारकडून इमिग्रेशन धोरणातही बदल करण्यात येत आहेत, जेणेकरून बाहेरून लोक येथे येतील. इथे नोकरदारांच्या कमतरतेचं कारण म्हणजे लोक ऑस्ट्रेलियात शिकायला जातात; पण तिथे कोणीही राहू इच्छित नाही. हा देश खूप सुंदर असला तरी लोकांना तिथे आपलं घर बनवायचं नाही. मात्र, हे देखील वास्तव आहे, की कठोर बॉर्डर रूल्स आणि व्हिसा नियमांमुळे लाखो लोकांचे व्हिसाचे अर्ज प्रलंबित राहतात. मात्र, एकदा इथे पोहोचल्यानंतर ट्रक चालवूनही ५०–६० लाखांची कमाई होऊ शकते, असे इथे राहणारे ट्रकचालक ॲशले सांगतात.

## गुणकारी काळी गाजरे!

पूर्वी हिवाळा आला की बाजारात लालचुटुक गाजरंही दिसू लागत. आता अनेक शहरात बारमाही गाजरे दिसतात. गाजरांचे सेवन आरोग्यासाठी लाभदायक असते. मात्र, केवळ लालच गाजरं असतात असे नाही. काळीही गाजरे असतात व ती लाल गाजरापेक्षाही



अधिक गुणकारी असतात हे तुम्हाला माहिती आहे का?

'सायन्स डायरेक्ट'वर प्रकाशित झालेल्या संशोधनात असे म्हटले आहे की काळ्या गाजरांमध्ये लाल आणि केशरी गाजरपेक्षा जास्त फ्लेव्होनॉइडस् असतात. यापैकी क्वेरसेटीन, ल्यूटोलिन, केम्पफेरॉल आणि मायरिसेटिन प्रमुख आहेत, जे शरीराला अनेक फायदे देतात. फ्लेव्होनॉइडस्मध्ये अँटिऑक्सिडंटस्, अँटी– इन्फ्लेमेटरी, इम्युनो बूस्टर गुणधर्म असतात. हे गुणधर्म मुक्त रॅडिकल्स, जळजळ आणि कमकुवत रोगप्रतिकारक प्रणालीपासून संरक्षण करतात. अशा 'फ्री रॅडिकल्स' मुळे १०० पेक्षा जास्त रोग होऊ शकतात.

संशोधनात काळ्या गाजराचे 'मधुमेहविरोधी अन्न' म्हणून वर्णन केले आहे. यात फिनोलिक संयुगे असतात, ज्यामध्ये रक्तातील साखर नियंत्रित करण्याची शक्ती असते.

त्याचे सेवन मधुमेहाच्या घातक परिणामांपासून संरक्षण करण्यास मदत करू शकते. केमोथेरपीमुळे कर्करोगाचे उपचार सोपे झाले आहेत, परंतु ते खूप वेदनादायक ठरू शकतात. त्यामुळे जगभरात कर्करोगाच्या उपचार आणि प्रतिबंधात हर्बल आणि आयुर्वेदिक उपायांचाही विचार केला जात आहे. फळे आणि भाज्यांप्रमाणे, काळ्या गाजरामध्ये देखील कर्करोगापासून संरक्षण करणारे फायटोकेमिकल्स असतात. यामध्ये असलेले पॉलिफेनॉल आणि आहारातील फायबर हानिकारक पदार्थांना रोखतात. तसेच पचन आणि चयापचय वाढवतात. अशा पदार्थांचा आहारात समावेश केल्याने शरीरातील चरबी कमी होते आणि वजन कमी होते.

काळ्या गाजरामध्ये फायबर आणि बायोॲक्टिव्ह कंपाऊंड असतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी लाभदायक आहेत. यामुळे शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल आणि साखरेचं प्रमाण कमी करण्यास मदत करते. काळ्या गाजरांमध्ये भरपूर कॅरोटिनोइडस् असतात, जे डोळ्यांसाठी खूप महत्त्वाचे असतात. मानसिक आरोग्याच्या समस्या, संधिवात, उच्च रक्तदाब आणि अस्वास्थ्यकर त्वचा असलेल्या लोकांसाठीही काळी गाजरं लाभदायक ठरतात.

## किमया मस्क यांच्या रोबोची

'स्पेस एक्स', 'एक्स' आणि 'टेस्ला'चे सर्वेसर्वा एलन मस्क यांनी आता एक नवा रोबो सादर केला आहे. 'टेस्ला'च्या या ह्युमनॉईड रोबो म्हणजेच मानवाकृती रोबोची आता सर्वत्र चर्चा आहे. 'ऑप्टिमस जेन २' नावाचा हा नव्या पिढीचा रोबो असून हे अपग्रेडेड मॉडेल तीस टक्के अधिक वेगाने चालू शकते. तसेच त्याच्यामधील संतुलनही अधिक चांगले आहे. त्याचे वजनही आधीच्या तुलनेत दहा किलोने कमी आहे. 'टेस्ला'चे सीईओ मस्क यांनी या रोबोचा व्हिडीओ शेअर केला आहे. त्यामध्ये तो नृत्य व स्केंट करीत असताना दिसून येतो. 'ऑप्टिमस'साठी ही बरीच मोठी प्रगती आहे. याचे कारण म्हणजे एक वर्षापूर्वीपर्यंत तो मदतीशिवाय चालूही शकत नव्हता. ऑप्टिमस रोबोला सर्वप्रथम सप्टेंबर २०२२ मध्ये सादर करण्यात आले होते. हा ५.८ फूट उंच आणि सुमारे ५०



किलो वजनाचा रोबो आहे. टेस्ला फॅक्टरीमध्ये या रोबोचा वापर होईल. सुपरमार्केटमधील खरेदीपासून ते फॅक्टरी प्रॉडक्शन लाईनवर काम करण्यापर्यंतची अनेक कामे हा रोबो करू शकेल. टेस्लाने या रोबोच्या किमतीविषयी काहीही सांगितलेलेनाही. मस्क यांनी सोशल मीडियाप्लॅटफॉर्म 'एक्स' (ट्विटर) वर त्याचा व्हिडीओ शेअर केला आहे. त्यामध्ये हा रोबो स्वतःचे संतुलन साधत स्केंट करताना दिसतो. तसेच तो नृत्यही करू शकतो. त्याच्या हातांची रचनाही बदलण्यात आली आहे. नाजूक आणि मजबूत वस्तूंना कसे पकडावे व कसे उचलावे याची त्याला समज आहे. व्हिडीओमध्ये तो अंडी उचलून अन्यत्र ठेवत असताना दिसतो. हा रोबो चक्क योगासनेही करू शकतो हे विशेष!

## आर्क्टिक महासागर बर्फहीन होणार?

जागतिक तापमानवाढीचा सर्वाधिक परिणाम ध्रुवीय प्रदेशांवर विशेषतः उत्तर ध्रुव म्हणजेच आर्क्टिक प्रदेशावर दिसून येत आहे. आता एका नवीन संशोधनात असे



आढळले की आर्क्टिक महासागरातील बर्फ २०३० पर्यंत पूर्णपणे नाहीसा होऊ शकतो, याचा अर्थ २०३० पर्यंत या महासागरात उन्हाळ्यात बर्फ दिसणार नाही. 'नेचर कम्युनिकेशन्स' या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. १९७९ तें १०१९ पर्यंतचा डेटा, उपग्रह प्रतिमा आणि हवामान मॉडेल्सचे विश्लेषण करून असे सांगण्यात आले की आर्क्टिक प्रदेशातील बर्फ अंदाजापेक्षा वेगाने वितळत आहे. २०२१ मध्ये, युनोच्या पर्यावरण पॅनेलने सांगितले की शतकाच्या मध्यापर्यंत आर्क्टिक बर्फमुक्त होईल. अशी परिस्थिती अवघ्या दहा वर्षांतच होईल. आर्क्टिकचे तापमान इतर जगाच्या चारपट वेगाने वाढत आहे. गेल्या ४० वर्षांत, उन्हाळ्यानंतर राहिलेला बहुस्तरीय बर्फ ७० लाख चौरस कि.मी. वरून ४० लाख चौरस कि.मी. इतका कमी झाला आहे. जो भारताच्या क्षेत्रफळाइतका आहे.

या वेगाने वितळत असलेल्या बर्फामुळे महासागरा तील जलस्तर वाढेल, सागरी प्रवाह, मान्सून प्रभावित होईल जागतिक समुद्राची पातळी सध्या दरवर्षी ४.५ मि.मी.ने वाढत आहे, जी बर्फ वितळल्याने आणखी वेगाने वाढेल.

आर्क्टिकवर पडणारे बहुतेक किरण बर्फाने परावर्तित होऊन आकाशात परत जातात. बर्फ नसल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढेल. सागरी प्रवाह, मान्सून, चक्रीवादळ आणि जलचर वनस्पती आणि जीवजंतू प्रभावित होतील. आर्क्टिक बर्फ समाप्तीमुळे उष्णतेच्या लाटा, जंगलातील आग, पूर यासह अत्यंत हवामानाच्या घटनांमध्ये वाढ होईल.

## पाण्यात राहिल्याने सुरकुत्या का पडतात?

**ण्यात बऱ्याच वेळ आपली हाताची किंवा पायाची बोटं असली की त्यावर रिंकल्स म्हणजेच सुरकुत्या येतात. मात्र, पाण्यातून बाहेर आल्यानंतर थोड्या वेळातच हाताची आणि पायाची बोटं आधी प्रमाणे सामान्य होऊ लागतात. असं का होतं याचा विचार तुम्ही कधी केला आहे का?**

पाण्यात बऱ्याचवेळा हात किंवा पाय ठेवल्याने आपल्या बोटांना सुरकुत्या येणे ही एक साधारण गोष्ट आहे. त्याचे कारण म्हणजे 'सेबम'. हा एक तेलकट पदार्थाप्रमाणे घटक आहे. त्याची कमतरता असणे किंवा जास्त असणे या दोन्ही गोष्टी चिंतेचा विषय असतात. कमी सेबम असणे ही त्वचेशी असलेली मोठी समस्या असते. कमी सेबममुळे त्वचेशी संबंधित अनेक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे पिंपल्सचीही समस्या होऊ शकते. सेबम तेल जास्त असल्याने आपण जेव्हा अंघोळ करतो तेव्हा आपल्या अंगावरून लगेच पाणी वाहून जाते. ते अंगावर थांबत नाही. जेव्हा आपण पाणी खूप वेळ ओततो किंवा पाण्यात आपले शरीर ठेवतो तेव्हा आपल्या शरीरातील सेबम कमी होते आणि पाणी शरीरात शिरायला सुरूवात होते. यामुळेच आपली त्वचा आणि बोटे संकुचित होण्याच्या या प्रक्रियेला 'ऑस्मोसिस' म्हणतात.

इंग्रजीत याला 'एक्काटिक रिंकल्स'असेही म्हणतात. जेव्हा ती व्यक्ती पाण्यातून बाहेर येते तेव्हा काही वेळाने बोटे पुन्हा मूळ स्वरूपात येतात. असे होते कारण त्वचेच्या आत असलेले पाणी हळूहळू कोरडे



होऊ लागते. हात आणि पायांमध्ये केराटिन असते, जे एक प्रकारचे प्रथिन आहे. केराटिन नावाचे हे प्रथिन शरीरातील पाणी कोरडे करण्याचे काम करते. हात आणि पायांमध्ये भरपूर केराटिन असल्याने शरीराचे हे दोन्ही भाग पाण्यात लवकर संकुचन पावू लागतात.

## सर्वात महागडी सुवर्णजडित नौका

जगभरातील अनेक धनकुबेर स्वतःचे बेट, जेट विमान किंवा हेलिकॉप्टर खरेदी करीत असतात. स्वतःची आलिशान नौका म्हणजेच यॉट असावी अशी



हौसही अनेक श्रीमंतांना असते. मात्र, एक नौका अशी आहे जी चक्क दहा हजार किलो सोने तसेच प्लॅटिनमने मढवलेली आहे. अर्थातच ही सर्वात महागडी नौका आहे. या नौकेचे नाव आहे 'हिस्ट्री सुप्रीम'. या नौकेची किंमत ४.८ अब्ज डॉलर्स इतकी आहे. 'हिस्ट्री सुप्रीम' छोटे जहाज म्हणजे एक प्रायव्हेट यॉट आहे.

'हिस्ट्री सुप्रीम' यॉटमध्ये एक मास्टर बेडरूम आहे. यामध्ये अत्यंत महागडे इंटेरियर केलेले आहे. या यॉटमध्ये अनेक लक्झरिअस सुविधा आहेत. ब्रिटनमधील रहिवासी असलेल्या स्टुअर्ट ह्यूजने 'हिस्ट्री सुप्रीम' यॉट तयार केले आहे. हे यॉट तयार करण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी लागला.

मलेशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती रॉबर्ट नॉक यांनी 'हिस्ट्री सुप्रीम' यॉट खरेदी केल्याची माहिती आहे. 'हिस्ट्री सुप्रीम' यॉटची किंमत ४.८ अब्ज डॉलर्स म्हणजेच ४,००,३८,००,००,००० रुपये इतकी आहे. इतक्या रुपयांमध्ये एक छोटसे बेटही खरेदी करता येऊ शकते. 'हिस्ट्री सुप्रीम' यॉट बनवण्यासाठी तब्बल १०,००० किलो सोन्याचा वापर करण्यात आला आहे.

## कृष्णविवर बनणार ऊर्जास्रोत

अंतराळातील सर्वात शक्तिशाली घटकांमध्ये कृष्णविवरांचा समावेश होतो. कृष्णविवरांच्या आकर्षण शक्तीतून प्रकाशकिरणही सुटू शकत नाही.

अशा कृष्णविवरांचा वापर ऊर्जेचा महत्त्वाचा स्रोत म्हणून मानवाकडून होऊ शकतो, असे संशोधकांना वाटते. एखाद्या भव्य बॅटरीसारखा कृष्णविवरांचा वापर होऊ शकतो असे संशोधकांनी म्हटले आहे. एका नव्या संशोधनात कृष्णविवरांचा वापर ऊर्जेचा स्रोत म्हणून दोन प्रकारे होऊ शकतो असे संशोधकांनी म्हटले आहे. कृष्णविवरांची स्वतःभोवती फिरण्याचा आणि गुरुत्वाकर्षणाचा गुणधर्म वापरून त्यांच्यामधून ऊर्जा मिळवता येऊ शकते, असे संशोधकांना वाटते.



पेकिंग युनिव्हर्सिटीतील कॅवली इन्स्टिट्यूट फॉर ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रॉफिजिक्समधील विद्यार्थी संशोधक झान फेंग मई यांनी याबाबतचे संशोधन केले आहे. त्यांनी सांगितले की कृष्णविवरांमधून ऊर्जा बाहेर काढता येऊ शकते याची आम्हाला माहिती आहे. तसेच कृष्णविवरांमध्ये ऊर्जा पेरलीही जाऊ शकते. त्यामुळे कृष्णविवरांचा वापर बॅटरीसारखाच होऊ शकतो. 'फिजिकल रिव्ह्यू डी' या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## लाखो कुटुंबियांना फटका

# रेड झोनमधील बेकायदा बांधकामे डेंजर झोनमध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरात संरक्षण विभागाने घोषित केलेल्या प्रतिबंधित क्षेत्रात म्हणजे रेडझोन परिघात हजारो अनधिकृत बांधकामे झाली आहेत. या रेडझोन परिघाचा अचूक नकाशा तयार केला जात आहे. अधिकृत नकाशा तयार झाल्यानंतर रेड झोनमधील सर्व घरे डेंजर झोनमध्ये येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पूर्वानुभवानुसार लक्षात घेता न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप केल्यास सर्वसामान्यांना मोठा फटका बसू शकतो. शहरात तळवडे, निगडी, त्रिवेणीनगर, रूपीनगर, यमुनानगर, रावेत, किवळे, चिखली, दिघी, भोसरी, वडमुखवाडी, चर्होली, डुडुळगाव, बोपखेल हा परिसर रेड झोनने बाधित आहे. तसेच, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, पिंपरी गाव, पिंपळे सौदागर, कासारवाडी, दापोडी, फुगेवाडी या भागांना लागूनही लष्करी आस्थापना आहेत.

देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी डेपो आणि दिघी मॅगझिन डेपोमुळे शहरातील अनेक भागांत रेडझोन निर्माण झाला आहे. त्या हद्दीत कोणतेही बांधकाम करता येत नाही. मालमत्तेस चालू बाजारभावानुसार भाव मिळत नाही. असे असतानाही या भागांत हजारो अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. लाखो कुटुंबांना रेड झोनचा फटका बसला आहे. देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून २ हजार यार्ड (१.८२ किलोमीटर) आणि दिघी मॅगझिन डेपोपासून १ हजार १४५ मीटर परिघात रेड झोनची हद्द आहे. रेडझोनची सीमा अस्पष्ट असल्याने अनेक वर्षांच्या मागणीनुसार महापालिकेने आता मोजणी सुरू केली आहे. भूमी अभिलेख विभागाकडून सॅटेलाईट इमेजद्वारे मोजणी केली जात आहे.

> रेड झोनसंदर्भात संरक्षण विभागाने वर्क ऑफ डिफेन्स अॅक्ट सन १९०३ ला तयार केला आहे. त्यानंतर संरक्षण विभागाच्या डेपो परिसरात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढली आहे. अनेक सामाजिक बदल झाले आहेत. देशात एकूण ३९ डेपो आहेत. प्रत्येक ठिकाणी रेडझोनची हद्दीचे अंतर भिन्न आहे. असे असताना त्या जुन्या कायद्यानुसार आता निर्णय घेणे अन्यायकारक ठरेल,
>
> **- मारूती भापकर,** सामाजिक कार्यकर्ते



### मागील प्रकरणात नागरिकांना बसला फटका

● दापोडी येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (सीएमई) येथील रस्ता नागरिकांना खुला करा, यासाठी बोपखेलच्या रहिवाशांनी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती; मात्र संरक्षण विभागाची सुरक्षा महत्वाचे असल्याचे कारण देत न्यायालयाने तो रस्ताच कायमचा बंद केला. तसाच, निकाल पिंपळे निलख येथील औंध मिलिटरी कॅम्पच्या बाजूच्या परिसरातील पिंपळे सौदागर येथील रस्त्याबाबत न्यायालयाने दिला होता. तो रस्ता नागरिकांसाठी कायमचा बंद झाला. शहरात दीड लाख घरे अनधिकृत असल्याचे महापालिकेने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्यावर न्यायालयाने ती बांधकामे पाडा म्हणून आदेश दिला होता. त्यांचा फटका हजारो सर्वसामान्य कुटुंबांना सहन करावा लागला.

### रेड झोनमधील घरांची संख्या मोठी

● वर्क ऑफ डिफेन्स अॅक्ट १९०३ नुसार ७ सी च्या नोटीफिकेशननुसार रेड झोनची मोजणी झाल्यास केवळ ५०० यार्ड परिघात रेड झोनचे क्षेत्र येते. त्याप्रमाणे सन १९९२ मध्ये मोजणी करण्यात आली होती; मात्र संरक्षण विभागाने अधिक अंतराची मोजणी केल्याने त्या विरोधात स्थानिकांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने त्या मोजणीस स्थगिती दिली. मात्र, सध्या सुरू असलेली मोजणी ही देहू ऑर्डनन्स फॅक्टरी डेपाच्या बाह्यसीमा भिंतीपासून २ हजार यार्ड (१.८२ किलोमीटर) नुसार सुरू आहे. तर, दिघी मॅगझिन डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून १ हजार १४५ मीटर परिघात रेडझोनची मोजणी करण्यात येत आहे. त्यामुळे मोठे क्षेत्र रेडझोनमध्ये येणार आहे, असे रेडझोनबाधित रहिवाशांनी सांगितले.

### आगामी निवडणुकांत मुद्दा पेटणार

● रेडझोन नकाशामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीचा दूरगामी फटका बसणार आहे. आगामी विधानसभा आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत हा मुद्दा गाजणार आहे. रेड झोनमधील घरांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येणार आहे. तो प्रश्न न सुटल्यास त्याचा फटका निवडणुकीत अनेकांना बसू शकेल.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## फुलांचा बाजार फुलला, शेतकरी आनंदला

**पिंपरी :** गेल्या दोन आठवड्यात फुलांचा बाजारभाव वाढला असून पवनमावळातील शेतकरी सुखावला आहे. पावसाने दिलेली उघडीप व फुलांची चांगली वाढ झाल्याने सध्या बाजारभाव वाढले आहेत. तर, फुलांचे बाजारभाव वाढल्याने पवनमावळ पूर्व भागातील शेतकऱ्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कमी कालावधीत अधिक उत्पादन मिळवून देणारे पीक म्हणून पवनमावळातील शेतकरी फूल शेती करतात. फूल शेतीवर तेथील बरेच अर्थकारणही अवलंबून आहे. व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी परदेशातून गुलाबाला मागणी असते. त्यामुळे पवनमावळातील सांगवडे, गहुंजे, दारुंब्रे, गोडुंब्रे, शिरगाव, सोमाटणे, चांदखेड, कुसगाव, साळुंब्रे आदी गावातील शेतकरी मोठ्या प्रमाणात झेंडू, आस्टर, गुलछडी, जरबेरा, शेवंती, गुलाब, लिली आदी फुलशेतीचे पीक घेतात. यंदाही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात फूल शेती केली होती. मात्र, यावर्षी वाढते तापमान व अवकाळी पाऊस यामुळे अनेक शेतकऱ्यांचा गेल्या दोन महिन्यात पिकाला केलेला खर्चही मिळाला नव्हता. परिणामी अनेक शेतकऱ्यांनी तोडणीला आलेली फुलशेतीची नांगरणीची वेळ आली होती. दरम्यान, गेल्या दोन आठवड्यापासून फुलशेतीचे बाजारभाव वाढले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**असे आहेत दर :** स्थानिक बाजारपेठेत लाल झेंडू ८० ते १०० रुपये किलो, पिवळा झेंडू १०० ते १२० रुपये किलो दराने विक्री सुरू आहे. गुलछडी ८० ते १०० रुपये किलो, अस्टर १०० ते १२० रुपये किलो, जरबेरा ४० ते ६० रुपये किलो दराने विक्री होत आहे. पांढरी शेवंती १५० रुपये, पर्पल शेवंती १०० रुपये किलो, लिली बंडल १० रुपये, तुळजापुरी शेवंती ८० ते १०० रुपये किलो, जिप्सी २५० रुपये किलो दराने विकली जात आहे.



## आता तयारी निकालाची...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी मावळ लोकसभा मतमोजणी केंद्रास भेट देत पाहणी केली.

# विभागीय आयुक्तांची मतमोजणी केंद्रास भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मावळ :** लोकसभा निवडणुकीचा निकाल आज (मंगळवार) जाहीर होणार आहे. देशाचा हा निकाल जाहीर करण्यासाठी निवडणूक आयोगाची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. निकालाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी काल सोमवारी मावळ लोकसभा मतमोजणी केंद्रास भेट देऊन पाहणी केली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी मतमोजणी केंद्रातील केलेल्या तयारीची तसेच व्यवस्थेबद्दलची सविस्तर माहिती दिली.

या भेटीदरम्यान विभागीय आयुक्त कार्यालयाच्या उप आयुक्त वर्षा उंटवाल, मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाचे समन्वय अधिकारी प्रविण ठाकरे, हिम्मत खराडे, सुनील पांढरे, माहिती व तंत्रज्ञान कक्षाचे समन्वय अधिकारी निळकंठ पोमण उपस्थित होते. मतमोजणी प्रक्रिया पार पाडताना नियुक्त करण्यात आलेल्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपसात समन्वय ठेऊन भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडावी, असे निर्देश डॉ. पुलकुंडवार यांनी यावेळी दिले. दरम्यान वळ लोकसभा मतदार संघासाठी मतमोजणी निरीक्षक (काउंटिंग ऑब्झर्व्हर) म्हणून मोहम्मद हारूण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# तक्रार निवारणदिनी पोलीस आयुक्तांची चिखली पोलीस ठाण्यात अचानक भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिन घेतला जात आहे. मागील तीन आठवड्यांपासून हा उपक्रम पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या संकल्पनेतून घेतला जात आहे. या उपक्रमातून नागरिकांच्या तक्रारी योग्य पद्धतीने सोडविल्या जातात की नाही, याबाबत स्वतः पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे निगराणी करीत आहेत. शनिवारी(दि. १ जून) रोजी झालेल्या तक्रार निवारण दिनी आयुक्तांनी अचानक चिखली पोलीस ठाण्यात भेट दिली. पोलीस आयुक्तांनी स्वतः काही तक्रारदारांच्या तक्रारींचे निरसन केले. पोलिसांनी सुरु केलेल्या या उपक्रमाचे नागरिकांमधून स्वागत केले आहे.



तक्रार निवारण दिनासाठी आयुक्तालयाच्या हद्दीतील शनिवारी (दि. १) १८ पोलीस ठाण्यांमध्ये ६७९ तक्रार अर्ज आले होते. यामध्ये सर्व प्रकारच्या तक्रारी मांडण्यात आल्या होत्या. आवश्यक त्या अर्जांमधील गैरअर्जदार यांना देखील यावेळी बोलावण्यात आले होते. ३१२ गैरअर्जदार यावेळी उपस्थित होते. 18 पोलीस ठाण्यांमध्ये साडेतीन तासात ३६५ तक्रारींचा पोलिसांनी निपटारा केला. आतापर्यंत झालेल्या तीन तक्रार निवारण दिनी १४३५ तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे.

नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निरसन होण्यासाठी विविध माध्यमातून तक्रारी स्वीकारल्या जातात. वेब पोर्टल, व्हाट्सअप, ई-मेल, प्रत्यक्ष पोलीस आयुक्त कार्यालय, पोलीस उपायुक्त कार्यालय, सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय, पोलीस ठाण्यांमध्ये, त्यासह राज्य शासनाचे आपले सरकार पोर्टल, केंद्र शासनाचे पी जी पोर्टलच्या मार्फत या तक्रारी पोलिसांकडे येत असतात. आलेल्या तक्रारींचे वेळेत निराकरण झाल्यास नागरिकांना न्याय मिळण्यास मदत होते. तक्रारीचे वेळेत निरसन न झाल्यास नागरिकांची गैरसोय होते.

ही गैरसोय टाळण्यासाठी तसेच नागरिकांना अधिकाऱ्यांकडे आपली कैफियत मांडता यावी, त्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी तक्रार निवारण दिन हा उपक्रम सुरू केला. प्रत्येक शनिवारी सकाळी साडेदहा ते दुपारी दोन या कालावधीत पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच ठाणे प्रभारी अधिकारी यांच्या उपस्थितीत नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यात येतात.

# जन्म, मृत्यूच्या दाखल्यासाठी नागरिकांची गर्दी

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयात जन्म व मृत्यूचा दाखला एकाच ठिकाणी मिळत आहे. नागरिकांना दाखल्यांसाठी मोठी रांग करावी लागत असून जन्म आणि मृत्यू दाखल्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणी नारीशक्ती संस्थेच्या अध्यक्षा पूजा सराफ यांनी केली आहे.

याबाबत सराफ यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महापालिकेच्या वायसीएम रूग्णालयातून जन्म आणि मृत्यूचा दाखला दिला जातो. हे दोन्ही दाखले देण्यासाठी रूग्णालयातील दोन कॉम्प्युटरवर त्याचे काम चालते. दररोज ८० ते ९०लोक दोन-तीन वेळा रांगेमध्ये महिला व पुरूषांना उभे रहावे लागते. त्यामुळे याठिकाणी कॉम्प्युटर व कर्मचा-यांची संख्या वाढवावी. तसेच जन्माचे दाखल्याची वेगळी खिडकी व मृत्यूच्या दाखल्याची वेगळी खिडकीची सोय करावी. महिलांना जन्म दाखल्याची अत्यंत गरज असते. तसेच मृत्यूच्या दाखल्याचेही आहे. या जन्म-मृत्यूच्या दाखल्यासाठी तीन ते चार तास थांबावे लागत आहे.

## ९१० कोटी १८ लाख रुपये येणार खर्च

# पिंपरी-निगडी मेट्रो मार्गाचे काम तीन वर्षात होणार पूर्ण


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी ते निगडी या ४.५१९ किलोमीटर अंतराच्या विस्तारित मार्गाचे काम अखेर सुरू झाले आहे. त्यातील मार्गिकेच्या व्हायडक्ट या कामाचा ठेका केंद्र सरकारच्या रेल विकास निगम लिमिटेडला देण्यात आला आहे. सध्या मार्गावरील माती परीक्षणाचे काम सुरू आहे. या कामाची मुदत १३० आठवडे आहे.

**मेट्रो व्हावी, ही जनतेची मागणी!**

पिंपरीपासून निगडीपर्यंत मेट्रो व्हावी म्हणून शहरवासीयांची आग्रही मागणी होती. त्या मागणीची दखल घेत केंद्र सरकारने या विस्तारीत मार्गाच्या ९१० कोटी १८ लाख खर्चाच्या कामास २३ ऑक्टोबर २०२३ ला अंतिम मान्यता दिली. त्यानुसार निगडीच्या भक्ती-शक्ती समुह शिल्प चौक ते चिंचवडच्या मदर टेरेसा उड्डाण पुलापर्यंतच्या ५.५१९ किलोमीटर अंतराच्या व्हायडक्ट कामाची निविदा काढण्यात आली. हे ३३९ कोटी खर्चाचे काम केंद्राच्या रेल विकास निगम लिमिटेडला मिळाले आहे. हा मार्ग उन्नत असून, तो निगडीहून पिंपरीच्या दिशेने जाणाऱ्या सर्व्हिस रस्ताने उभारला जाणार आहे. या कामासाठी निगडी, भक्ती-शक्ती समुह शिल्प चौक, टिळक चौक आदी ठिकाणच्या सर्व्हिस रस्त्यावर बॅरिकेटस लावून माती परीक्षण करण्यात येत आहे. माती परीक्षण झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येणार आहे. या कामाची मुदत १३० आठवडे आहे. हे काम अंतिम टप्प्यात आल्यानंतर लोहमार्ग टाकणे, सिग्नल व्यवस्था, विद्युतपुरवठा, स्टेशनची उभारणी आदी कामांची स्वतंत्रपणे निविदा काढली जाणार आहे. या संपूर्ण कामाचे काम ३ वर्षे ३ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर निगडीपासून थेट स्वारगेट, रामवाडी आणि वनाजपर्यंत मेट्रोने ये-जा करता येणार आहे.

### मुदतीमध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन



● पिंपरी ते निगडीपर्यंतच्या विस्तारीत मेट्रो मार्गाच्या व्हायडक्टचे काम रेल विकास निगम लिमिटेडला देण्यात आले आहे. त्याची वर्कऑर्डर देण्यात आली आहे. सध्या माती परिक्षणाचे काम सुरू करण्यात आले आहे. लवकरच ठेकेदाराकडून कास्टींग यार्ड सुरू करण्यात येईल. काम मुदतीमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे महामेट्रोचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत सोनवणे यांनी सांगितले.

#रा

## » Selected




## लौजी रेल्वेस्थानकात अपुऱ्या सुविधा, प्रवासी हैराण

**पिंपरी :** लौजी रेल्वेस्थानक मध्य रेल्वेवरील स्थानक आहे. या स्थानकावरुन असंख्य प्रवाशांची दैनंदिन वर्दळ सुरु असते. या स्थानकाकडे रेल्वे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे स्थानकावरील समस्या दिवसेंदिवस अधिक जटील बनत आहेत. या स्थानकावर अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था, स्वच्छतागृहांचा नुसताच देखावा व अपुरे प्रवासीशेड असल्याने प्रवाशांना त्रास होत आहे. मध्य रेल्वेच्या खोपोली – कर्जत रेल्वे मार्गावरील लौजी हे एक मुख्य रेल्वे स्थानक आहे. लौजी, चिंचवली, शेडवली, नवघर, श्रीरामनगर, उदयविहार, मुळगाव, वासरंग आदी गावातील विद्यार्थी, महिला, चाकरमानी व सर्व सामान्य नागरिक या रेल्वे स्थानकावरुन मोठ्या संख्येने दैनंदिन प्रवास करीत असल्याने या रेल्वे स्थानकावर मोठी वर्दळ असते. परंतु, या स्थानकावर अनेक समस्या असल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. लौजी रेल्वे स्थानकावर अपुरी आसन व्यवस्था, पिण्याचे पाण्याचे स्टँड बांधलेत पण नळ जोडणी नाही. नळ स्टँडची दयनीय अवस्था झालेली आहेत. स्वच्छतागृहांचा नुसताच देखावा, गर्दुले, तळीरामांचा वावर तसेच स्थानकावर अस्वच्छता पसरल्याने प्रवाशांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. दुर्गंधीमुळे प्रवाशांना रोगराई होऊ शकते.

## इंदोरीत शेतकरीप्रशिक्षण वर्गास प्रतिसाद

**वडगाव मावळ :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत इंदोरी येथे सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते. यामध्ये सुमारे १०२ शेतकऱ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. आत्मा प्रकल्प संचालक पुणे विजय हिरेमठ आणि कृषी अधिकारी मावळ दत्तात्रेय पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. आधारकर संशोधन संस्था पुणेचे शास्त्रज्ञ संतोष जायभाय यांनी सुधारित सोयाबीन लागवड व व्यवस्थापन, विविध जाती, पेरणी लागवडीच्या विविध पद्धती, तण नियंत्रण, कीड व रोग नियंत्रण याविषयी मार्गदर्शन केले. तर शास्त्रज्ञ डॉ. बाळकृष्ण जमदग्नी यांनी ऊस लागवड तंत्रज्ञान व ऊस संजीवनी याबाबत माहिती दिली. तसेच, कृषी विभागाच्या विविध योजना विषयी माहिती कृषी अधिकारी दत्तात्रेय पडवळ यांनी दिली. आत्मा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, सहली व प्रशिक्षण याबाबत राहुल घोगरे यांनी मार्गदर्शन केले. कृषी पर्यवेक्षक नवीनचंद्र बोराडे यांनी शेतकऱ्यांनी घरचे भात व सोयाबीन बियाणे वापरावे असे आवाहन केले. कृषी सहायक स्वाती घनवट यांनी सोयाबीन उगवण क्षमता, बीज प्रक्रिया, फळबाग, पी. एम. किसान योजना याविषयी माहिती दिली.

## संतपीठ शाळेतील विद्यार्थीनीची आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये यश



**टाळगाव चिखली:** जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ,टाळगाव चिखली येथील इयत्ता सातवी विभाग संत मीराबाईमधील विद्यार्थिनी रिद्धिका रविकुमार पाटील हिने मलेशिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सिलांबम ओपन चॅम्पियनशिप-२०२४ मध्ये भारतासाठी कांस्य पदक जिंकले. २५ मे ते २७ मे दरम्यान मलेशियन सिलंबम फेडरेशन आयोजित नऊदेशांच्या खेळाडूंनी या स्पर्धेसाठी सहभाग घेतला होता. या यशाबद्दल संतपीठ शाळेचे संचालक हभपराजू महाराज ढोरे, संचालिका डॉ.स्वातीमुळे, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे, मुख्याध्यापिका स्नेहल पगार,समन्वयिका मयुरी मुळूक यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी तिचे अभिनंदन करून भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मतमोजणीसाठी अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

# आज लागणार लोकसभा निवडणुकीचा निकाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मावळ :** लोकसभा निवडणुकीचा निकाल आज (४ जून २०२४ रोजी) जाहीर होणार आहे. निवडणूक प्रक्रियेत मतमोजणी हा महत्वाचा टप्पा आहे. त्यामुळे मतमोजणीसाठी नियुक्त केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपसात समन्वय ठेऊन सोपविण्यात आलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, अशी सूचना निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली. मतमोजणी निरीक्षक मोहम्मद हारूण यांच्या प्रमुख उपस्थितीत बालेवाडी, पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांचे द्वितीय प्रशिक्षण काल (सोमवारी) संपन्न झाले, त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला बोलत होते.

मावळ लोकसभा निवडणूकीची मतमोजणी ४ जून रोजी बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडणार आहे. त्या अनुषंगाने सर्व व्यवस्था पुर्ण झाली असून प्रत्यक्ष मतमोजणीसाठी नियुक्त केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या दुसऱ्या प्रशिक्षणाचा टप्पाही आज पुर्ण झाला. मावळ लोकसभेअंतर्गत सुक्ष्म निरीक्षक, पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यकांची नेमणूक करण्यात आली आहे. या अधिकारी कर्मचाऱ्यांची द्वितीय सरमिसळ (रँडमायझेशन) पद्धतीने पनवेल, उरण, कर्जत, मावळ, पिंपरी, चिंचवड विधानसभा मतदारसंघनिहाय मतमोजणीकामी नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना मतमोजणीबाबतचे सविस्तर प्रशिक्षण सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी यांनी दिले. मतमोजणी प्रक्रिया पार पाडताना भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी उपस्थित प्रशिक्षणार्थींना देण्यात आल्या.



### मतमोजणी केंद्रात मोबाईलसह प्रतिबंधीत वस्तू आणण्यास मनाई

● निवडणूकीच्या मतमोजणीची फेरीनिहाय आकडेवारी मतमोजणी केंद्राच्या ठिकाणाहून ध्वनीक्षेपकाद्वारे वेळोवेळी घोषित केली जाईल. मतमोजणी केंद्रामध्ये उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी यांना मोबाईल, पेजर, कॅलक्यूलेटर, टॅब, इलेक्ट्रॉनिक रिस्ट वॉच आदी इलेक्ट्रॉनिक्स वस्तू सोबत बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. कुठल्याही अनधिकृत व्यक्तीला मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

### मतमोजणीच्या माहितीसाठी टोल फ्री क्रमांक १९५० ची सुविधा

● मावळ लोकसभा मतदार संघाची मतमोजणीविषयक माहिती देण्यासाठी मतमोजणी केंद्रावर संवाद कक्ष तयार करण्यात आला आहे. भारत निवडणूक आयोगाच्या १९५० या टोल फ्री क्रमांकावर नागरिकांना मतमोजणी विषयक माहिती घेता येणार आहे.

### मतमोजणी केंद्राच्या ठिकाणी प्रवेशाबाबत सूचना

● मतमोजणीच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने बालेवाडी येथील मतमोजणी केंद्राच्या ठिकाणी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. उमेदवार, मतमोजणी प्रतिनिधी, निवडणूक प्रतिनिधी तसेच अधिकृत माध्यम प्रतिनिधींना बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलाच्या मुख्य प्रवेशद्वारावरून प्रवेश देण्यात येईल. निवडणूक मतमोजणीसाठी प्राधिकृत केलेल्या निवडणूक कार्यालयाने दिलेले ओळखपत्र संबंधितांनी प्रवेश करत्यावेळी धारण करणे आवश्यक आहे. निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना राजवाडा गेटने प्रवेश दिला जाईल. १५० मीटर परिसरात इतरांना प्रवेश प्रतिबंधीत करण्यात आला आहे. मतमोजणी केंद्राच्या परिसरात वैद्यकीय पथकासह रुग्णवाहिका तसेच आपात्कालीन विषयक सर्व यंत्रणा तैनात ठेवण्यात आली आहे. याव्यतिरिक्त सर्व सुविधांसह स्वतंत्र माध्यम कक्ष तयार करण्यात आला आहे. परिसरात सीसीटीव्ही यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच इतर आवश्यक सुविधा देखील याठिकाणी असणार आहेत.

## » Selected



### कंपनीच्या वायूप्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**पिंपरी :** ढेकू गावातील प्लॅस्टिक टेप उत्पादन करणाऱ्या केमिकल कंपनीमार्फत धुरावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता ते हवेत सोडले जाते आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड वायू प्रदूषण होत आहे. परिणामी रहिवाशांना डोळे झोंबणे आणि श्वासाचे विकार होण्याची भिती व्यक्त होत आहे. याविषयी गेल्या दोन -तीन वर्षांपासून तक्रार करूनही शासन लक्ष देत नसल्यामुळे तेथील रहिवासी दिलीप पाटील यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. खालापूर तालुक्यातील साजगाव ग्रामपंचायत हद्दीमधील अनेक कारखान्यांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ढेकू गावातही अशी स्थिती निर्माण होत आहे. रसायन कंपनीची वायू सोडणाऱ्या चिमणीची उंची कमी असल्याने काळा धूर नागरिकांच्या घरात परसरतो. तसेच धुराची काळी माती घरात पसरते. तर, घरातील व परिसरातील लहान मुले, स्त्रियांना, ज्येष्ठ नागरिकांना डोळे झोंबणे आणि श्वासाचे विकार होण्याची शक्यता आहे. दिलीप पाटील यांनी प्रदूषण मंडळ, खालापूर तहसिलदार, पोलीस स्टेशन, साजगाव ग्रामपंचायतीकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही त्याची दखल घेतली गेली नाहे. तर, दिलीप पाटील यांच्या पत्नी गुलाब पाटील या साजगाव ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या असतानाही न्याय मिळत नसल्यामुळे त्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.



### आठ फुटी अजगराला वन्यजीव रक्षक संस्थेकडून जीवदान

**मावळ :** तालुक्यातील औंढोली येथे वन्यजीव रक्षक मावळ संस्था, भटकंती सह्याद्री प्रतिष्ठाण यांच्या सदस्यांनी आठ फुट लांबीच्या अजगराला पकडले. त्यानंतर त्याला नैसर्गिक अधिवासात सोडून त्याला जीवदान देण्यात आले. औंढोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विजय सुतार यांच्या घराजवळ अजगर जातीचा साप असल्याचे रविवारी (दि. २) रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास आढळून आले. त्यानंतर वन्यजीव रक्षक मावळ संस्थेचे सदस्य मोरेश्वर मांडेकर, भटकंती सह्याद्री प्रतिष्ठानचे सदस्य निलेश मांडेकर, राहुल मांडेकर, अजित विश्वासराव, मंगेश तायडे, गोविंद सुतार, संतोष शेळके, नितीन मांडेकर यांनी विजय सुतार यांच्या घराकडे धाव घेतली. अजगराची लांबी सुमारे आठ फूट होती. त्याला सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात नेऊन सोडण्यात आले.

### गॅस सिलेंडरच्या स्फोटामुळे गोदामाला भीषण आग

**पिंपरी :** महाराष्ट्रात आगीच्या घटना वाढत आहेत. अशातच पिंपरी चिंचवड येथील काळेवाडी विजयनगरमधील निवासी परिसरातील कपड्याच्या कारखान्याला आणि पेपर प्लेट बनवणाऱ्या कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड अग्निशमन दलाचे चार बंब घटनास्थळी दाखल झाले होते. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही. मात्र, सिलेंडरच्या स्फोटामुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काळेवाडी येथील विजयनगर परिसरातील कारखान्याला सोमवारी सकाळी अकराच्या सुमारास आग लागली. ही आग विजयनगर परिसरात एकाच पत्र्याच्या शेडमध्ये दोन कारखाने आणि एक गोदामास लागली होती. तिथे कपडे, गाद्या अन् कागदी साहित्य होते. या शेडला सोमवारी सकाळी अकराच्या सुमारात भीषण आग लागली. वाऱ्यामुळे आगीने पेट घेतला आणि धूराचे लोळ दिसू लागले. साधारणपणे दुपारी एक वाजेपर्यंत आग आटोक्यात आली. या घटनेमुळे दाट लोकवस्तीच्या भागात हा कारखाना कसा सुरु होता? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## देहू-मोशी-आळंदी बीआरटीएस रस्त्याची 'वाट'

**देहू :** मोशी- आळंदी बीआरटीएस रस्ता कधी जलवाहिनी, कधी सांडपाणी वाहिन्या; तर कधी विद्युत वाहिन्या टाकण्यासाठी जेसीबी, पोकलँडने तीन ते चारवेळा खोदला जात आहे. मात्र, काम झाल्यानंतर रस्त्याची कोणतीही दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे, अपघाताचा धोका निर्माण झाला असून या रस्त्यावरून जाताना चिखली, मोशी, डुडुळगावकरांची पुरती 'वाट' लागत आहे. देहू-मोशी-आळंदी बीआरटीएस रस्ता वाहतुकीसाठी अतिशय महत्त्वाचा रस्ता असून खूप वर्दळीचा आहे. मागील काही महिन्यांपासून या रस्त्यावर विविध कामांसाठी खोदकाम केले जात आहे. मात्र, काम पूर्ण झाल्यावर केवळ माती, मुरूम व दगड टाकून तेथील खड्डे भरले जात आहेत. त्यावरही काही ठिकाणी मातीचे डोंगर तर काही ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करून त्यावर खडी टाकली जात आहे. परंतु, ही खडी रस्त्यावर पसरल्याने त्यावरूनही दुचाकी वाहने घसरून अपघात घडत आहेत. काही ठिकाणी खड्ड्यांमध्ये फक्त माती ढकलून त्यावर सिमेंटचे पाइप ढकलले आहेत. त्यामुळे, वाहनचालक व पादचाऱ्यांना अपघाताचा धोका पत्करून मुख्य रस्त्यावरून ये-जा करावी लागत आहे. एखादे अवजड वाहन वेगाने गेले; तर त्याची धूळ मोठ्या प्रमाणावर उडून ती नागरिकांच्या सरळ घरात येत आहे.

### सूचना फलक, बॅरिकेड्सचा अभाव

● कोणतेही नियोजन न करता खोदलेल्या रस्त्याची तत्काळ दुरुस्ती केली जात नाही. किंवा खड्डे असलेल्या ठिकाणी 'येथे काम सुरु आहे. वाहने जपून चालवा' असे सूचना फलक किंवा धोकादायक ठिकाणी बॅरिकेड्स देखील लावलेले नाहीत. या नरक यातना अजून किती दिवस सहन करायच्या ? असा प्रश्न संतप्त नागरिकांमधून उपस्थित होतो आहे.

### अनेक ठिकाणी नळजोड तुटले

● रस्त्यावरील खोदकामांमुळे अनेक ठिकाणी नळजोड तुटले आहेत. त्यामुळे, सध्या बऱ्याच ठिकाणी दुर्गंधीयुक्त गढूळ पाणी येत आहे; तर अनेक ठिकाणी जलनिस्सारण वाहिनी फुटली आहे. मात्र, तिच्या दुरुस्तीचे काम वेळेवर केले जात नाही. त्यामुळे, हे काम कधी पूर्ण होणार ? आणि कधी खड्ड्यांपासून सुटका होणार ? या चिंतेत सध्या मोशीकर आहेत.

अभिवादन...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

## गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मोरवाडी येथील भाजपा मध्यवर्ती कार्यालयात कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी जगताप यांनी स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. गोपीनाथजी मुंडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श आजही आमच्या कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे, तसेच त्यांच्या विचारांचे पाईक होणे ही खरी आदरांजली ठरेल, अशी भावनाही जगताप यांनी व्यक्त केली.

यावेळी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी, माऊली थोरात, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, अजय पाताडे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, भटके विमुक्त आघाडी प्रदेश उपाध्यक्ष कैलास सानप, बेटी बचाव बेटी पढाओ प्रकोस्थ संयोजिका प्रीती कामतीकर, अध्यक्ष भटके विमुक्त आघाडी गणेश ढाकणे, रोजगार, स्वंरोजगार व कौशल्य विकास सक्षमीकरण आघाडी अध्यक्ष भारत मदने, माजी नगरसेवक बाळासाहेब भुंबे, युवा मोर्चा सरचिटणीस सतीश नागरगोजे, जिल्हा चिटणीस मंगेश धाडगे, संयोजक जैन प्रकोष्ठ संदेश गादीया, बुद्धिजीवी प्रकोष्ठ संयोजक मनोजकुमार मारकड, सुनील वाठ आदी उपस्थित होते.

याप्रसंगी, अरुणाचल प्रदेशमध्ये भाजपाला तिस-यांदा विजय मिळाल्याबददल आनंद व्यक्त करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. भाजपाला स्पष्ट बहुमत देऊन विकसित भारताच्या निर्मितीमध्ये योगदान देणा-या अरुणाचल प्रदेशमधील सर्व मतदार बांधवांचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी आभार मानले. तसेच, अरुणाचल प्रदेशमधील नागरिकांचे, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय पक्षप्रमुख जे.पी. नड्डा, मुख्यमंत्री पेमा खांडू, अरुणाचल भाजपा प्रदेशाध्यक्ष बीयूराम वाघेजी आणि पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली अरुणाचल प्रदेशात भाजपा सरकार भक्कमपणे काम करेल, असा विश्वास व्यक्त केला.

### नागरिकांकडून बेशिस्तपणे गाड्यांचे पार्किंग

## पिंपरी-निगडी मेट्रो परिसरात वाहनतळाचा अभाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरीपासून निगडीतील शक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रोमार्गाचे विस्तारीकरणाचे काम सुरू झाले आहे. मात्र, त्यातील कोणत्याही स्थानक परिसरात वाहनतळाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नाही. कारण प्रशासनाच्या दृष्टीने मेट्रो स्थानकांच्या परिसरात 'वाहनतळ' ही संकल्पनाच नसल्याने प्रवाशांनी घरापासून स्थानकापर्यंत चालत जायचे किंवा पीएमपी बस अथवा रिक्षाने जायचे. पण असे होताना सद्यःस्थितीत कार्यान्वित स्थानकांबाबत दिसत नाही. परिणामी, या स्थानकांप्रमाणेच नवीन होणाऱ्या स्थानकांच्या परिसरातील पदपथांवरच बेशिस्तपणे दुचाकी उभ्या करून बिनधास्तपणे आपापल्या कामाच्या ठिकाणी प्रवाशांनी निघून जायचे, अशी स्थिती निर्माण होऊ शकते.

> मेट्रोच्या दोन स्थानकांतील अंतर साधारणपणे पाचशे मीटर आहे. तिथपर्यंत प्रवाशांनी चालत येणे किंवा सार्वजनिक प्रवासी वाहतूक साधणे वापरणे अपेक्षित आहे. मेट्रो मार्गाच्या दोन्ही बाजूस व्यापारी संकुले असून, जमिनीच्या किमती अधिक आहेत. शिवाय, प्रवाशांची वाढती संख्या पाहता, तितक्या वाहनांसाठी वाहनतळ निर्माण करणे अशक्य आहे. त्यावर उपाय म्हणून पीएमपीची फ़िडर सेवा बळकट करण्यावर भर दिला आहे. मात्र, महापालिकेने जागा उपलब्ध करून दिल्यास संयुक्तपणे वाहनतळ विकसित करण्याचे विचाराधीन आहे. त्यासंदर्भात पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांना पत्र दिले आहे.
>
> **- हेमंत सोनवणे,** कार्यकारी संचालक, जनसंपर्क, महामेट्रो

मेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी मार्गाचे निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत विस्तारीकरण केले जात आहे. या ४.५१ किलोमीटर मार्गाचे बांधकाम सुरू झाले असून ते अडीच वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्यःस्थितीत पिंपरी ते सिव्हिल कोर्ट स्थानकापर्यंत प्रवासी वाहतूक सुरू आहे. तेथून पुढे रामवाडी व वनाजपर्यंत गाडी बदलून जाता येते. पिंपरी-स्वारगेट मार्गातील सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट भुयारी मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुढे त्याचा विस्तार कात्रजपर्यंत केला जाणार आहे. त्यामुळे निगडीतील भक्ती-शक्तीपासून ते कात्रजपर्यंत थेट प्रवास करता येणार आहे.

सद्यःस्थितीत सुरू असलेल्या मार्गात पिंपरी (पीसीएमसी), संत तुकारामनगर (वल्लभनगर), भोसरी (नाशिक फाटा), कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी असे सहा स्थानके शहरात आहेत.

तेथून प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे. या स्थानकांना जोडण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाची फिडर बससेवा सुरू केली आहे. तरीही बहुतांश प्रवासी आपल्या दुचाकींनीच मेट्रो स्थानकांपर्यंत येतात. स्थानकांच्या परिसरात जागा मिळेल तिथे दुचाकी उभी करून मेट्रोने पुढील प्रवास करतात. सायंकाळी कामावरून आल्यानंतर आपापल्या दुचाकी घेऊन घरापर्यंत पोहोचत आहेत.

## वेबसिरिज तयार करण्याच्या बहाण्याने फसवणूक

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**सांगवी :** वेबसिरीज तयार करण्याचे खोटे सांगून व पैसे गुंतविल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून महिलेची ६० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी पिंपळे सौदागर येथील ५९ वर्षीय महिलेने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार समीर उर्फ दीपक भटनागर (रा. वर्सोवा, अंधेरी वेस्ट, मुंबई) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादी महिलेला वेबसीरीज तयार करण्याचे खोटे सांगितले. त्यासाठी पैसे गुंतविल्यास चांगला परतावा मिळेल असे आमिष दाखवले. त्यानंतर फिर्यादीने त्यांच्या आयसीआयसीआय बँकेच्या खात्यातून आरोपीच्या नावाने असलेल्या बंधन बँकेच्या खात्यात ६० हजार रुपये ट्रान्सफर केले.

मात्र, त्यानंतर आरोपीने वेबसिरीज तयार न करता व फिर्यादीला पैसे परत न करता त्यांची आर्थिक फसवणूक केली. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.

### सहा अधिकाऱ्यांच्या अभ्यास समितीची स्थापना

## आयटी कंपन्यांच्या स्थलांतरानंतर प्रशासनाला जाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधून गेल्या १० वर्षांपासून कंपन्या बाहेर पडत आहेत. या माहिती-तंत्रज्ञान (आयटी) पार्कमधील पायाभूत सुविधांची स्थिती दिवसेंदिवस खराब होत आहे. याचबरोबर वाहतूककोंडी प्रचंड प्रमाणात वाढल्याने कंपन्या आयटी पार्कमधून बाहेर पडून दुसरीकडे स्थलांतरित होत आहेत. यामुळे रोजगारालाही मोठा फटका बसत आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये आणखी ३८ कंपन्यांनी हिंजवडी आयटीपार्कमधून स्थलांतर केले आहे.

### समिती ही कामे करणार...

● औद्योगिक भूखंडाची माहिती पोर्टलवर उपलब्ध करून देणे, वापरात नसलेल्या औद्योगिक भूखंडाचा वापर करणे किंवा पुन्हा ताब्यात घेऊन त्यांचे पुर्नवाटप करणे, एमआयडीसी बाहेरील औद्योगिक समूहांना पायाभूत सुविधा पुरविणे, राज्यातील उद्योगांना भेडसावणाऱ्या विविध उपद्रवी घटकांचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना सुचविणे, औद्योगिक क्षेत्रालगतच्या जागेवर रहिवास वापर अनुज्ञेय करणे, उद्योगांच्या सहकार्याने राज्यातील बेरोजगार युवकांना उद्योगांशी संबंधित कौशल्य प्रशिक्षण देणे आदी कामकाज या समितीमार्फत होणार आहे.



आपले प्रकल्प राज्याबाहेर गेल्यानंतर विरोधी पक्ष नेत्यांकडून मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. या प्रकारानंतर अखेर सरकारला जाग आली आहे. राज्यातील उद्योगांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आता सहा अधिकाऱ्यांचा समावेश असलेली अभ्यास समिती स्थापन करण्यात आली आहे. याबाबतचा अहवाल समितीला १० जून २०२४ पर्यंत मुख्य सचिवांकडे सादर करण्याचे बंधनही घालण्यात आले आहे.

उद्योग संचालनालयाचे विकास आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. यामध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सचिव अथवा त्यांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सह मुख्य कार्यकारी अधिकारींचा समावेश करण्यात आला आहे.

#रा

## भाजपा-राष्ट्रवादी-मनसे-शिवसेना विधानपरिषदेसाठी आमनेसामने

# लोकसभा निवडणूक होताच महायुतीत फूट?


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाविकास आघाडीच्या विरोधात लोकसभा निवडणुकीत भाजपाने शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, मनसे आणि इतर छोट्या छोट्या पक्षांना बरोबर घेऊन महायुतीच्या वज्रमुठीची ताकद दाखविली. मात्र निवडणूक पूर्ण होताच ही महायुतीची मूठ सैल झाल्याचे दिसत आहे. आगामी काळात होणाऱ्या विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर निवडणुकीत महायुतीने एकमेकांच्या विरोधात उमेदवार उभे केले आहेत. मनसेने याची सुरुवात करत कोकण पदवीधर मतदारसंघात महायुतीशी चर्चा न करता अभिनेते अभिजीत पानसे यांची उमेदवारी जाहीर केली. तर राष्ट्रवादी काँग्रेसने मुंबई शिक्षक पदवीधर मतदारसंघासाठी शिवाजीराव नलावडे यांना उमेदवारी जाहीर केली. आता भाजपानेही आपले अधिकृत उमेदवार जाहीर केले आहेत.

विधानपरिषदेच्या निवडणुकांसाठी भाजपाने त्यांचे उमेदवार जाहीर केले आहेत. त्यानुसार, मुंबई पदवीधर मतदासंघासाठी भाजपाकडून किरण शेलार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर कोकण पदवीधर मतदारसंघासाठी विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांना उमेदवारी दिली आहे. याशिवाय मुंबई शिक्षक मतदारसंघातून शिवनाथ दराडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपाने तीनही उमेदवार जाहीर केल्यानंतर महायुतीमध्येच आता चुरस वाढल्याचे दिसत आहे. ही आगामी विधानसभा निवडणुकीची नांदी आहे का? अशीही चर्चा होत आहे.

### शिवसेना शिंदे गटही निवडणुकीच्या रिंगणात

● कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपा विरुद्ध मनसे असे चित्र दिसत असतानाच शिवसेना शिंदे गटानेही या निवडणुकीत उडी घेतली आहे. शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांनी कोकण पदवीधर मतदारसंघ निवडणूकीकरिता कोकण भवन येथून उमेदवारी अर्ज घेतला आहे. यामुळे शिवसेनेकडूनही उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असेल, असे चित्र सध्या तरी दिसत आहे.



### पदवीधर, शिक्षक मतदारसंघातील निवडणूक कधी?

● विधान परिषदेच्या चार जागांसाठी एप्रिल महिन्यात कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार १५ जूनला मतदान होणार होते. पण शाळांना सुट्टी असल्याने मतदानाची तारीख पुढे ढकलावी, अशी मागणी विविध राजकीय पक्ष तसेच शिक्षकांच्या संघटनांकडून करण्यात आली होती. दोन आठवड्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मुंबईत आलेल्या निवडणूक आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ही मागणी केली होती. त्यानुसार निवडणूक आयोगाने निवडणूक लांबणीवर टाकली होती. आता नव्याने निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने शुक्रवारी जाहीर केला. यानुसार २६ जूनला मतदान होईल. मतमोजणी १ जुलैला करण्यात येणार आहे. ३१ मे ते ७ जून या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे.

### बिनशर्त पाठिंब्यानंतर मनसेकडून उमेदवार जाहीर

● महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाप्रणित एनडीएला बिनशर्त पाठिंबा दिला होता. यासाठी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह यांच्यासह काही सभा घेतल्या. लोकसभा निवडणुकीत मनसेच्या वाट्याला एकही जागा आली नाही. दक्षिण मुंबईतून शिवसेनेच्या चिन्हावर उमेदवार उभा करावा, असा प्रस्ताव दिला गेला होता, असा खुलासा खुद्द राज ठाकरे यांनी एका सभेत केला. मात्र मनसे सोडून इतर चिन्हावर उमेदवार उभा करणार नाही, अशी थेट भूमिका त्यांनी मांडली होती. लोकसभेत पाठिंबा दिल्यानंतर विधानसभेत आपले उमेदवार महायुतीद्वारे उभे करू, असेही त्यांनी जाहीर केले होते. त्यामुळे विधानपरिषदेत त्यांनी अभिजीत पानसे यांची उमेदवारी जाहीर करत सर्वांनाच धक्का दिला.

# ...तर मला संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल: शरद पवार



**मुंबई :** लोकसभा निवडणूक निकालाच्या एक दिवस आधीच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून दुष्काळाबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. शरद पवार यांनी हे पत्र त्यांच्या एक्स अकाऊंटवरुन शेअर करत या मुद्द्यावर मला संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल, अशा थेट इशाराही मुख्यमंत्र्यांना दिला आहे. राज्यात दुष्काळामुळे जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. पाण्याच्या टंचाईमुळे बळीराजा आणि सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे.

जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची कमतरता निर्माण झाली आहे. अशा स्थितीत या भीषणतेकडे राज्य सरकारचे लक्ष वेधूनही राज्य सरकारकडून कुठलीही ठोस भूमिका अद्याप घेण्यात आलेली नाही. जर ही दुष्काळाची स्थिती राज्यात कायम राहिली आणि जर राज्य सरकारकडून तातडीने पावलं उचलली गेली नाहीत तर, महाराष्ट्रातील जनतेच्या हितासाठी नक्कीच संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल ! त्यामुळे माननीय मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी राज्यातील दुष्काळ निवारणाबाबत योग्य कार्यवाही करावी,ही अपेक्षा,'असं शरद पवार हे पत्र शेअर करताना म्हटले आहेत.

शरद पवारांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, मागील महिन्यात २४ मे रोजी पत्रकार परिषद घेऊन मी महाराष्ट्र राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. त्यावेळी मी राज्य सरकारशी सहकार्य करण्याची आणि दुष्काळी परिस्थितीला एकत्रितपणे सामोरे जाण्याची भूमिका घेतली होती. आपण देखील आदल्या दिवशी छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला होता. मात्र या महत्त्वपूर्ण बैठकीत संबंधित लोकप्रतिनिधी व मंत्री गैरहजर होते. आपण सदर बाबीची योग्य ती दखल घेतली असेलच. मात्र राज्य सरकार अद्यापही अंग झटकून कामाला लागल्याचे दिसत नाही, हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.



## आयएएस दाम्पत्याच्या मुलीची मंत्रालयासमोरच्या बिल्डिंगवरून उडी

**मुंबई :** देशात लोकसभा निवडणुकीच्या निकालाची तयारी सुरु असताना मुंबईत एक खळबळजनक घटना घडली आहे. मुंबईतील आयएएस अधिकाऱ्याच्या मुलीने आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. विकास रस्तोगी आणि राधिका रस्तोगी या आयएएस दाम्पत्याच्या मुलीने मंत्रालयासमोर असलेल्या सुरुची या इमारतीवरुन पहाटे चार वाजता उडी मारुन आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. या मुलीचे नाव लिपी रस्तोगी असे आहे. या घटनेमुळे मुंबईतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे.

लिपी रस्तोगी असं या मुलीचं नाव असून ती २६ वर्षांची आहे. विकास रस्तोगी हे १९९७ च्या आयएएस बॅचचे अधिकारी आहेत. लिपी रस्तोगी ही अभ्यासात तितकीशी पुढे नव्हती. त्यामुळे ती नैराश्यात होती. आई-वडील इतके मोठे अधिकारी असून आपण त्यासाठी पात्र आहोत की नाही अशी भीती लिपी रस्तोगीला सतावत होती. त्यातूनच तिने आयुष्य संपवल्याची चर्चा मंत्रालय परिसरात चर्चा आहे. दरम्यान, सध्या पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत.

### नेमकं काय घडलं?

● आयएएस अधिकारी विकास आणि राधिक रस्तोगी यांच्या मुलीने आत्महत्या केली. मंत्रालयासमोर असलेल्या सुरुची या इमारतीमध्ये हे आयएएस दाम्पत्य राहतं. रस्तोगी दाम्पत्याच्या मुलीने राहत्या इमारतीवरुन उडी घेऊन आत्महत्या केली. विकास रस्तोगी हे उच्च आणि तंत्रशिक्षण या विभागाचे सचिव आहेत.

## जळगावात पुन्हा खून; गळ्यावर शस्त्राने वार

**जळगांव :** नाथवाडा भागातील ललित प्रल्हाद वाणी (वय-४५ रा. सिंधी कॉलनी, जळगाव) यांच्या गळ्यावर शस्त्राने वर करून त्यांचा खून झाला आहे. ही घटना ३ जून रोजी सकाळी उघडकीला आली.



शहरात महिनाभराच्या कालावधीत खुनाची ही दुसरी घटना घडली. नाथवाडा भागातील ललित वाणी हे सुप्रीम कंपनी, गाडेगाव येथे कामाला होते. ते रात्री ११.३० वाजेच्या सुमारास कामावरून सिंधी कॉलनी- नाथवाडा रस्त्याने घरी येत होते. सोमवारी पहाटेच्या सुमारास मुख्य चौकात बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या बाहेर वाळूवर त्यांचा मृतदेह त्या रस्त्याने ये - जा करणाऱ्यांना दिसला. याबाबत कळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे निरीक्षक बबन आव्हाड यांच्यासह पथक, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत, फॉरेन्सिक टीम घटनास्थळी पोहचली. खुनाचे कारण अद्याप समोर आले नाही. मयत ललित वाणी यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन भाऊ, दोन मुलं असा परिवार आहे.

## पंकजा म्हणतात, पराभव तर माझाही झाला होता

# आदळआपट करून काय साध्य करणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** बीड लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानापासून अगदी मतमोजणी प्रक्रियेपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनावणे यांनी प्रशासनाच्या विरोधामध्ये तक्रारी केल्या होत्या. अगदी बीडच्या जिल्हाधिकारी या मतमोजणी प्रक्रियेत नको, असा आरोप केला होता. यावर बोलताना पंकजा मुंडे यांनी केवळ विशिष्ट एका जातीचे आहेत म्हणून कोणावरती असे आरोप करणं हे योग्य नाही. इतकी आदळआपट करणं बरोबर नाही. तुम्हाला पराभव सुद्धा स्वीकारता आला पाहिजे, असा सल्ला पंकजा मुंडे यांनी बजरंग सोनावणेंना दिला. मी कर्म चांगली केली आहेत. त्यामुळे मला फळाची चिंता नाही,मी कोणतेही अभद्र कर्म केलेले नाहीत. ४ जूनच्या निकालानंतर नेमकं काय बदलणार आहे यावर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, बीडचा खासदार बदलणार आहे, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले.

बजरंग सोनवणे आणि निवडणूक निर्णय अधिकारी महेंद्र कांबळे यांच्यात जोरदार शाब्दिक वाद झाला होता. मात्र, स्ट्राँग रूमची पाहणी केल्यानंतर केल्यानंतर बजरंग सोनावणे यांच्या शंकेचे निरसन झाले होते. यानंतर माध्यमांना सोनवणे यांनी प्रतिक्रिया देत आपल्या वक्तव्यावरून यू टर्न घेतला होता. तुम्ही प्रशासन म्हणून नियमाप्रमाणे मदत केली पाहिजे. तुम्ही ऐकणार नसाल तर आमचा राजकीय अंत करणार आहात,असं जर तुम्हाला करायचं असेल तर असं चालणार नाही, अशी विनंती निवडणूक अधिकाऱ्यांना केल्याचे सोनवणे यांनी स्पष्ट केले होते.

### बजरंग सोनवणे निवडणूक अधिकाऱ्यांवर भडकले

● बीड लोकसभा मतदारसंघाच्या लढतीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. बजरंग सोनावणे यांनी रविवारी निवडणूक अधिकाऱ्यांशी वाद घातला होता. "कांबळे साहेब हात आकडू नका, अन्यथा स्वत:ला संपवून घेऊ का?", असं बजरंग सोनवणे म्हणाले होते. त्यांचे हे वक्तव्य चांगलेच गाजले होते. बजरंग सोनवणे हे मतदान यंत्रे ठेवलेल्या स्ट्राँग रुमची पाहणी करायला आले असताना हा प्रकार घडला होता.

### बीड लोकसभेचा एक्झिट पोल काय सांगतो?



बीड लोकसभा मतदारसंघात मराठा आरक्षणाच्या फॅक्टरमुळे धक्कादायक निकालाची नोंद होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, एक्झिट पोल्सच्या आकडेवारीनुसार बीडमध्ये भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचे पारडे जड मानले जात आहे. त्यामुळे शरद पवार गटाच्या बजरंग सोनावणे यांचा पराभव होऊ शकतो. परंतु, बजरंग सोनावणे यांनी प्रत्यक्ष निकाल हा एक्झिट पोलपेक्षा वेगळा असेल, असा दावा केला आहे. पंकजा मुंडे या बीडमध्ये माझ्यासमोर आहेच कोण, असे म्हणत होत्या. परंतु, आता त्यांना माझी ताकद समजेल, असे बजरंग सोनावणे यांनी म्हटले होते.

## वडिलांनी आणि भावानेच केली मुलीच्या प्रियकराची हत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नवी मुंबई येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. वडिलांनी आणि भावानेच मुलीच्या प्रियकराची हत्या केली आहे. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी २४ वर्षीय भावाला आणि वडिलांना (वय ४५) अटक केली आहे. नवी मुंबई टाउनशिप येथे ही घटना घडली आहे. रविवारी दुपारी ही घटना उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी तरुणीने तिच्या प्रियकराला पनवेल येथील देवाचा पाडा येथे घरी बोलवले होते. त्याचवेळी तरुणीचा भाऊदेखील घरी आला होता. सुरुवातीला त्याने दरवाजा वाजवला मात्र तरुणीने काहीच प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर त्याने जबरदस्ती दरवाजा उघडून आत गेला तेव्हा त्याच्या लक्षात आले की बहिण आणि तिचा प्रियकर आतमध्ये आहेत. तेव्हा आरोपीने त्यांच्या वडिलांना फोन केला.

बहिणीसोबत प्रियकराला पाहून तिच्या भावाचा राग अनावर झाला त्यानंतर भाऊ आण वडिलांनी तिच्या प्रियकराला मारहाण करण्यास सुरुवात केली. मात्र, वडिल व भावाने केलेल्या जबर मारहाणीत १८ वर्षीय प्रियकराचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांना या घटनेबाबत सूचना मिळताच ते घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर लगेचच तरुणाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवला. शवविच्छेदनाचे अहवाल मात्र, अद्याप आलेले नाहीयेत.

मुलीच्या भावाला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून भाऊ आणि वडील दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आले. दोघांविरोधात भारतीय दंडसहिता ३०२ आणि ३४ या अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

## ...मात्र निकाल विरोधात गेला तर

# दाल मे कुछ काला हो सकता है! : वडेट्टीवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** देशात आणि राज्यात सत्तापरिवर्तनासाठी आता अवघे काही तासच शिल्लक राहिले आहेत. सत्ता परिवर्तनासाठी देश उत्सुक आहे. आम्ही कितीतरी पटीने समोर आहोत, अलिकडे आलेले विविध माध्यमांचे सव्हे हे केवळ सत्ताधाऱ्यांना खुश करण्यासाठी केलेला आहेत. महाराष्ट्रात महविकास आघाडी ३५ पेक्षा अधिक जागा जिंकत सर्वत्र मविआचे वर्चस्व निर्माण करेल, असा विश्वास विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी बोलून दाखवला आहे. सध्या जनतेमध्ये सरकार विरोधात प्रचंड संताप असून तो मतांमधून दिसून आला आहे. मात्र, असे असतानाही जर निकाल विरोधात लागले तर दाल मे कुछ काला हो सकता है, असा दावाही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.आमच्या सव्हेनुसार आम्ही २९५ पर्यंत जागा जिंकू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.



### विदर्भातील १० पैकी १० जागा मविआ जिंकेल- विजय वडेट्टीवार

राज्यात लोकसभा निवडणुकांची सुरुवात विदर्भापासून झाली. पहिल्या दोन टप्प्यात निवडणूक प्रक्रिया पार पडली आहे. त्यामुळे विदर्भातील जनतेला अधिक काळ निकालाची प्रतीक्षा करावी लागली आहे. अशातच या विषयी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, विदर्भात महाविकास आघाडीचीच लाट तयार झाली आहे. विदर्भातील जनतेचा उत्तम प्रतिसाद होता. त्यामुळे विदर्भातील १० पैकी १० जागा मविआ जिंकेल, असा विश्वास विजय वडेट्टीवार यांनी बोलताना व्यक्त केला. सध्या जनतेमध्ये सरकार विरोधात प्रचंड संताप असून तो मतांमधून दिसून आला आहे. मात्र असे असतानाही जर निकाल विरोधात लागले तर दाल मे कुछ काला हो सकता है, असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

### आम्ही सगळ्या ठिकाणी लक्ष ठेऊन आहोत

मतमोजणीच्या दिवशी स्टँगरुममधून काढल्या जाणाऱ्या ईव्हीएम बदलणार तर नाहीत ना??? अशी शंका काँग्रेसला आहे. म्हणूनच काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने देशभरातील काँग्रेस कार्यकर्त्यांना सावध राहण्याची आणि स्टँगरुमवर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिल्याचा खळबळजनक दावा काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी केला आहे. या बाबत बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, आम्ही सगळ्या ठिकाणी लक्ष ठेऊन आहोत, अंतिम निकाल येईपर्यंत बाहेर पडायचे नाही, सी- १७ फॉर्मला टॅली केल्याशिवाय बाहेर पडायचे नाही. तसेच टॅली बरोबर असेल तरच मतमोजणीला सुरवात करायची, असे आदेश आम्ही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिल्याचेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

## समृद्धी महामार्गावर उभ्या ट्रकला कारची जोरदार धडक

**वाशिम :** समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरुच आहे. त्यातच वाशिममध्ये समृद्धी महामार्गावर कारने उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिल्याची माहिती समोर आली आहे. या भीषण अपघातामध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. वाशिमच्या मालेगाव तालुक्यातील रिधोरा इंटरचेंजजवळ हा अपघात झाला. भीषण अपघातात कार चालकासह तीनजण ठार झाल्याची माहिती मिळतेय. याबाबत सविस्तर वृत्त असं की, वाशिमच्या समृद्धी महामार्गावर नागपूर लेनवर एक ट्रक उभा होता. मागच्या बाजूने एक भरधाव कार आली अन् तिने या ट्रकला धडक दिली. त्यामुळे या भीषण अपघातात कार चालकासह तिघेजण ठार झाल्याची घटना घडली आहे. अपघातग्रस्त कारमधील मृतदेह बाहेर काढण्याचं काम सुरू आहे. अपघातग्रस्त कारमधील तीन मृतकांपैकी एक मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे. तो कारच्या मागील सीटवर होता. हा मृतदेह मालेगांव ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. तर कारच्या पुढील सीटवर बसलेला चालक आणि एकाजणाचा मृतदेह कारमध्येच फसलेला असल्याची माहिती मिळतेय. आज सकाळी (३ जून) आठ वाजेच्या सुमारास हा अपघात घडला आहे.



## पाणीकपातीमुळे आंघोळ न करण्याच्या सल्ल्यावरून भडकत पत्नीवर चाकूचे वार

**मुंबई :** हल्ली कोणतीही गोष्ट मनासारखी घडली नाही की टोकाला जाण्याचे प्रकार इतके वाढले आहेत, की यातून थेट जीवघेणा हल्ला करण्याच्या घटना घडतात. अशाच दोन अमानुष घटना मुंबईच्या साकीनाका परिसरातून समोर आल्या आहेत. सध्या मुंबईत पाणीकपात सुरु असल्याने पत्नीने पतीला आंघोळ करु नका, या दिलेल्या सल्ल्यावर पती इतका भडकला की त्याने थेट पत्नीवर चाकूने वार केले. तर दुसऱ्या घटनेत केवळ वाढदिवसाला केक उशिरा आणल्याने संतापलेल्या पतीने पत्नी व मुलावर चाकूहल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनांमुळे राज्यातील वाढलेल्या गुन्हेगारीवर चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबईमध्ये अद्याप मान्सूनचे आगमन न झाल्यामुळे तसेच मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये पाणीसाठा कमी झाल्याने पाच टक्के पाणी कपात करण्यात येत आहे. पाणीकपातीमुळे सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होत आहेत. याच पाणीकपातीवरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी परमात्मा गुप्ता आणि त्याची पत्नी मीरा हे साकीनाका येथील टिळक नगर येथे राहतात. शनिवारी उन्हातून घरी आल्यानंतर घामाने भिजल्यामुळे परमात्मा गुप्ता यांनी आंघोळ करण्याचे ठरवले. पण पत्नीने त्यांना आंघोळ करण्यास मनाई केली. बीएमसीची पाणीकपात सुरू आहे आणि पाण्याची बचत केली पाहिजे, असा सल्ला तिने दिला. यामुळे परमात्मा आणि त्यांच्या पत्नीमध्ये बाचाबाची झाली.

हा वाद इतका विकोपाला गेला की, पतीने चाकूने पत्नीवर हल्ला केला. ज्यामुळे ती गंभीर जखमी झाली. तिला घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. साकीनाका पोलीस ठाण्याच्या पथकाने परमात्माला त्याच्या राहत्या घरातून उचलून हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे.

## मनसेविरोधात भाजपने अखेर उमेदवार रिंगणात उतरवलाच

# अभिजीत पानसे विरुद्ध निरंजन डावखरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भाजपकडून विधानपरिषदेचे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. भाजप विधान परिषदेच्या एकूण तीन जागा लढणार आहे. मुंबई शिक्षक आणि पदवीधरसहित, कोकण पदवीधरवर भाजपकडून उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. कोकण विभाग पदवीधरमधून निरंजन डावखरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मुंबई पदवीधरमधून किरण शेलार तर, मुंबई शिक्षकमध्ये शिवनाथ दराडे यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून कोकण पदवीधरसाठी अभिजीत पानसेंच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. तेव्हापासूनच भाजपकडून विधान परिषदेवर असलेले निरंजन डावखरेंचं काय होणार? याच्या चर्चा रंगल्या होत्या. मनसेनं जाहीर केलेला उमेदवार महायुतीचा की, मनसे स्वबळावर लढणार अशा चर्चा सुरू होत्या. त्यामुळे भाजपकडून राज ठाकरेंची मनधरणी केली जाणार का? अशाही चर्चा सुरू होत्या. अशातच आता भाजपनं विधान परिषदेसाठी यादी जाहीर केली आहे. कोकण पदवीधरसाठी भाजपकडून निरंजन डावखरेंच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.





महायुतीत विधानसभेचं बिगुल वाजण्याआधीच जागांवरून रस्सीखेच सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. असं असतानाच त्यापूर्वी राज्याच्या राजकारणात विधान परिषदेची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. लोकसभेत मोदींना बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या राज ठाकरेंनी, भाजपचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या कोकण पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत मनसेकडून अभिजीत पानसेंची उमेदवारी जाहीर केली. राज ठाकरेंची ही खेळी भाजपसाठी धक्का असल्याचं बोललं जात आहे. कोकण पदवीधर हा भाजपचा पारंपारिक मतदारसंघ समजला जातो आणि याच मतदारसंघात निरंजन डावखरे हे भाजपचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे राज ठाकरेंनी अचानक अभिजीत पानसेंचं नाव जाहीर करून भाजपची पुरती गोची केल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होत्या.

#रा

# यशवंत विद्यार्थीनींचा दळवी फाऊंडेशनच्या वतीने सन्मान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इयता दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला. पुरंदर तालुक्यात नेहमीप्रमाणे यंदाही मुलींनीच बाजी मारली. तालुक्यातील प्रथम तीनही विद्यार्थिनीच असून, त्यांचा सन्मान नुकताच दळवी मेडीकल फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आला. तीनही मुलींच्या घरी भेट देऊन फाऊंडेशनचे डॉ. राजेश दळवी यांनी विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

गुरूकुल विद्यालयाची अवंती विजय शिंदे हिने ९८.२० टक्के गुण मिळवित तालुक्यांत प्रथम येण्याचा मान मिळवला. पितृछत्र नसलेल्या व आई खानावळ चालवत असताना अवंतीने परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. दळवी मेडीकल फाउडेशनच्यावतीने स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छव मिठाई देवून तिच्या आई व बहिणीसमवेत अवंतीचा सत्कार करण्यात आला. यावेळी तिच्या मराठी विषय शिक्षिका मंदा सुनील कुंजीर, रेनबो कॉम्प्युटरचे दत्तात्रय खेडेकर, अक्षरसृष्टीचे सिद्धनाथ पवार प्राथमिक शिक्षक शरद बोबडे, पत्रकार हेमंत ताकवले यावेळी उपस्थित होते. ९७.६० टक्के गुण मिळवणाऱ्या वाघिरे विद्यालयाची श्रुती संदिप मेमाणे हिची आई गृहिणी असून, वडील राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेत वाहक म्हणून काम करतात. तिचादेखील घरी जावून डॉ. राजेश दळवी यांनी सत्कार केला.

गुरूकुल विद्यालयाचीच आदिती शहाजी जाधव हिने ९७.४० टक्के गुण मिळवित तालुक्यात तिसरी येण्याचा मान प्राप्त केला आहे. वडील माध्यमिक शिक्षक असणाऱ्या आदितीची आई गृहिणी आहे. तीनही मुलींच्या या उज्ज्वल यशाबद्दल डॉ. राजेश दळवी यांनी त्यांच्या फाऊंडेशनच्या वतीने अभिनंदन करत सन्मान केला.

## ५ दिवसांत ५ घरफोड्या; टेहाळणी करून चोरी केल्याचा संशय

# ड्रोनचे गूढ उलगडण्यात खाकी अपयशी


■ तुळशीराम घुसाळकर

**लोणी काळभोर :** पुर्व हवेलीतील लोणी काळभोरसह उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या ५ दिवसांत ५ घरफोड्या करून चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. त्यातच रात्रीच्या वेळी ड्रोन आकाशांतून घिरट्या घालत फिरत असल्याची व त्याद्वारे टेहाळणी करून चोरी करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा गावांमध्ये रंगली आहे. ड्रोनबद्दल गूढ वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे व दहशतीचे वातावरण पसरले आहे. यामुळे पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

सोरतापवाडी येथे एक व कुंजीरवाडी येथे दोन घरफोड्या झाल्याच्या घटना सोमवारी (दि. २७ मे) रोजी मध्यरात्री दीड ते अडीच वाजण्याच्या सुमारास घडल्या होत्या. घटना घडण्यापूर्वी नागरिकांना या परिसरातील अवकाशात ड्रोन कॅमेरे फिरताना दिसले होते. तेव्हा नागरिकांनी ड्रोनचा पाठलाग केला. परंतु त्यांना ड्रोन सापडला नाही. हा ड्रोन घरापासून सुमारे ३०० ते ४०० फूट उंचीवरून फिरत असून **'लेझर लाईट'** प्रमाणे त्याचा उजेड पडत असल्याने ड्रोनने रेकी करूनच या घरफोड्या झाल्याचा संशय नागरिकांना आहे.

> सोरतापवाडी येथील चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून, पोलीस आरोपींच्या मागावर आहेत. मात्र, ड्रोनच्या सहाय्याने रेकी केल्याची बाब तपासात समोर आली नाही. जर नागरिकांना आकाशात ड्रोन घिरट्या घालताना आढळला तर त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.
>
> **— शंकर पाटील,**
> वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरूळी कांचन पोलीस ठाणे

> कुंजीरवाडी परिसरात रात्रीच्या दहानंतर आकाशात ड्रोन फिरत आहे. या ड्रोनचा माझ्या काही मित्रांनी पाठलाग केला. मात्र, अंधारात ड्रोन गायब झाल्याने तो मिळून आला नाही. त्यातच या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे पोलिसांनी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गस्त वाढवावी.
>
> **— हरेश गोठे,**
> (सरपंच, कुंजीरवाडी, ता. हवेली)



उरुळी कांचन, कुंजीरवाडी व सोरतापवाडी परिसरात मागील काही दिवसांपासून दिवसा घरफोडी करून मौल्यवान वस्तूंच्या चोरी होण्याचे प्रकार घडत आहेत. चोरटे ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करून घरात किती व्यक्ती आहेत, हे तर तपासत नाही ना? हालचालींवर लक्ष्य ठेवण्यासाठी ते ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करीत असावेत, अशी शंका नागरिकांना आहे. हे ड्रोन कॅमेरे आहेत की आणखी दुसरे काही? याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. तसेच यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे या सर्व प्रकारांचा पोलिसांनी छडा लावावा, अशी मागणी नागरिकांमध्ये जोर धरू लागली आहे.

बारामती व भिगवण परिषदेत गेल्या १५ दिवसांपासून रात्रीच्या वेळी अधिकृत परवानगी नसलेला ड्रोन घिरट्या घालत होता. आता कुंजीरवाडी व सोरतापवाडी परिसरात रात्री दहानंतर ड्रोन फिरत असून, याची कोणतीच अचूक माहिती कोणत्याच प्रशासकीय यंत्रणेकडे उपलब्ध नाही. या ड्रोनची प्रत्येक गावात जोरदार चर्चा असून वेगवेगळे तर्क वितर्क लावले जात आहेत. पण, हा ड्रोन नागरिकांना दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष न करता या ड्रोनचा लवकरात लवकर शोध लावावा, अशी मागणी पूर्व हवेलीतील नागरिकांनी केली आहे.

कुंजीरवाडी परिसरात चोर दिसून आल्याचे समजल्याने गावात एकच खळबळ उडाली होती. गावातील तरुण वर्गाने चोरांचा पाठलाग देखील केला. पण चोर पळून जाण्यात यशस्वी झाले. अवकाशात ड्रोन उडताना दिसला की, तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात एकत्र येऊन दुचाकीवर बसून ड्रोन चालकाला शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. अवकाशात फिरणाऱ्या ड्रोनसदृश्य वस्तूमुळे तरुणांनी गल्ली गल्लीत रात्रीच्या गस्त सुरु केल्या आहेत.

सोरतापवाडी व कुंजीरवाडी येथील घरफोड्यांमधील चोरटे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहेत. परंतु पोलिसांना अद्यापही त्यांना पकडण्यात अपयश आले आहे. पोलीस तपासाच्या नावाखाली केवळ कागदी घोडे नाचवित असल्याचा प्रकार पुढे आला आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## पान १ वरून

### भारतीय लोकशाहीचा विक्रम

आचारसंहितेच्या ४९५ तक्रारींपैकी ९० टक्क्यांपेक्षा जास्त तक्रारी निकाली काढण्यात आल्या. २०१९ च्या वेळी ५४० ठिकाणी फेरमतदान घेण्यात आले होते. त्या तुलनेत यंदा केवळ ३९ ठिकाणी फेरमतदान घेण्यात आले. यातील २५ केंद्रे ही अरुणाचल तसेच मणिपूरमधील होती.
मतदानाच्या प्रक्रियेदरम्यान निवडणूक आयोगाच्या आयुक्तांवर ते बेपत्ता आहेत, अशी टीका करण्यात आली होती. त्याला उत्तर देताना, मतदानाच्या काळात आम्ही जनतेशी संवाद साधत होता. प्रसिद्धी पत्रकांच्या माध्यमातून आम्ही जनतेशी संवाद साधत होतो. जवळपास १०० प्रसिद्धी पत्रके आयोगाने प्रसिद्धीस दिली, असे त्यांनी सांगितले. ६८ हजार मॉनिटरिंग टीमसह १.५ कोटी मतदार आणि सुरक्षा कर्मचारी मतदान प्रक्रियेत सहभागी झाले आहेत.

### उद्धव ठाकरे रालोआत येणार : राणा

मात्र, येणारा काळ हा पंतप्रधान मोदी यांचाच आहे, हे समजून आले की, उद्धव ठाकरे रालोआत सहभागी होतील, हे आपण सांगू शकतो. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ब्लडप्रेशरची औषधे आणि डॉक्टर सोबत ठेवावेत. मतमोजणीदिवशी त्यांच्यातील अनेकांना धक्का बसेल, असा टोलाही त्यांनी मविआच्या नेत्यांना लगावला. नवनीत राणा या दोन लाखांहून अधिक मताधिक्क्याने विजयी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अमरावतीमध्ये काँग्रेसचे बळवंत वानखेडे आणि नवनीत राणा यांच्यात प्रमुख लढत आहे. हनुमान चालिसाच्या पठणावरून मविआ सरकार आणि राणा दांपत्य यांच्यात खडाजंगी झाली होती.

### सीमाशुल्क विभागाची सोलापूरमध्ये मोठी कारवाई

विरोधी पथकला मिळाली होती. यानंतर एक पथक सोलापूर ग्रामीण भागात पाठवण्यात आले होते. एका आयशर ट्रकमधून गांजा आल्याची माहिती पथकाला मिळाली. पथकाने गाजाचा ट्रक शोधून ताब्यात घेतला. ट्रकची पाहणी केली असता कोणाला संशय किंवा वास येऊ नेय यासाठी कोंबड्यांची विष्ठा असलेल्या पोत्याखाली गांजा लपवल्याचे आढळून आले. पथकाने २ कोटी २० लाखांचा 883 किलो गांजाची वाहतूक करणाऱ्या ट्रकसह चालकाला ताब्यात घेतले. आरोपीकडे चौकशी केली असता आरोपी स्वत: गांजाचा मालक असून तो ओडीसा मधून ट्रक घेऊन आल्याचे सांगितले.या गांजाची विक्री सोलापूर भागात करण्यात येणार होती. गांज्या सोलापूर पर्यंत येईपर्यंत कोण कोणत्या भागात गांजा विकला याचा तपास सीमा शुल्क विभागाचे अधिकारी करीत आहेत. आरोपीवर एनडीपीएस ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करुन अटक केली आहे.

### शनिवारवाड्यात बॉम्बची अफवा; तरुणावर गुन्हा

पोलीस शिपाई राकेश बाळासाहेब गायकवाड यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी आयपीसी ५०१/१/ब,५०६/२, १८२ नुसार गुन्हा दाखल आहे. सातपुतेने शनिवारी (१ जून) पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षात दूरध्वनी केला. शनिवारवाड्यातील प्रवेशद्वारात बॉम्ब ठेवला असल्याची खोटी माहिती त्याने नियंत्रण कक्षाला दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच बॉम्बशोधक नाशक पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. बॉम्बशोधक पथकाने पाहणी केली. तेव्हा बॉम्बसदृश वस्तू आढळून आली नाही. पोलीस नियंत्रण कक्षात दूरध्वनी प्रकरणात पोलिसांनी तांत्रिक तपास केला. तपासात सातपुते याने दूरध्वनी करून शनिवार वाड्याच्या पुढच्या गेट जवळ बॉम्ब ठेवला आहे, मदत हवी आहे असे मैत्रिणीने सांगितल्याचे त्याने सांगितले. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तपासात ही अफवा असल्याचे समोर आले. आरोपीने खोटा फोन करुन सरकारी यंत्रणेस वेठी धरुन, जाणीवपूर्वक खोटी माहिती देवून लोकांच्या मनात भीती निर्माण केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल पाटील करत आहेत.

### पश्चिम बंगालकडे देशाचे लक्ष

भाजपने येथे जोरदार प्रचार केला आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपने येथे १८ जागा जिंकल्या होत्या. येथील जागा वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न भाजपने केले. लोकसभेत नुकसान झाले, तर तृणमूल काँग्रेससाठी तो धोक्याचा इशारा असेल. विधानसभा निवडणुकीत त्याला सत्ता राखण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल.

### उद्धव ठाकरेंवर आयोगाची कारवाई

१४ तक्रारींवर कारवाई केली असून, १३ नोटिसा बजावल्या आहेत. मुंबईत मतदानाच्या दिवशी अनेक मतदारांची नावे हे मतदान यादीतून वगळण्यात आल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला होता. तसेच मुंबईकर मोठ्या संख्येने मतदानासाठी घराबाहेर पडले. पण निवडणूक यंत्रणा कमी पडली. निवडणूक आयोगाकडून मुद्दाम ज्या ठिकाणी ठाकरे गटाला किंवा महाविकास आघाडीला जास्त मतदान होऊ शकते, तिथे मतदानासाठी मुद्दाम जास्त वेळ लावला जातोय, असाही आरोप उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन केला होता. निवडणूक आयोगाच्या दिरंगाईमुळे मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या. अखेर कंटाळून अनेक मतदारांनी रांगेतून बाहेर पडत मतदान न करण्याचा निर्णय घेतला, असा आरोप त्यांनी केला होता. उद्धव ठाकरे यांनी आपल्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगावरही निशाणा साधला होता. त्यांनी नागरिकांना कोणकोणत्या मतदानकेंद्रांमध्ये मुद्दाम दिरंगाई केली जाते, तसेच तिथले निवडणूक कर्मचारी कोण होते, यांची नावे जवळच्या ठाकरे गटाच्या शाखेत सांगण्याचे आवाहन ठाकरे यांनी केले होते. यानंतर आपण त्यांची नावे पत्रकार परिषद घेऊन जाहीर करु, असेही ते म्हणाले होते.

### पुण्यात जल्लोषाची तयारी पूर्ण

अनिल शिरोळे आणि भाजपचे दिवंगत गिरीश बापट यांनी अनुक्रमे २०१४ आणि २०१९ या दोन निवडणुका मोदी लाटेत जिंकल्या होत्या. यंदाच्या निवडणुकीचा निकाल या मतदारसंघात पंतप्रधान मोदींची जादू कायम आहे का, हे ठरवेल.

### लिव्हइनमध्ये वाद, प्रेयसीला पेटवले

(पान १ वरून)

आरोपी आणि फिर्यादी यांच्यात प्रेमसंबंध असून ते वाकड परिसरात लिव्हइन रिलेशनशिपमध्ये राहतात. आरोपी फिर्यादी यांना घरात राशन व घर खर्च देत नसल्याने त्यांच्यात वारंवार वाद होत होते. फिर्यादी यांनी घर खर्च व राशन बाबत विचारणा केल्यावर आरोपी भांडण करत होता. फिर्यादी यांनी रविवारी दुपारी पावणे चारच्या सुमारास आरोपीला राशन व घर खर्चासाठी घरी बोलावून घेतले. आदम पठाण याने घरी येताना एका बाटलीत पेट्रोल घेऊन आला. फिर्यादी यांनी खर्चाबाबत विचारणा केली असता खान याने बॅगेतून पेट्रोलची बाटली काढली.खान याने फिर्यादी यांना आज तुझा विषयच संपवून टाकतो असे म्हणून महिलेच्या अंगावर बाटलीतील पेट्रोल टाकले. त्यानंतर माचीस मधून काडी ओढून महिलेला पेटवून देऊन जीवंत जाळण्याचा प्रयत्न करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादीला घरात ओढून नेऊन शिवीगाळ करुन हाताने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## निकालाआधीच बॅनरबाजी सुरूच...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**राजगुरुनगर :** लोकसभा निवडणूक निकालापूर्वीच राजगुरूनगर (ता. खेड ) येथे पुणे नाशिक महामार्गावर विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या अभिनंदनाचे फ्लेक्स लागले आहेत. यामुळे आजच्या निकालाची उत्सुकता गगनाला भिडली आहे.

### 'त्या' रात्री मी दारू प्यायलो होतो!

#### आरोपी मित्रांचीही कबुली

(पान १ वरून) पुणे पोलिसांनी आरोपीच्या मित्रांची कसून चौकशी केली. अल्पवयीन मुलाचे दोन्ही मित्र मागील सीटवर बसले होते. तो मद्यप्राशन करुन भरधाव वेगात कार चालवत होता, अशी माहिती अल्पवयीन मुलाच्या मित्रांनी पोलीस चौकशीत दिली आहे, असे सुत्रांनी दिलेल्या माहितीत समोर आले आहे. दरम्यान, कल्याणी नगर अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाच्या दोन्ही मित्रांना पोलीस साक्षीदार करणार असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, याबाबत पुणे पोलिसांकडून कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

पुण्यातील कल्याणी नगरमध्ये रविवारी (दि.१९ मे) मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात आयटी अभियंता असलेले अनिश अवधिया (वय २७) आणि अश्विनी कोष्टा यांचा जागीच मृत्यू झाला होता. अपघाताच्या वेळी आरोपी अल्पवयीन मुलागा त्याच्या ताब्यातील पोर्शे कार ताशी १६० किमीच्या वेगात चालवत असल्याचे तपासात समोर आले आहे. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# आमदार रवींद्र धांगेकर यांनी जेजुरी कडेपठार गडावर केले धार्मिक विधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी :** श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी यांनी संकल्पिलेल्या प्रत्येक महिन्यातील श्री मल्हारी सहस्त्रनाम याग कसबा, पुणे मतदार संघाचे आमदार आणि पुणे लोकसभा मतदार संघाचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि त्यांच्या पत्नी सौ. प्रतिभा रवींद्र धंगेकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाली. यावेळी आमदार रवींद्र धंगेकर यांनी वरूण राजाची महाराष्ट्रावर कृपादृष्टी होऊन सर्वत्र आनंद आणि समाधान बहरू देत अशी प्रार्थना केली.

कडेपठार गडावर आमदार रवींद्र धंगेकर यांनी सपत्नीक महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या कडेपठार गडावर जावून दर्शन घेतले. त्यानंतर मंदिरासमोर देहशुध्दी, देवता वंदन, गणपती पूजन, पुण्याह वाचन, नांदी श्राध्द, संभारदान व नंतर प्राकारशुध्दी, उदकशांत, नवग्रहस्थापन, अग्नीस्थापन, पूर्णाहूती हे धार्मिक विधी करून मूलस्थान तीर्थक्षेत्र श्री कडेपठार निवासी खंडेरायांच्या स्वयंभू पिंडींवर रुद्राभिषेक, पूजा आणि महाआरतीचे सर्व धार्मिक विधी केले. या धार्मिक विधींचे पौरोहित्य वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी व नंदकुमार आगलावे यांनी केले.

ॲड मंगेश जेजुरीकर यांनी यावेळी आमदार रवींद्र धांगेकर यांचा खंडोबा देवाची प्रतिमा देवून सन्मान केला.

# अद्याप शहरात ८४ किलोमीटर लांबीच्या गटारांची आणि १४ हजार चेंबरची स्वच्छता बाकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचू नये, त्याचा त्वरित निचरा व्हावा, यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करून पावसाळी गटार टाकल्या जातात. पण मोठा पाऊस झाला की रस्त्यांना नद्यांचे स्वरूप येऊन वाहतुकीचा खोळंबा होतो. या गटारांची, चेंबरची स्वच्छता केल्याचे सांगितले जात असले तरी पाणी साचते. शहरात नुकत्याच झालेल्या वळवाच्या पावसामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी तळी निर्माण झाल्याचा अनुभव पुणेकरांनी घेतला. एप्रिल महिन्यात महापालिकेने पावसाळी गटार, चेंबरच्या स्वच्छतेचे काम सुरू केले. त्यासाठी १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर प्रत्येकी एक निविदा काढण्यात आली आहे.

पावसाळा तोंडावर आलेला असला तरी अजून महापालिकेकडून पावसाळी गटारांच्या स्वच्छतेचे काम पूर्ण झालेले नाही. सर्वाधिक पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांचे १०० टक्के काम झाल्याचा दावा प्रशासनाने केला असला, तरी अद्याप ८४ किलोमीटर लांबीच्या गटारांची आणि १४ हजार चेंबरची स्वच्छता बाकी आहे. अनेक ठिकाणी चेंबरच्या झाकणात अडकलेली माती, कचरा काढण्यात कामाचा दर्जाही राखलेला नाही. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्च करूनही पाणी तुंबणार आहे. याला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित होणार आहे.

प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाची जबाबदारी एका ठेकेदाराकडे ठेकेदाराकडून केवळ पावसाळी गटाराच्या पाईपच्या तोंडावरील माती, कचरा काढला जातो. आतील कचरा काढला जात नाही. त्यावर महापालिकेच्या अधिकाऱ्यांना नियंत्रण ठेवावे लागते. ठेकेदार व्यवस्थित काम करत आहे की नाही, हे तपासण्यासाठी टँकरने पाइपमध्ये पाणी टाकले जाते किंवा एका -चेंबरमधून बॅटरीचा प्रकाश टाकला जातो व दुसऱ्या चेंबरमध्ये आरसा पकडला जातो विनाअडथळा प्रकाश पोहोचला तरच व्यवस्थित स्वच्छता झाल्याचे समजते.


## जाहीर नोटीस

तमाम सर्व लोकांना विशेषत: गांव मौजे बारामती, ता. बारामती, जि.पुणे व बारामती तालुक्यातील व पुणे जिल्ह्यातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री. विश्वनाथ कृष्णाजी भुजबळ, रा.बारामती, ता. बारामती, जि.पुणे यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांच्या मालकीची असल्याची खात्री व भरवसा आमचे अशिलांस देवून सदर मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून तशी विसारापोटी रक्कम स्विकारून विसार पावती करून देवून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षीस, करार, साठेखत, कुलमुखत्यारपत्र, विसार पावती, ताबा, खरेदी, लीज, लीन, पोटगी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधीतांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येवून खात्री करून द्यावी व लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे समजून तसेच असे कोणाचेही हक्क वा अधिकार असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन**

तुकडी पुणे, पोट तुकडी, ता.बारामती, जि.पुणे मे. दुय्यम निबंधक सो. बारामती यांचे हद्दीतील गांव मौजे बारामती, ता. बारामती, जि. पुणे येथील बारामती नगरपरिषद हद्दीतील विदयमान मालक यांच्या मालकीची सिटी सर्व्हे नं. १२९० क्षेत्र ११.०० चौ.मी. व त्यावरील बांधकाम ही मिळकत, यांसी चतु:सिमा-मूळ सरकारी रेकॉर्डप्रमाणे, सर्व तदंगभूत वस्तूसह व सर्व इजमेंटचे हक्कासह, तसेच रस्ता वापर वहीवाट करण्याचे हक्कासह.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस दिली असे
दि.०३/०६/२०२४

सही/-
**(ॲड. अमिताभ सुरेशचंद्र मेहता)**
(मो.नं. ९३७२४४८०४४)

**बारामती :** येथील रूबी हॉल क्लिनिक तसेच जेजुरी येथील जेजुरी आयसीयू मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हृदयविकार रुग्णांसाठी मोफत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. भिगवण रस्त्यावरील सम्यक लाइफ स्टाइल शेजारील रूबी हॉल क्लिनिक या ठिकाणी तर जेजुरी येथील आयसीयू मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हे शिबीर होणार आहे.

## पोर्शेपॅटर्न : न्यायालयाचा निर्णय, पोलीस पाटलावर गुन्हा दाखल

# बाप येरवड्यात; मुलगी बालगृहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापुर :** पुण्यात हिट अॅन्ड रन प्रकरण ताजे असतानाच शिरुर तालुक्यातील पोलीस पाटलाच्या अल्पवयीन मुलीने मालवाहू पिकअप चालविताना दुचाकीला धडक दिल्याने एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. तर एक तरुण जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी पोलीस पाटलासह त्याच्या अल्पवयीन मुलीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता न्यायालयाने पोलीस पाटील यास तीन दिवस कोठडी, तर अल्पवयीन मुलीला बारा दिवस बालसुधार गृहात पाठविण्यात आले आहे.


पोलिस पाटलाच्या अल्पवयीन मुलीकडून अपघात एक ठार
शिरुर तालुक्यात घडला खळबळजनक पोर्शे पॅटर्न

सोमवारी पुन्हा पोलीस पाटलाला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलीस पाटलांना येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश पोलिसांनी दिले आहेत आरणगाव ता. शिरुर येथील वडगाव बांडे रस्त्याने अरुण मेमाणे व मच्छिंद्र बांडे हे दोघे दुचाकीहून चाललेले असताना अचानक आरणगावचे पोलीस पाटील संतोष लेंडे यांची अल्पवयीन मुलगी पिकअप चालवत असताना पिकअपची दुचाकीला जोराची धडक बसली.

पिकअपने दुचाकीसह दोघांना काही अंतरावर फरपटत नेले. यावेळी पोलीस पाटील संतोष लेंडे देखील त्यांच्या अल्पवयीन मुली शेजारी बसलेले होते. या अपघातात अरुण विठ्ठल मेमाणे वय ३० वर्षे रा. वडगाव बांडे ता. दौंड जि. पुणे याचा मृत्यू झाला. तर महिंद्र रावसाहेब बांडे वय २६ वर्षे रा. वडगाव बांडे ता. दौंड जि. पुणे हा जखमी झाला. याबाबत सतिश विठ्ठल मेमाणे २६ रा. वडगाव बांडे ता. दौंड जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी आरणगावचे पोलीस पाटील संतोष निवृत्ती लेंडे व त्यांची अल्पवयीन युवती दोघे रा. आरणगाव ता. शिरुर जि. पुणे या दोघांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली.

न्यायालयाने पोलीस पाटील संतोष निवृत्ती लेंडे यांना ३ जूनपर्यंत पोलीस कोठडी, तर त्यांच्या अल्पवयीन मुलीला १३ जूनपर्यंत बालसुधारगृहात ठेवण्याचे आदेश पोलिसांना दिले. त्यांनतर पुन्हा पोलीस पाटील संतोष लेंडे यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलीस पाटील संतोष लेंडे यांना येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले असून, या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे हे करीत आहेत.

### अपघातांची मालिका

● पुण्यातील पोर्शे अपघातानंतर राज्यातील अनेक ठिकाणी भीषण अपघातांच्या मालिकेचे सत्र सुरूच आहे. त्याचप्रमाणे समृद्धी महामार्गावरदेखील आतापर्यंत अनेक अपघात झाले आहेत. कोल्हापूर शहरात एका भरधाव कारने दुचाकीला जोराची धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, अपघाताचा व्हिडिओ पाहताना अंगावर काटा आल्याशिवाय राहत नाही. यामुळे अपघातांची मालिका थांबणार कधी, हाच खरा प्रश्न आहे.

# कर्मचाऱ्यांचा जीव टांगणीला; ठेकेदाराकडून उडवाउडवीची उत्तरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** पावसाळा सुरु होण्याअगोदर शिरुर तालुक्यामध्ये वीज वितरण कंपन्यांची विद्युत जनित्र व तारा दुरुस्तीचे काम सुरू आहे. मात्र, हे काम करताना संबंधित ठेकेदाराकडून कामगारांना कुठलीही सुरक्षा साधणे पुरवली जात नसल्याची बाब समोर आली आहे. त्याचबरोबर अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे संबधिक कर्मचारी काम करत असताना एखादी अनुचित घटना घडली, तर त्यास जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्या शिरुर तालुक्यात विविध ठिकाणी विद्युत जनित्र, जुन्या तारा दुरुस्तीचे काम सुरू आहे. त्याच स्वरुपाचे काम रांजणगाव गणपती येथे गणेगाव खालसा रस्त्यावरती सुरू होते. मात्र, या ठिकाणी विद्युत जनित्रावरती काम करणाऱ्या व्यक्तीला संबंधित ठेकेदाराकडून सुरक्षेसंदर्भात कुठल्याही साधन सुविधा उपलब्ध करुन दिल्या नव्हत्या. तरीदेखील काम करण्यासाठी भर उन्हात खांबावरती चढायला लावून काम करून घेतले जात आहे. याबाबत संबंधित अधिकारी यांच्याशी संर्पक साधला असता, या प्रकाराबाबत आपणास माहिती नाही माहिती घेऊन उत्तर देतो, अशी उडवा उडवीचे उत्तर दिली जात आहे.

### कनेक्शन देऊन कलेक्शन

● रांजणगाव गणपती परिसरातील गावांमध्ये कार्यरत असलेले अनेक वायरमन हे संबंधित गावांमध्ये न थांबता रांजणगाव येथेच तळ ठोकून असतात. यातील बहुतांश वायरमन हे कारेगाव, रांजणगाव या ठिकाणी नवीन इमारती व प्लॉटींग वाल्यांना " कनेक्शन देऊन कलेक्शन " करण्यात व्यस्त असल्यामुळे गावांमध्ये फ्युज गेला, तरी शेतकऱ्यांना ही कामे करावी लागत असल्यामुळे या ठिकाणी ही अनुचित घडना घडू शकतात.

## तारेवरची कसरत!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**रांजणगाव गणपती :** येथे ठिकठिकाणी विद्युत रोहित्राची कामे विद्युत पोलवर चढवून केली जात आहे. परंतु, संबंधित कर्मचाऱ्यांना सुरक्षेची कोणतीही साधने पुरवली जात नाही आहे. यामुळे काम करताना मोठी तारेवरची कसरत करावी लागत असून, जीवाशी खेळ होत आहे.

## मनपा शाळेत शिक्षक रुजू व्हावेत; आपची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खडकवासला :** मागील शैक्षणिक वर्षात शिक्षकांच्या कमतरतेमुळे वारजे, कर्वेनगर तसेच पुणे शहरातील सर्वच मनपा शाळेतील मुलांचे नुकसान झाले.

पण चालू वर्षात शिक्षक भरती करून ज्या शाळेत शिक्षकांची कमतरता आहे, त्या शाळेत शिक्षक नव्याने रुजू करावेत, ही मागणी आपच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभाग पुणे मनपा प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे यांच्याकडे केली.



यावेळी आप महिला आघाडी अध्यक्ष सुरेखा भोसले, शिक्षक आघाडी अध्यक्ष शितल कांडेलकर, शहर उपाध्यक्ष निलेश वांजळे, सहसचिव संजय कटार नवरे, संघटन मंत्री अविनाश भाकरे, संतोष काळे, अविनाश केंगले हे उपस्थित होते.

### पहाटेची घटना: जीवितहानी नाही, दुकानदाराचे नुकसान

# कंटनेर घुसला थेट सलूनमध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरुर :** पुणे-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील सरदवाडी (ता. शिरुर) येथे शनिवार दि. १ जून रोजी पहाटे तीनच्या सुमारास रात्री भरधाव असणाऱ्या मालवाहू कंटेनर ट्रेलरच्या चालकाचा ताबा सुटल्याने कंटेनर ट्रेलरने रस्ता दुभाजक ओलांडून थेट सलूनच्या दुकानाला धडक दिली.



पहाटेच्या वेळी रहादारी कमी असल्यामुळे पुढे होणारा खूप मोठा अपघात टळला आहे. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. खात्रीलायक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एम. एच. १२ एम. व्ही. ६९३९ हा मालवाहू कंटेनर ट्रेलर पोकलॅनमशीन घेऊन पुण्याकडुन-अहमदनगरकडे जात असताना सरदवाडीजवळ आल्यानंतर कंटेनर चालविणाऱ्या चालकाचा ताबा सुटला. यामुळे कंटेनर ट्रेलरने थेट रस्ता ओलांडून सलूनच्या दुकानाला धडक दिली. ही सगळी घटना जवळच असलेल्या सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.

सदरचा परिसर हा दाट लोकवस्तीचा असून पहाटेची वेळ असल्यामुळे सलुनचे दुकान बंद होते. इतर वेळेस वर्दळीच्या असलेल्या या ठिकाणी पहाटेच्या वेळेस कोणी नसल्याने मोठा अनर्थ टळला. दरम्यान, अपघाताचा मोठा आवाज झाल्यानंतर नागरिकांसह व्यावसायिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली.

या अपघातामध्ये सलुन व्यवसायिकाच्या दुकानाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून, इमारतीचेही नुकसान झाले आहे. हा अपघात एवढा गंभीर होता की, कंटेनर ट्रेलर इमारतीला धडकल्यानंतर मोठा आवाज झाला. तसेच इमारतीमधील लोकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला असता. परंतु, 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीप्रमाणे पहाटेच्या वेळी हा अपघात सुदैवाने घडल्याने कुठलीही जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला असून वाहनचालकाकडुन नुकसान भरपाई वसुल करण्यात यावी तसेच त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी सरदवाडी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच शिरुर पोलीस स्टेशनमध्ये या घटनेबाबत अजून कसलीही तक्रार दाखल झालेली नाही.

## मित्राला जेवायला बोलावून मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** तांदळी येथे एका मित्राला घरी जेवायला बोलावून त्याला मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी शिरुर पोलीस स्टेशन येथे सागर जालिंदर सूर्यवंशी व ऋषिकेश निकम या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तांदळी ता. शिरुर येथील सागर सूर्यवंशी हा एका गुन्ह्यामध्ये जेलमध्ये गेलेला होत्या. त्यानंतर जामिनावर बाहेर आल्यानंतर त्याने अमोल धोत्रे याला जेवायला बोलावले त्यानंतर अमोल यास मी जेलमध्ये गेल्यानंतर माझ्या घरच्यांना तू खूप मदत केली. ते सारखे तुझे नाव घेतात, असे म्हणाला आणि मारहाण करण्यास सुरूवात केली.

# बिबट्याने पाडला मेंढीचा फडशा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील हॉटेल सृष्टीच्या पाठीमागे मुक्कामी असलेल्या एका मेंढपाळाच्या मेंढीचा रात्रीच्या सुमारास बिबट्याने फडशा पाडला असून, येथे पिंजरा लावण्याची मागणी सरपंच बापूसाहेब काळे यांनी केली आहे.

निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील हॉटेल सृष्टीच्या पाठीमागे बापू चोरमले हे मुक्कामी थांबलेले असताना रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास मेंढ्यांच्या ओरडण्याचा आवाज आल्याने सुमन चोरमले झोपेतून झाल्या आहेत. त्या मेंढ्यांजवळ गेल्या असता बिबट्याने तेथून धूम ठोकून ऊसात गेला. याबाबत



माहिती वनपाल गौरी हिंगणे यांना मिळताच वनरक्षक प्रमोद पाटील, रेस्क्यू टीमचे शेरखान शेख यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. यावेळी सरपंच बापूसाहेब काळे, बापू चोरमले, कृष्णा चोरमले यांसह आदी उपस्थित होते, लवकरच येथे पिंजरा लावण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे वनरक्षक प्रमोद पाटील यांनी सांगितले.

### आचार्य अॅकॅडमीच्या १७२९ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

# गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** दहावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळविलेल्या १७२९ आचार्य अॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा रविवारी २ जून रोजी बारामतीत उत्साहात पार पडला. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक या सोहळ्यास उपस्थित होते.



सीबीएससी, एसएससी बोर्ड, आयसीएससी बोर्डात दहावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. संस्कार बबन काळे (१०० टक्के), वृषाली दत्तात्रय कोरे (१०० टक्के) सानिका कमलाकर टेकवडे (९९.४० टक्के), संस्कृती विनायक जमदाडे (९८.८० टक्के ), वेदांती नानासाहेब साखरे (९८.४० टक्के), स्वराली निरंजन वेदपाठक (९८.२० टक्के), ओम सचिनकुमार कुंभार (९८.२० टक्के), प्रणव चंद्रकांत डोंगरे (९७.६० टक्के), प्रांजल पांडुरंग जगताप (९७.४० टक्के), ऋतुजा नामदेव भिसे (९७.४० टक्के) या विद्यार्थ्यांसह सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. १७२९ आचार्य अॅकॅडमीचे संचालक सुमीत सिनगारे हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उच्च ध्येय ठेऊन भविष्यकाळाची वाटचाल करण्याचा सल्ला यावेळी सिनगारे यांनी विद्यार्थ्यांना दिला. संस्थापक, संचालक प्रा. ज्ञानेश्वर मुटकूळे तसेच संचालक प्रा. प्रवीण ढवळे आणि संचालक कमलाकर टेकवडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

१७२९ आचार्य अॅकॅडमी ही बारामती, इंदापूर आणि पुणे येथील वाकड, रहाटणी येथे कार्यरत असून प्रामुख्याने नीट, जेईई, एमएचटी-सीईटी आणि एनडीए या डॉक्टर, इंजिनिअर तसेच लष्करात अधिकारी होण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या प्रवेश परीक्षांचे प्रशिक्षण देण्याचे काम करते. अवघ्या काही वर्षांच्या कालावधीत या अॅकॅडमीने विद्यार्थी आणि पालकांचा विश्वास संपादन केला आहे.

काळे सर आणि कोरे सर हे पालक प्रतिनिधी म्हणून या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. बापु काटकर यांनी केली. तर सूत्रसंचालन प्रविण अटोळे आणि मोनाली मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन निलेश बनकर, रोहित महाजन आणि राखी मॅडम यांनी केले.

## Selected



## जागतिक सायकल दिनानिमित्त अॅड. बापूसाहेब जगताप यांचा सन्मान

**सासवड :** सासवड तालुका विधी सेवा प्राधिकरण व सासवड बार असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सायकल दिनानिमित्ताने या कार्यक्रमाचे दुपारी २ वाजून १५ मिनटांनी दिवाणी व फौजदारी न्यायालय, सासवड येथे आयोजन केले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रमुख न्यायाधीश ताहेर बिलालसह न्यायाधीश एस. के देशमुख हे होते. यावेळी बार असोसिएशनचे ज्येष्ठ सभासद सायकल पट्टू बापूसाहेब जगताप यांना मोगऱ्याची रोपे, शाल व श्रीफळ देऊन प्रमुख न्यायाधीश ताहेर बिलाल यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन अॅड. राहुल कोलते यांनी केले. प्रास्ताविक अॅड. अण्णासाहेब खाडे यांनी केले. अॅड. राजवर्धन कदम यांनी शाश्वत विकासमध्ये सायकलचे योगदान कशाप्रकारे आहे व सायकल चालविणे हे तंदुरुस्त आरोग्याचे रहस्य आहे, हे विशद केले. यावेळी अध्यक्ष अॅड. बाबासाहेब पिलाणे आदी सभासद उपस्थित होते.



## कार्याची दखल; विलास आदलिंगे यांना 'सेवासन्मान' पुरस्कार

**राजगुरूनगर :** शिक्षक फाउंडेशन संचलित महाराष्ट्र शिक्षक पॅनल तर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार बापदेव शिक्षण प्रसारक मंडळाच्या आंबोली (ता. खेड) येथील आदर्श विद्यालयातील शिक्षक विलास सुग्रीव आदलिंगे यांना प्रदान करण्यात आला आदलिंगे हे २० वर्षांपासून विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत विद्यार्थ्यांना कृतिशील अध्यापन करणारे शिक्षक म्हणून परिचित आहेत. विविध स्पर्धापरीक्षा, विज्ञान प्रदर्शने, शिष्यवृत्ती परीक्षा यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम ते शाळा तालुका व जिल्हा पातळीवर करतात. त्यांनी विज्ञान प्रदर्शनातून शाळेची राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून दिली आहे. तसेच शाळेतील आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना विविध सामाजिक संस्थांकडून शिष्यवृत्ती मिळवून दिली आहे . नाशिक येथील कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा हॉलमध्ये कार्यक्रमात पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र व स्नेहवस्त्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. प्रसिद्ध कवी अनंत राऊत, प्रसिद्ध मराठी अभिनेत्री किशोरी शहाणे आणि महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे अध्यक्ष दीपक चामे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. विलास आदलिंगे यांनी विजयालक्ष्मी आदलिंगे, राजेंद्र यादव, विजय चव्हाण, सचिन तौर यांच्या समवेत पुरस्कार स्वीकारला.

## आजाराला कंटाळून वृद्धाची नदीत उडीमारून आत्महत्या

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथे आजाराला कंटाळून सुसाईड नोट लिहून एका ७४ वर्षीय वृद्धाने भीमा नदीच्या पाण्यात उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याबाबत शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. कोरेगाव भीमा येथील राजेंद्र गव्हाणे यांचे सासरे दत्तात्रय चव्हाण हे गेले पंधरा वर्षांपासून राजेंद्र गव्हाणे यांच्या येथे राहत होते. मात्र ते मधूमेह आजाराने त्रस्त झालेले असल्याने त्यांच्यावर उपचार सुरु होते. २ जून रोजी घरातील सर्वजण लग्नाला गेलेले असताना दत्तात्रय यांनी मी आजाराला कंटाळून आत्महत्या करत आहे, प्रशासनाने माझ्या घरातील लोकांना त्रास देऊ नये. माझी बॉडी नदीजवळ सापडेल अशा आशयाची चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यांनतर सर्वांनी त्यांचा आजूबाजूला शोध घेतला मात्र ते मिळून आले नाहीत. त्यानंतर ३ जून रोजी सकाळी त्यांनी येथील भीमा नदीच्या पाण्यात उडी मारून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. नाईक महेंद्र पाटील हे पुढील तपास करीत आहेत.

## २० कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**भोर :** शहर आणि तालुक्यातील २० कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मा. पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे यांच्या हस्ते महिलांना सन्मानीत करण्यात आले. छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर शनिवारी कार्यक्रम पार पडला. यावेळी खेळ पैठणीच्या कार्यक्रमात महिलांना सन्मानचिन्हे, सन्मानपत्र, भेटवस्तू दिल्या.



पाकिस्तान क्रिकेटसाठी हा रोमांचक काळ आहे. नवीन संघ व्यवस्थापन आणि खेळाडूंचा दृढ निश्चय आहे. मात्र पाकिस्तानला चांगली कामगिरी करायची असेल तर सांघिकरित्या कामगिरी चांगली करावी लागेल.
— गॅरी कर्स्टन

'सगळ्यांना पाकिस्तान क्रिकेटचा स्तर माहिती आहे. आपण आयर्लंडसारख्या छोट्या संघाकडून हरलो. आता वॉन म्हणतो की पाकिस्तानविरूद्ध खेळणं तितकं आव्हानात्मक नव्हतं. या सर्वाला आपणच जबाबदार आहोत.
— कामरान अकमल



# रत्नागिरी जेट्स संघाची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या(एमसीए) वतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२४ स्पर्धेत सलामीच्या लढतीत धीरज फटांगरे(४२धावा), प्रीतम पाटील(३१धावा),अझीम काझी(४६धावा)यांनी केलेल्या धावांसह सत्यजीत बच्छाव(३-२३)याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर गतविजेत्या रत्नागिरी जेट्स संघाने पुनीत बालन ग्रुप कोल्हापूर टस्कर्स संघाचा ५४ धावांनी पराभव करून विजयी सलामी दिली.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर आजपासून सुरु झालेल्या या स्पर्धेत सलामीच्या लढतीला पुणेकरांचा भरघोस प्रतिसाद लाभला होता. पीबीजी कोल्हापूर टस्कर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

रत्नागिरी जेट्स संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ६बाद १७२अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारून दिली. सामन्यात रत्नागिरी जेट्स संघाला पहिला धक्का २.३ षटकात १९ धावा असताना बसला. गोलंदाज निहाल तुसामतने क्रिश शहापूरकर(२ धावा)ला केदार जाधव यष्टीच्या मागे झेल घेऊन तंबूत परत पाठवले. त्यानंतर धीरज फटांगरेने संयमी खेळी करताना २६ चेंडूत ४चौकार व ३ षटकारासह ४२ धावा, तर प्रीतम पाटील(३१ धावा) यांनी खेळी करून संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या गड्यासाठी ३३ चेंडूत ५६ धावांची भागीदारी केली. परंतु धीरज व प्रीतम यांनी कोल्हापूरच्या गोलंदाजीवर हल्ला चढवला. परंतु, या दोघांना हर्ष खळदकर व तरणजीत सिंग धिल्लन यांनी लागोपाठच्या षटकात बाद करून धावसंख्येस खीळ घातली. १२ षटकाच्या शेवटच्या चेंडूला दिव्यांग हिंगणेकर अनावश्यक धाव घेताना अनिकेत पोरवालने त्याला बाद केले. रत्नागिरी संघ यावेळी ४ बाद १०४ अशा स्थितीत होता. त्यानंतर कर्णधार अझीम काझीने ३८ चेंडूत ४ चौकार व १ षटकाराच्या मदतीने ४६ धावांची खेळी करताना संघाची धावगती वाढवली. त्याला गोलंदाज मनोज यादवने आपल्या गोलंदाजीवर झेल बाद केले. निखिल नाईक(नाबाद २०), अभिषेक पवार(१२) यांनी धावा काढून संघाला १७२ धावांचे आव्हान उभे करून दिले.

या आव्हानाला सामोरे जाताना रत्नागिरी जेट्सने कोल्हापूर टस्कर्सचे पॉवरप्लेमध्ये २८ धावात ४ गडी तंबूत परत पाठवले. केदार जाधव(०धावा), अंकित बावणे(४धावा), सचिन धस(११धावा), श्रीकांत मुंढे(१०धावा), सिद्धार्थ म्हात्रे(१५धावा) हे भरवशाचे फलंदाज स्वस्तात बाद झाल्यामुळे संघाला मोठा फटका बसला. ८६ धावसंख्येवर त्यांचे सहा गडी बाद तंबूत परतले होते. त्यानंतर अनिकेत पोरवालने २९ चेंडूत १चौकार व १षटकार खेचताना ३३ धावा काढून संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. सत्यजित बच्छावने त्याला पायचीत बाद केले. त्यानंतर तरणजीत सिंग धिल्लन नाबाद ११, योगेश डोंगरे २४ धावा यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. कोल्हापूर टस्कर्स संघाचा डाव १८.४ षटकात सर्वबाद ११८धावावर संपुष्टात आला. रत्नागिरी जेट्सकडून सत्यजीत बच्छावने २३ धावात ३ गडी बाद करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याला निकित धुमाळ(२-१५), प्रदीप दाढे(२-१७), विजय पावले(१-२४), कुणाल थोरात(१-२५), दिव्यांग हिंगणेकर(१-१४) यांनी चांगली साथ दिली रत्नागिरी जेट्स संघाचा पुढील सामना ४ जून रोजी रायगड रॉयल्स संघाशी तर, कोल्हापूर टस्कर्स संघाचा पुणेरी बाप्पा संघाशी सामना रंगणार आहे.

## प्रगनानंदने कारुआनाला हरवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचा १८ वर्षीय ग्रँडमास्टर आर प्रगनानंदने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत आपली अविश्वसनीय आगेकूच सुरू ठेवली.

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनचा पराभव केल्यानंतर प्रगनानंदने शनिवारी रात्री उशिरा जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या फॅबियानो कारुआनाचा पराभव केला.

या विजयामुळे प्रगनानंदला जागतिक क्रमवारीत टॉप-१० मध्ये पोहोचण्यास मदत झाली. या स्पर्धेच्या आधी, प्रगनानंदने बुधवार, २९ मे रोजी स्टॅव्हेंगर येथे नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या तिस-या फेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनवर पहिला शास्त्रीय विजय नोंदवला होता.

'कै. कॅप्टन शिवरामपंत व्हि. दामले करंडक' १९ वर्षाखालील टी-२० क्रिकेट स्पर्धा

## अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमी संघाला विजेतेपद!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी तर्फे आयोजित 'कै. कॅप्टन शिवरामपंत व्हि. दामले करंडक' १९ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत राजवर्धन शितोळे याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमी संघाने श्री समर्थ क्रिकेट ॲकॅडमीचा ६ गडी राखून पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले.

सिंहगड रस्ता येथील कोद्रे फार्म्स मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना श्री समर्थ क्रिकेट ॲकॅडमीने १८२ धावांचे आव्हान उभे केले. स्वरूप मोरे याने ५४ धावांची खेळी केली. याशिवाय यश जोशी (२६ धावा), रमेश बात्रा (२४ धावा), ओम पाटील (२२ धावा) आणि जयश जयभाय (२० धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाच्या डावाला आकार दिला. राजवर्धन शितोळे याने २१ धावात ३ गडी बाद केले. विश्वजीत फेगडे याने १७ धावात २ गडी बाद केले.

या आव्हानाचा पाठलाग करताना अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमीच्या सलामीवीरांनी तुफानी सुरूवात केली. अनिकेत पातारे याने १३ चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांसह ४७ धावांची झटपट खेळी केली. शिव हरपाळे यानेसुद्धा ४५ धावांचे योगदान दिले. या दोघांनी पहिल्या चार षटकामध्ये ६७ धावांची सलामी दिली आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. त्यानंतर निखील लुनावत याने नाबाद ३२ धावांची तर, रिद्धेश भुरूक याने नाबाद २० धावांची खेळी करून संघाला १६.२ षटकात विजय मिळवून दिला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण महाराष्ट्रीय मंडळाचे सहकार्यवाह श्री. रोहन दामले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे संचालक विक्रम देशमुख यांच्यासह सहभागी संघातील प्रशिक्षक, खेळाडू आणि पालक आदि मान्यवर उपस्थित होते. विजेत्या आणि उपविजेत्या संघांना करंडक आणि मेडल्स् देण्यात आले.

**सामन्याचा संक्षिप्त निकालः**

**अंतिम सामनाः**


- श्री समर्थ क्रिकेट ॲकॅडमीः २० षटकात ८ गडी बाद १८२ धावा (स्वरूप मोरे ५४ (२५, ३ चौकार, ५ षटकार), यश जोशी २६, रमेश बात्रा २४, ओम पाटील २२, जयश जयभाय २०, राजवर्धन शितोळे ३-२१, विश्वजीत फेगडे २-१७) पराभूत वि. अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमीः १६.२ षटकात ४ गडी बाद १८३ धावा (अनिकेत पातारे ४७ (१३, ४ चौकार, ५ षटकार), शिव हरपाळे ४५, निखील लुनावत नाबाद ३२, रिद्धेश भुरूक नाबाद २०, चंद्रहास कुलकर्णी २-२२); सामनावीरः राजवर्धन शितोळे;

**वैयक्तिक पारितोषिकेः**

- स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट खेळाडूः राजवर्धन शितोळे (अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमी, १८ विकेट); सर्वोत्कृष्ट फलंदाजः ऋत्विक रडे (आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी, ३१३ धावा);
- सर्वोत्कृष्ट गोलंदाजः राजवर्धन शितोळे (अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमी, १८ विकेट);

## ५ जूनला भारत-आयर्लंड सामना पावसामुळे रद्द तर...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**युएसए :** आसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२४ मध्ये भारतीय संघाचा पहिला सामना आयर्लंड विरुद्ध ५ जून रोजी अमेरिकेतील नासाऊ काउंटी क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे. आजपर्यंत या मैदानावर एकही सामना खेळला गेला नाही. या मैदानावर भारत आणि आयर्लंड यांच्यात पहिला सामना होणार आहे. याबद्दल चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. पण अमेरिकेत आता काही ठिकणी पाऊस पडत आहे. पावसामुळे अनेक सराव सामनेही रद्द करण्यात आले आहेत, अशा परिस्थितीत भारत आणि आयर्लंड यांच्यातील सामनाही पावसामुळे रद्द झाला, तर निकाल काय लागेल.

आसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२४ चा पहिला सामना भारताला आयर्लंड विरुद्ध खेळायचा आहे. टीम इंडिया टी-२० फॉरमॅटमध्ये नंबर वन टीम आहे, तर दुसरीकडे आयर्लंडही टॉप-१० च्या बाहेर आहे. अशा परिस्थितीत पावसामुळे सामना रद्द झाला तर टीम इंडियाचे नुकसान होणार आहे.

पावसामुळे सामना रद्द झाल्यास दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळेल. म्हणजेच सामना त्याचा फायदा आयर्लंडला होईल. कारण भारताने त्यांना कसेही हरवले असते, पण जर पाऊस पडला तर त्यांना फ्री पॉइंट मिळेल.

आसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२४ आजपासून म्हणजेच २ जूनपासून सुरू झाला आहे. तत्पूर्वी काल भारत आणि बांगलादेश यांच्यात सराव सामना खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने एकतर्फी विजय मिळवला आहे.

प्रथम फलंदाजी करताना भारताने बांगलादेशसमोर १८३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या सामन्यात ऋषभ पंतने शानदार अर्धशतकी खेळी खेळली. याशिवाय हार्दिक पांड्यानेही ४० धावांची खेळी केली. या दोन फलंदाजांच्या शानदार फलंदाजीमुळे भारताची धावसंख्या १८२ पर्यंत पोहोचली. बांगलादेशला हे लक्ष्य गाठता आले नाही आणि ६० धावांनी पराभव पत्करावा लागला.



## अमरावतीचा १३-० असा धुव्वा उडवत पुणे संघ उपांत्यपूर्व फेरीत

**पुणे :** अमरावतीचा १३-० असा धुव्वा उडवत पुणे (पीडीएफए) संघाने बोईसर (पालघर) येथे सुरू असलेल्या वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (विफा) आंतरजिल्हा ज्युनियर (मुली) फुटबॉल स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. रविवारी झालेल्या सलामीच्या लढतीत पुणे संघाने तुलनेत कमकुवत प्रतिस्पर्ध्यांवर सर्व आघाड्यांवर वर्चस्व राखले. सहा खेळाडूंनी मिळून तब्बल १३ गोल केले. त्यात याशिका तेजवानी (पहिल्या, १०व्या, १५व्या मिनिटाला), शीन शर्मा (पाचव्या, २०व्या, २३व्या मिनिटाला) आणि इपशिता गवारीच्या (२१व्या, २९व्या, ४५व्या मिनिटाला) प्रत्येकी तीन गोलांचा मोठा राहिला. उपकर्णधार तेजस्विनी थाप्पाने दोन (१७व्या, २१व्या मिनिटाला) तसेच दिया शेरी (१३व्या मिनिटाला) आणि केया तेलंगने (१७व्या) प्रत्येकी एक दोन करताना सांघिक खेळ उंचावण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. पुणे संघाच्या आक्रमण फळीने गोलांची बरसात केली. त्यांना बचावफळीचीही चांगली साथ लाभली. त्यामुळे प्रतिस्पर्धी अमरावती संघाची गोलपाटी कोरी राहिली.



## तब्बल १२ वर्षांनी सुपर-ओव्हर!

**युएसए :** टी-२० वर्ल्ड कप २०२४ चा थरार रविवारपासून सुरू झाला आहे. या स्पर्धेतील तिसऱ्याच सामना नाट्यमय झाला. ओमान आणि नामिबिया यांच्यात सोमवारी झालेल्या या सामन्याचा निकाल सुपर ओव्हरमध्ये लागला. सुपर ओव्हरमध्ये नामिबियाने बाजी मारली. या सामन्यात ओमानचा संघ प्रथम फलंदाजी करताना १९.४ षटकात १०९ धावांवर सर्वबाद झाला होता. त्यानंतर नामिबियालाही २० षटकात ६ बाद १०९ धावाच करता आल्या होत्या. त्यामुळे सामन्यात सुपर ओव्हर खेळवण्यात आली. सुपर ओव्हरमध्ये नामिबियाने ६ चेंडूत बिनबाद २१ धावा केल्या, त्यानंतर २२ धावांचा पाठलाग करताना ओमानला १ बाद १० धावाच करता आल्या. दरम्यान, टी-२० वर्ल्ड कपमध्ये सुपर ओव्हर होण्याची घटना तिसऱ्यांदा घडली, तर तब्बल १२ वर्षांनी सुपर ओव्हर झाली. यापूर्वी २०१२ साली झालेल्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये दोन वेळा सुपर ओव्हर झाली होती. २०१२ साली श्रीलंका आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या सामन्यात दोन्ही संघांनी १७४ धावा केल्यानंतर सुपर ओव्हर झाली होती, ज्यात श्रीलंकेने विजय मिळवला होता. सुपर ओव्हरमध्ये श्रीलंकेने १ बाद १३ धावा केलेल्या, तर न्यूझीलंडला १ बाद ७ धावाच करता आल्या होत्या. त्यानंतर २०१२ सालीच न्यूझीलंडला वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या सामन्यातही सुपर ओव्हरमध्ये पराभूत व्हावे लागले होते. या सामन्यात दोन्ही संघांनी १३९ धावा केल्याने सामन्यात बरोबरी झाली होती. त्यामुळे सुपर ओव्हर खेळवण्यात आली, ज्यात वेस्ट इंडिजने बिनबाद १९ धावा केल्या होत्या, तर न्युझीलंडला बिनबाद १७ धावाच करता आल्या होत्या.

## " ३५० व्या शिवराज्याभिषेकानिमीत्त भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन "

**पुणे :** विद्यार्थी कुस्ती परिषद महाराष्ट्र राज्य वर्षे ४ थे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दी. २ जून २०२४ वार रविवार रोजी महाराष्ट्रीय मंडळ ,टिळक रोड पुणे येथे भव्य युवा कुस्ती मैदान भरविण्यात आले.यावर्षी १२० मल्लांनी सहभाग घेतला.यामधे ३० मुलींच्या आणि ९० मुलांच्या कुस्ती घेण्यात आल्या.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा बँकेचे संचालक नाना दांगट, प्रसिध्द उद्योजक जवाहर शेठ चोरघे,क्रिडा संघटक डॉ. मदन कोठुळे सर ,माजु नगरसेवक दिलीप काळोखे, राजेंद्र बलकवडे,शिवसंग्राम संघटनेचे उपाध्यक्ष भरत लगड,पै. भास्कर मोहोळ, नामदेव मानकर, वस्ताद संभाजी अप्पा शिंदे ,बुवाजी लिमन ,डॉ राजेंद्र भवाळकर ,श्याम पुणेकर ,मराठा महासंघ पुणे शहर सरचिटणीस गणेश मापारी कार्याध्यक्ष अमर पवार ,राकेश गायकवाड ,तसेच सारिका पारेख ,सौ. श्रुतिका पाडळे आदी मान्यवर उपस्थित होते.यामधे पंच म्हणून राजू कदम , तुषार गोळे , संदिप जगदाळे ,प्रदिप पवार ,निकुंज उभे ,संतोष थरकुडे यांनी काम बघितले. या कार्याक्रमाचे आयोजन विद्यार्थी कुस्ती परिषदेचे अध्यक्ष युवराज दिसले यांनी केले.तसेच सूत्रसंचालन पै. श्याम शिंदे यांनी केले व पाहुण्यांचे स्वागत सचिन वडघुले यांनी केले . आभार प्रदर्शन सुनिल पवार यांनी केले. विजेता व उपविजेता मंल्लांना ट्रॉफी व मेडल भरत मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे प्रोप्रायटर भरत विलास गायकवाड यांनी दिले कात्रज दूध संघाचे संचालक ॲड. स्वप्निल दादा ढमढेरे यांनी सर्व मल्लांना ताक उपलब्ध करून दिले. पै.पंकज हरपुडे यांनी कुस्तीचे मॅट उपलब्ध करुन दिले.पुणे जिल्हा बँकेचे संचालक विकास नाना दांगट यांनी कुस्ती क्षेत्रासाठी लोकांनी पुढाकार घेऊन मल्ल घडविले पाहिजेत असे सांगितले.वस्ताद बुवा लिमन यांनी पुण्यातील कुस्तीचा इतिहास सांगितला. वस्ताद अप्पा शिंदे यांनी युवा मल्लांनी कुस्तीबरोबर शिक्षण घेतले पाहिजे असे सांगितले आणि क्रिडा संघटक डॉ मदन कोठुळे सर यांनी क्रिडा क्षेत्रातील अडचंणीवर कशी मात करता येते हे सोप्या पद्धतीत मार्गदर्शन केले.



शारदा स्पोर्ट्स सेंटर आयोजित पहिली जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धा

## शौरेन सोमणचा विजेतेपदाचा चौकार; पृथा वर्टीकरचा दुहेरी धमाका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शारदा स्पोर्ट्स सेंटरतर्फे आयोजित केलेल्या शारदा ग्रुप व डेक्कन डाईज अँड केमिकल्स पुरस्कृत पहिल्या जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत शौरेन सोमण याने पुरुष गटातील अजिंक्यपदासह विजेतेपदाचा चौकार नोंदवित निर्विवाद वर्चस्व गाजविले. आंतरराष्ट्रीय खेळाडू पृथा वर्टीकर हिने महिला व १९ वर्षाखालील मुली या दोन्ही गटात विजेतेपद पटकावीत दुहेरी धमाका केला. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात नील मुळ्ये याने विजेतेपद मिळविले.

ही स्पर्धा शारदा स्पोर्ट्स सेंटर येथे पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने आयोजित करण्यात आली होती. पुरुषांच्या अंतिम सामन्यात बिगर मानांकित शौरेन याने सातव्या मानांकित प्रणव घोलकर याच्यावर ११-६,११-१३, ११-७, ११-६ अशी मात केली. त्याने आक्रमक खेळाबरोबरच नैपुण्यवान शैलीचीही झलक दाखविली. या स्पर्धेत त्याने १७ वर्षाखालील मुलांच्या एकेरीत तसेच १५ वर्षाखालील एकेरी व दुहेरीत विजेतेपद मिळविले होते. एकाच मानांकन स्पर्धेत चार विजेतेपद मिळवण्याची मुलखावेगळी कामगिरी करणारा गेल्या वीस वर्षातील तो पहिलाच खेळाडू आहे. तो एम्स अकादमीत नीरज होनप यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो





महिलांच्या अंतिम सामन्यात वर्टीकर हिने धनश्री पवार हिच्यावर ११-५,११-७,९-११, ११-५,११-९ असा विजय मिळविला. मुलींच्या १९ वर्षाखालील गटात पृथाने अंतिम लढतीत रुचिता दारवटकर हिचा पराभव केला. शेवटपर्यंत चुरशीने झालेला सामना तिने ११-८,११-८, ११-७, ८-११, १०-१२,११-८ असा जिंकला. तिने फोरहँड टॉप स्पिन फटक्यांबरोबरच बॅकहँड फटक्यांचाही सुरेख खेळ केला. रुचिताने पहिल्या तीन गेम्स गमावल्यानंतर दोन गेम्स जिंकून सामन्यातील उत्कंठा वाढवली. तथापि अनुभवी खेळाडू पृथाने शेवटच्या गेममध्ये नियंत्रण ठेवले आणि विजय मिळविला. पृथाने श्रीलंकेमध्ये नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सांघिक गटात व मिश्र दुहेरी मध्ये सुवर्णपदक तर एकेरीत रौप्य पदक पटकावले होते. ही स्पर्धा झाल्यानंतर शनिवारी लगेच ती पुण्यातील स्पर्धेत उतरली आणि दोन विजेतेपद पटकावले आपला वरचष्मा सिद्ध केला. ती चॅम्पियन्स क्लब येथे सोमेन साह यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. ती मॉडर्न महाविद्यालय (शिवाजीनगर) येथे प्रथम वर्ष वाणिज्य शाखेत शिकत आहे. मुलांच्या १९ वर्षाखालील गटात डावखुरा खेळाडू नील मुळ्ये याने अंतिम सामन्यात प्रणव घोलकर याचे आव्हान ११-७,११-६, ११-९,११-७ असे परतविले. मुळ्ये याने टॉप स्पिन पटक्यांचा बहारदार खेळ केला तसे त्याने कल्पकतेने प्लेसिंगही केले. तो शामराव कलमाडी कनिष्ठ महाविद्यालयात बारावी वाणिज्य शाखेत शिकत असून त्याचे वडील उपेंद्र हेच त्याचे मार्गदर्शक आहेत.

#रा